
# प्रश्न समाजाचे - उत्तरे गीतेतील

## श्रीमद्भगवद्गीता

### भाष्य

# ॥ यथार्थ गीता ॥




स्वामी अड़गड़ानन्दजी

।।ॐ नमः सद्गुरुदेवाय।।

श्रीमद्भगवद्गीता भाष्य 'यथार्थ गीता'

# प्रश्न समाज के – उत्तर गीता से


व्याख्याकार :

परमपूज्य श्री परमहंस महाराज का कृपा–प्रसाद

**स्वामी श्री अड़गड़ानन्द जी**

श्री परमहंस आश्रम

ग्राम–पत्रालय – शक्तेषगढ़, जिला – मिर्जापुर

उत्तर प्रदेश, भारत

फोन : (०५४४३) २३८०४०



प्रकाशक :

श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट

न्यू अपोलो ईस्टेट, गाला नं. ५, मोगरा लेन,(रेलवे सब–वे के पास),

अंधेरी पूर्व, मुम्बई – ४०००६९ (भारत) भारत.

अनन्तश्री विभूषित

योगिराज, युग पितामह

**परमपूज्य श्री स्वामी परमानन्द जी**

श्री परमहंस आश्रम अनुसुइया

(चित्रकूट)

के परम पावन चरणों में

सादर समर्पित

अन्तःप्रेरणा

# गुरु-वन्दना

**।। ॐ श्री सद्गुरुदेव भगवान् की जय ।।**

जय सद्गुरुदेवं, परमानन्दं, अमर शरीरं अविकारी।
निर्गुण निर्मूलं, धरि स्थूलं, काटन शूलं भवभारी।।


सूरत निज सोहं, कलिमल खोहं, जनमन मोहन छविभारी।
अमरापुर वासी, सब सुख राशी, सदा एकरस निर्विकारी।।

अनुभव गम्भीरा, मति के धीरा, अलख फकीरा अवतारी।
योगी अद्वेष्टा, त्रिकाल द्रष्टा, केवल पद आनन्दकारी।।

चित्रकूटहिं आयो, अद्वैत लखायो, अनुसुइया आसन मारी।
श्री परमहंस स्वामी, अन्तर्यामी, हैं बड़नामी संसारी।।

हंसन हितकारी, जग पगुधारी, गर्व प्रहारी उपकारी।
सत्-पंथ चलायो, भरम मिटायो, रूप लखायो करतारी।।

यह शिष्य है तेरो, करत निहोरो, मोपर हेरो प्रणधारी।
जय सद्गुरु.........भारी।।


"आत्मने मोक्षार्थ जगत् हिताय च"
श्री श्री १००८ श्री स्वामी परमानन्दजी महाराज ( परमहंसजी )
जन्मः शुभ सम्वत् विक्रम १९६९ ( १९११ ई. )
महाप्रयाण ज्येष्ठ शुक्ल ७, २०२६, दिनांक २३/०५/१९६९ ई.
परमहंस आश्रम अनुसुइया, चित्रकूट



श्री स्वामी अड़गड़ानन्द जी महाराज

# अनुक्रमणिका


| क्रम | विवरण | पृष्ठांक |
|---|---|---|
| १. | धार्मिक विकृतींचे कारण काय आहे? | १ |
| २. | धर्माच्या नावावर अनेक धार्मिक ग्रंथ, संप्रदाय प्रचलित आहेत. ज्यामध्ये जवळ जवळ दोन हजार वर्षांपासून रहाणी, वेशभूषा, खाणे-पीणे, लग्न-विवाह इत्यादि सामाजिक नियमांना धर्म म्हंटले गेले आहे. खरोखरीच ह्या गोष्टी म्हणजे धर्म का? विभिन्न संप्रदायांचे कित्येक उप-संप्रदाय कसे तयार झाले? | ३ |
| ३. | धर्माचे अवलंबन करणाऱ्या काही व्यक्तींचे असे म्हणणे असते की जेवढे त्यांच्या धर्मग्रंथांमध्ये लिहिले आहे तेवढेच सत्य आहे. असा महापुरुष परत होऊ शकत नाही. एखाद्या महापुरुषाचे अनुयायी सांगतात की त्या महापुरुषावर विश्वास ठेवला नाही तर स्वर्ग प्राप्त होत नाही. महापुरुषांच्या पाठीमागेच मानव-समाज संप्रदायांमध्ये विभाजित झालेला आहे. त्यांनी वेगवेगळे धर्म सांगितले आहेत का? धर्माच्या नावावर मतमतांतरे तसेच वेगवेगळ्या पूजा पद्धति कोठून आल्या? | ५ |
| ४. | परमात्म्यास प्राप्त करण्याच्या अनेक पद्धति आहेत का? | ७ |
| ५. | धर्माचे उद्दिष्ट कोणते? | ९ |
| ६. | धार्मिक विकृतींचे कारण काय आहे? | ९ |
| ७. | खाण्या-पिण्याने, स्पर्श केल्याने वा समुद्र पार केल्याने धर्म नष्ट होतो का? | १२ |
| ८. | धर्मामध्ये प्रवेश मिळण्याचा अधिकार कोणाला आहे? | १७ |
| ९. | ग्रंथ, संप्रदाय ह्यांना 'धर्म' ही संज्ञा कशी मिळाली? | १८ |
| १०. | धर्माच्या नावावर परस्परांमध्ये फूट पडण्याचे कारण काय? | १९ |
| ११. | धर्मामध्ये उच्च-नीच भेद, रंग-भेद, वंश-भेद व लिंग-भेदाला कोणते स्थान आहे | १९ |
| १२. | नरकाचे भय व स्वर्गलोकीची प्रलोभने येथपर्यंतच धर्माचे अंतिम उद्दिष्ट मर्यादित असते का? | २० |

| | | |
|---|---|---|
| १३. | धर्म एखाद्या राष्ट्रापुरताच मर्यादित असतो का? | २२ |
| १४. | धर्मांतर म्हणजे काय? धर्म खरेच परिवर्तनशील असतो का? | २५ |
| १५. | धर्मामध्ये उपासनेच्या स्थळांचे ( देऊळ, मशीद, चर्च इत्यादी ) काय महत्त्व आहे? | २९ |
| १६. | धर्म कसा प्राप्त करावा? | ३० |
| १७. | ईश्वराचा निवास कोठे आहे? | ३१ |
| १८. | जर परमात्माच सत्य आहे तर देवपूजेचे काय महत्त्व आहे? | ३३ |
| १९. | सत्य काय आहे व नश्वर काय आहे? | ३५ |
| २०. | अधम कोणास म्हणतात? कर्म व यज्ञ म्हणजे काय? | ३६ |
| २१. | जाती परमेश्वराने निर्माण केल्या आहेत का? वर्ण म्हणजे काय? | ३७ |
| २२. | शास्त्र कोणते आहे? | ४१ |
| २३. | जाती, वर्ण, संप्रदाय व भेदभाव ह्या सर्वांपासून मुक्त असलेले मानवमात्राचे धर्मशास्त्र कोणते? | ४२ |
| २४. | पूर्ण विश्व भारताच्या आध्यात्मिक विद्येचे ऋणी आहे. भारत विश्वगुरु आहे. तेव्हा त्याचे धर्मशास्त्र कोणते? | ४२ |
| २५. | धर्माच्या नावावर होणारे आतंकवाद, जातीयवाद, भ्रष्टाचार, सामाजिक भेदभाव व विभक्तवाद थांबविण्यासाठी आपला काय संदेश आहे? | ४५ |
| २६. | जानेवारी २००५ मध्ये कलकत्ता येथे भारतीय सांस्कृीक संसदेच्या सुवर्णजयंती उत्सवाच्या वेळी संसदेने एका पत्रकाच्या माध्यमातून धर्माचे स्वरूप, धर्म आणि सांस्कृतिक, धर्म आणि राष्ट्र तसेच धर्म आणि विज्ञान इत्यादी विषयांवर महाराजजींची मते प्रकाशित केली, ती मते येथे वाचकांसाठी प्रस्तुत करीत आहोत. | ४६ |
| २७. | आर्य म्हणजे काय? | ६० |
| २८. | योग म्हणजे काय? | ६६ |
| २९. | साधकाचे आचरण कसे असले पाहिजे? | ७१ |

❖

श्रीमद्भगवद्गीता भाष्य 'यथार्थ गीता'

# प्रश्न समाजाचे - उत्तरे गीतेतील

मे २००५ मध्ये शक्तेषगढ, चुनार, मिर्जापूर
(उत्तर प्रदेश) येथील श्री परमहंस आश्रमात
आलेल्या काही भक्तांनी भगवद्गीतेच्या
संदर्भात एक प्रश्नावली महाराजश्रींच्या
समोर प्रस्तुत केली.
पुज्य महाराजश्रींच्या श्रीमुखातून
झालेले त्या प्रश्नांचे निराकरण
ह्या पुस्तकाच्या रुपात
प्रस्तुत करीत आहोत.

*त्या आधी आपण श्रीमद्भगवद्गीता भाष्य 'यथार्थ गीता' ह्या पुस्तकाचे अध्ययन अवश्य करावे*

श्रीमद्भगवद्गीता भाष्य ' यथार्थ गीता '

# प्रश्न समाजाचे - उत्तरे गीतेतील

बंधुंनो!

आपण भगवद्गीतेच्या संदर्भात काही प्रश्न विचारले होते, त्यात पहिला प्रश्न होता –

**प्रश्न १ : – मनुष्याची उत्पत्ती कशी झाली?**

**उत्तर :** – भगवद्गीता हे मानवाचे आदि धर्मशास्त्र आहे. त्याची उत्पत्ती कल्पाच्या आधी, सृष्टीच्या आरंभी झाली आहे. गीता ही परमात्म्याच्या श्रीमुखातून निघालेली अपौरुषेय वाणी आहे. त्याकाळी श्रुतज्ञानाची परंपरा होती. एकाने सांगितलेले दुसरा ऐकत असे व आपल्या स्मृतिमध्ये धारण करीत असे. अशा ज्ञानाला 'स्मृति' म्हंटले जायचे. भगवद्गीता ही अशाप्रकारे आदि 'मनुस्मृति' आहे.

गीतेमध्ये भगवान म्हणतात, "अर्जुना! त्रिगुणमयी प्रकृति ही गर्भ धारण करणारी माता आहे व मीच परमचेतन बीजरूपाने पिता आहे, बाकी सर्व निमित्तमात्र आहेत." मनुष्याची उत्पत्ती परमात्म्यापासून झालेली आहे. पंधराव्या अध्यायात भगवंत म्हणतात–

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।**
**मनः षष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति।। गीता, १५/७**

अर्जुना! आत्मा हा माझा विशुद्ध अंश आहे – तितकाच पवित्र जितके स्वयं भगवान. मनासहित इंद्रियांच्या कार्यास आकर्षित करून हा आत्मा एका शरीराचा त्याग करतो व नवीन शरीर धारण करतो. ज्याप्रमाणे वायू पुष्पापासून सुगंधाला ग्रहण करून दुसऱ्या जागी तो सुगंध पसरवतो त्याचप्रमाणे या देहाचा स्वामी जीवात्मा आपल्या पहिल्या शरीराचा त्याग करतो तेव्हा त्याच्यापासून मनासहित इन्द्रियांना आकर्षित करून त्यांसह दुसऱ्या नवीन शरीरात प्रवेश करतो व तेथे ह्याच मनासहित इंद्रियांच्या माध्यमातून पुन्हा विषयांमध्ये प्रवृत्त होतो; परंतु

**उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम्।**
**विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः।। गीता, १५/१०**

शरीर सोडून जाणाऱ्यास, नवीन शरीर धारण करणाऱ्यास व पुन्हा विषयांमध्ये प्रवृत्त होणाऱ्यास '**विमूढा नानुपश्यन्ति**' - मूढ, अज्ञानी लोक जाणत नाहीत, केवळ ज्ञानरूपी चक्षू असणारे म्हणजे ज्ञानी लोकच चांगल्याप्रकारे जाणू शकतात, पाहू शकतात.

मनुष्याची उत्पत्ती एका परमात्म्यापासूनच झालेली आहे; कारण मनासहित इंद्रियांचे कार्य पशुपक्ष्यांमध्ये, वनस्पतींमध्ये नसते. मनासहित इंद्रियांच्या कार्यास आकर्षित करून हा आत्मा एका मानवी शरीराचा त्याग करून दुसरे शरीर धारण करतो. सात्त्विक गुण कार्यरत असताना मृत्यू पावलेला पुरुष उन्नत देवयोनी प्राप्त करतो. 'देव' अर्थात दैवी संपत्तीने संपन्न, विशुद्ध, धर्मपरायण अशा पुरुषाच्या रुपामध्ये तो अवतारित होतो. राजसी गुण कार्यरत असताना मृत्यू पावलेला पुरुष सामान्य मानव होतो व तामसी गुणांचे बाहुल्य असताना मृत्यू पावलेला पुरुष पशु-पक्षी, कीटक-पतंग इत्यादि अधम योनि प्राप्त करतो. हाच ह्या शरीराचा गंध होय, जो घेऊन आत्मा अन्य शरीरांमध्ये स्थानांतरीत होतो. हेच भगवंतांनी पंधराव्या अध्यायाच्या दुसऱ्या श्लोकात म्हटले आहे, '**कर्मानुबन्धिनि मनुष्यलोके**' - मनुष्य स्वतःच्या कर्मानुसार बंधन तयार करतो. मनुष्याच्या एका शरीरातून दुसऱ्या शरीरात परिवर्तन होण्याच्या प्रक्रियेस हृदयामध्ये स्थित असलेला आत्माच नियंत्रित करतो, जो माझा विशुद्ध अंश आहे.

सृष्टीच्या आरंभी ज्योतिर्मय परमात्मा आहे. त्याच्या ज्योतिर्मय अंशास सूर्य म्हटले जाते, म्हणूनच भगवंत म्हणतात की हा अविनाशी योग मी कल्पाच्या प्रारंभी सूर्यास सांगितला. सूर्याने तोच उपदेश आपला पुत्र आदि मनु ह्यास सांगितला. मनुने ते ज्ञान आपल्या स्मृतिमध्ये धारण केले व त्यास सुरक्षित ठेवण्यासाठी आपला पुत्र इक्ष्वाकु ह्यास सांगितले. इक्ष्वाकूकडून राजर्षींनी जाणले. ह्या महत्त्वपूर्ण काळानंतर हे ज्ञान सृष्टीवरून लुप्त झाले होते, विस्मृतीत गेले होते. योग तर अविनाशी असतो, कधी नष्ट होऊ शकत नाही. हां, केवळ आमच्या स्मृतिमधून लुप्त झाला होता, हरविला होता.

भगवंतांनी अर्जुनास म्हटले - "तोच पुरातन योग मी तुला सांगणार आहे." अनेक प्रश्न-प्रतिप्रश्नांनंतर अर्जुन म्हणाला - '**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा**' - अच्युता! मोहापासून उत्पन्न झालेले माझे अज्ञान नष्ट झाले आहे. मला स्मृति प्राप्त झाली आहे. मी आपल्या आदेशाचे पालन करेन. हताश झालेल्या अर्जुनाने धनुष्य

उचलले आणि तो युद्धासाठी प्रवृत्त झाला. त्यास विजय मिळाला. धर्मात्मा युधिष्ठिर राज्याभिषिक्त झाले, धर्मसाम्राज्य स्थापन झाले व एकमात्र धर्मशास्त्राच्या रूपात गीता पुन्हा पूर्ववत् प्रसारित झाली.

महर्षि वेदव्यासांनी श्रुतज्ञानाच्या परंपरेस मागे टाकून प्राचीन समस्त ज्ञानास-चारही वेद, भागवत्, महाभारत, ब्रह्मसूत्र आणि गीता ह्यांस लिपिबद्ध केले. शेवटी त्यांनीच सांगितले की ह्या सर्वांमध्ये शास्त्र कोणते. 'गीता सुगीता कर्त्तव्या' - गीता चांगल्याप्रकारे मनन करून हृदयामध्ये धारण करण्यायोग्य आहे. ही भगवान पद्मनाभांच्या श्रीमुखातून निघालेली वाणी आहे तेव्हा अन्य शास्त्रांमध्ये गुंतण्याची काय आवश्यकता? '**किमन्यैः शास्त्रविस्तरैः**' - अन्य शास्त्रांच्या विस्तारात जाण्याची काय गरज आहे? एक गीताच संपूर्ण शास्त्र आहे आणि ह्या गीताशास्त्रानुसार मनुष्याची उत्पत्ति परमात्म्यापासून झालेली आहे.

●

**प्रश्न २ : - धर्माच्या नावावर अनेक धार्मिक ग्रंथ, संप्रदाय प्रचलित आहेत. ज्यामध्ये जवळ जवळ दोन हजार वर्षापासून रहाणी, वेशभूषा, खाणे-पीणे, लग्न-विवाह इत्यादि सामाजिक नियमांना धर्म म्हंटले गेले आहे. खरोखरीच ह्या गोष्टी म्हणजे धर्म का? विभिन्न संप्रदायांचे कित्येक उप-संप्रदाय कसे तयार झाले?**

**उत्तर :** - संप्रदाय गुरु घराण्यांचे ट्रेड-मार्क आहेत. वस्तुतः ईश्वर एक आहे व त्यास प्राप्त करण्याचा विधि एकच आहे. त्या निर्धारित विधीप्रमाणे साधना करीत असताना मार्गामध्ये मिळणारा योगक्षेम एकच असतो. सुखसोयी समान मिळतात व त्या परमेश्वराच्या मार्गदर्शनाखाली चालत असता प्राप्ति झाली तर तीही एकच असते, ती म्हणजे त्या अव्यक्त, व्याप्त आत्म्याचे दर्शन व स्थिती. अशाप्रकारे भगवत्पथामध्ये कोणतेही संप्रदाय होऊच शकत नाहीत.

धर्माच्या नावावर आजकाल जे अनेक संप्रदाय, धार्मिक ग्रंथ पसरलेले आहेत ते सर्व गुरु घराण्यांची नावे आहेत. ते त्या घराण्यांच्या अध्यापनाच्या वेगवेगळ्या पद्धति आहेत. एका विशिष्ठ स्तरापर्यंत ते सर्व वेगवेगळे आहेत असे वाटते. परंतु साधना जेव्हा परमेश्वराच्या निर्देशनाखाली होण्यास सुरुवात होते तेव्हा साधनेची पद्धत एकच असते, निरीक्षण-परीक्षण व परिणाम एकच असतो.

आपण जर शाळेतील विद्यार्थ्यांच्या गणवेषावर नजर टाकली तर कोणाचा पिवळा असतो, कोणाचा काळा तर कोणाचा पांढरा, नीळा अथवा गुलाबी असतो. पुढे जाऊन जेव्हा तेच विद्यार्थी एम्.ए., पीएच्.डी. करतात तेव्हा त्यांच्या शिक्षणाचा स्तर एकसारखा असतो, पदवीही एकसारखी मिळते,फक्त कोणाला जास्त गुण तर कोणाला थोडे कमी! भगवत्पथामध्ये स्वतःच्या इच्छेनुसार कोणीही वेगळा धर्म, वेग-वेगळ्या साधन पद्धति व वेगळा परमेश्वर निर्माण करू शकत नाही. अनुभवी सद्गुरुंचे शरण-सान्निध्य न मिळाल्याने हे अंतर रहाते आणि ते प्राप्त होताच सर्व काही शांत होते; कारण ते महापुरुष हृदयामध्ये प्रेरणा देऊन बरोबर मार्गावर आणून उभे करतात.

जेथे रहाणी, लग्न-विवाह इत्यादि गोष्टींचा प्रश्न आहे तेथे भगवद्भक्ताला सृष्टीतील प्रत्येक कार्य परमेश्वराला समर्पण करून केले पाहिजे. शेतात नांगर चालवताना समर्पण, आखाड्यामध्ये जाताना समर्पण, नोकरी करताना, व्यवसाय करताना, राजनीति करताना, लोहारकाम, सोनारकाम किंवा चांभारकाम करताना समर्पण व श्रद्धेने कार्य आरंभ केले पाहिजे. कार्य संपन्न होताच प्रणाम करावा. झोपताना प्रमेश्वरास प्रणाम करावा, उठल्यावर प्रणाम करावा, चप्पल घालताना, कपडे घालताना अर्थात् प्रत्येक कार्य करताना परमेश्वराचे स्मरण व्हावयास हवे - हेच धर्मव्रत होय, आर्यव्रत होय. सर्वांनी असे केले पाहिजे.

लग्न-विवाहाच्या वेळी करण्यात येणाऱ्या रीति-रिवाजांमध्ये असणाऱ्या भिन्नतेचा अर्थ असा नाही की तो कोणता वेगळा धर्म आहे. सर्वजण आप-आपल्या पद्धतीने धर्माला, सत्याला, परमात्म्याला साक्षी मानीत असतात इतकेच, बाकी काही नाही. विविध देशांमध्ये परमेश्वराला साक्ष ठेवून शपथ घेण्याच्या पद्धति वेगवेगळ्या आहेत; परंतु प्रत्येक स्थितीमध्ये परमेश्वराचेच स्मरण केले जाते. जेव्हा तीच व्यक्ती साधनेच्या योग्य मार्गावर येते तेव्हा त्यांच्यासाठी एकच विधान असते-

**जागत में सुमिरन करे, सोवत में लव लाय।**
**सुरत डोर लागी रहे, तार टूट ना जाय।।**

भगवान श्रीकृष्णाने भगवद्गीतेमध्ये हेच सांगितले आहे-

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।। गीता, ८/१४**

अर्जुना! 'अनन्य'–अर्थात अन्य न, माझ्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही देवी–देवतांना न भजता जो मला भजतो, 'सततं'–निरंतर भजतो त्यास मी सहज सुलभतेने प्राप्त होतो. क्षणभंगुर पुनर्जन्मास तो प्राप्त करीत नाही.

●

**प्रश्न ३ : – धर्माचे अवलंबन करणाऱ्या काही व्यक्तींचे असे म्हणणे असते की जेवढे त्यांच्या धर्मग्रंथांमध्ये लिहिले आहे तेवढेच सत्य आहे. असा महापुरुष परत होऊ शकत नाही. एखाद्या महापुरुषाचे अनुयायी सांगतात की त्या महापुरुषावर विश्वास ठेवला नाही तर स्वर्ग प्राप्त होत नाही. महापुरुषांच्या पाठीमागेच मानव–समाज संप्रदायांमध्ये विभाजित झालेला आहे. त्यांनी वेगवेगळे धर्म सांगितले आहेत का? धर्माच्या नावावर मतमतांतरे तसेच वेगवेगळ्या पूजा पद्धति कोठून आल्या?**

**उत्तर : –** परमात्मा जर परमधाम आहे, तर सद्गुरु साधनेची जागृती आहेत. जागृतीपासून पूर्तिपर्यंत आत्म्याला रथी बनवून चालविण्याचे दायित्व सद्गुरुंद्वारेच होते. त्यांच्या संरक्षणाखाली वाटचाल करीत साधक मूळ तत्त्वास स्पर्श करतो. परमात्म प्राप्ति बरोबरच त्यास गुरुंचे गुरुत्वही प्राप्त होते. गुरुमहाराजांमध्ये जेवढे पूर्ण गुरुत्व असते तितकेच ते शिष्यातही असते. अशा स्थितीमध्ये प्राप्त करण्यायोग्य कोणतीही गोष्ट अप्राप्त रहात नाही ज्यासाठी तो दुःख करेल व कोणताही विकार शेष रहात नाही ज्यामुळे तो भयभीत होईल. येथे गुरु शिष्यापासून वेगळा रहात नाही. कबीर म्हणतात – "घट मेंही गुरु हमारा।" परंतु साधनेच्या काळात सद्गुरुंना शरण व त्यांचे सान्निध्य अनिवार्य आहे. म्हणूनच सद्गुरुंवर दृढ श्रद्धा असणे आवश्यक आहे ह्या गोष्टीवर प्रत्येक महापुरुषाने भर दिला आहे.

परंतु सद्गुरुंबद्दलही एक प्रश्न आहे. गुरु घराणी क्रमशः बनत गेली. प्रत्येक घराण्याचे वारसदार गुरु परंपरा व रुढी जोडत गेले, त्यामुळे मतभेद निर्माण झाले. वस्तुतः कोणाही पुरुषाने केवळ एका परमात्म्यामध्ये दृढ निश्चय ठेवावा व त्यास संबोधित करणाऱ्या कोणत्याही दोन–अडीच अक्षरांच्या नावाचा जप करावा. आपले मूळ धर्मशास्त्र गीता आहे, त्याचे चांगल्याप्रकारे अध्ययन करून त्यास हृदयात धारण करावे. जेव्हा साधना थोडीशी उन्नत होते. हृदयावरील आवरण नाहीसे होते, श्रद्धा जागृत होते तेव्हा परमेश्वरच आपल्याला अंतःप्रेरणेने सद्गुरुंची ओळख करून देतात.

**पुण्य पुंज बिनु मिलहिं न संता । ( मानस ७/४४/३ )** जोपर्यंत पुण्याचा संचय वर्तमानात साथ देत नाही तोपर्यंत सद्‌गुरु मिळत नाहीत. पुण्य त्यास म्हणतात जे आपल्याला पूर्णत्व प्राप्त करून देते, परमात्म्यापर्यंत घेऊन जाते. जे आपल्याला विनाशाकडे घेऊन जाते त्यास पाप-कर्म म्हणतात. गीतेमध्ये सांगितलेल्या निर्धारित कर्माला पुण्य-कर्म म्हटले आहे -

**येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।**
**ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः।। गीता, ७/२८**

अर्जुना! राग-द्वेष इत्यादी संघर्षामध्ये गुरफटलेल्यांना मी ज्ञात होत नाही; परंतु ज्या पुण्य कर्म करणाऱ्या, सतत माझा जप करणाऱ्या, व्रतामध्ये दृढ राहून मला भजणाऱ्या भक्तांचे पाप नष्ट झालेले आहे, मोहापासून उत्पन्न झालेले आवरण नष्ट झालेले आहे, असे भक्त संपूर्ण ब्रह्म जाणतात, संपूर्ण कर्म जाणतात, संपूर्ण अध्यात्म जाणतात, अधियज्ञासहीत मला जाणतात व माझ्यामध्ये समाहित होतात. त्यानंतर त्यांचा पुनर्जन्म होत नही. कायमस्वरूपी जीवन व शांति प्राप्त करतात.

गादीवर बसलेल्या सद्‌गुरुंकडून शिकवण अवश्य मिळते. कोठे प्राथमिक स्तरापर्यंतची शिकवण तर कोठे माध्यमिक स्तरापर्यंतची. त्यांच्या उपदेशामध्ये थोडा-फार फरक असू शकतो, परंतु परस्पर विरोधी शिकवण तेव्हा मिळते जेव्हा -

**पूरा सद्‌गुरु ना मिला, मिली न साँची सीख।**
**भेष यति का बनाय के, घर घर माँगे भीख।।**

आपण मला प्रश्न केलात की धर्माच्या ठिकाणी मत-मतांतरे, वेगवेगळ्या पूजा पद्धति कोठून आल्या? ह्याचे एक कारण एकमेव धर्मशास्त्र कोणते ह्याबद्दल समाज अनभिज्ञ असणे अथवा धर्मशास्त्र विस्मृत होणे म्हणून ह्या विकृति आलेल्या आहेत. दुसरे कारण भगवान श्रीकृष्ण सांगतात, "अर्जुना! आत्मदर्शनाच्या निर्धारित विधिमध्ये, ह्या निष्काम कर्मयोगामध्ये निश्चयात्मक क्रिया केवळ एकच आहे." मग जे लोक बऱ्याच क्रिया करतात, ती साधना नाही का? भगवंत म्हणतात, "अर्जुना! अविवेकी लोकांची बुद्धी अनंत शाखांची बनलेली असते, म्हणून ते अनंत क्रियांची संरचना करतात." '**स्वर्गापराः**'-स्वर्गच सर्वात श्रेष्ठ आहे, त्याच्या पलिकडे काही नाही. स्वर्गप्राप्तीपर्यंतच त्यांची दृष्टी सीमित असते. दिखाऊ शोभायुक्त वाणीने ते त्या क्रिया व्यक्तही करत असतात. 'सनातन' 'शाश्वत' अशी शीर्षके देऊन त्या

नावाखाली दिखावटी, शोभायुक्त मधुर वाणीने नश्वर गोष्टींचा उपदेश करतात. त्यांच्या वाणीचा प्रभाव ज्यांच्या हृदयावर पडतो त्यांची बुद्धी देखील नष्ट होते व ते काहीही प्राप्त करू शकत नाहीत. ते जन्म–मृत्यूच्या चक्रात गुरफटले जातात व अनंत योनींमधून भटकत रहातात.

तेव्हा ईश्वर पथामध्ये साधना एकच असते. प्रथम मनासहित इंद्रिये विषयांकडे प्रवाहित असतात ती आता इष्टोन्मुखी प्रवाहित होतात. जसा संयम साध्य होऊ लागतो तसा साधनेचा स्तर उंच होत जातो. अशाप्रकारे साधनेचा स्तर वरचा–खालचा असू शकतो परंतु क्रिया कोणतीही दुसरी असू शकत नाही.

●

**प्रश्न ४ : – परमात्म्यास प्राप्त करण्याच्या अनेक पद्धति आहेत का?**

**उत्तर :–** कदापि नाही! भगवान श्रीकृष्ण म्हणतात, "अर्जुना! हे 'कर्म' केल्याशिवाय ना पूर्वी कोणी परमात्म्यास प्राप्त करू शकले होते ना भविष्यात कोणी प्राप्त करू शकेल. परंतु ज्या महापुरुषांना कर्माच्या परिणामी आत्मा विदित झालेला आहे, जे आत्मतृप्त आहेत, आत्मस्थित आहेत त्या महापुरुषांचे किंचितही कर्तव्य शेष नसते, प्राप्त होण्यायोग्य कोणतीही वस्तु अप्राप्य नसते. म्हणून कर्म करण्याने ना त्यांना काही लाभ होतो व कर्म करणे सोडून दिल्याने ना त्यांना काही क्षति होते. तरीही ते महापुरुष त्यांच्या अनुयायांना मार्गदर्शन करण्यासाठी कर्माचे चांगल्या प्रकारे आचरण करतात. असे सद्गुरु लोकहितासाठी असतात.

अनंतकाळापासून जनक इत्यादी जितके ऋषि होऊन गेले त्या सर्वांनी हेच कर्म करून परमनैष्कर्म्य स्थिती प्राप्त केली, ती प्राप्त केल्यानंतर कर्म करून ना काही लाभ होतो व कर्म सोडल्याने ना काही क्षति पोहोचते. त्यांना सहज स्वरूपस्थिती प्राप्त झाली होती. तेव्हा क्रिया तर एकच आहे.

परंतु ह्या विधीचे अनेक स्तर आहेत. त्याचा आरंभ होतो परमेश्वराचे गुणगान गाण्याने, परस्परांमध्ये ईश्वराबद्दल चर्चा करण्याने, पत्र–पुष्प–जल इत्यादी त्यास अर्पण करण्याने. हा आरंभिक स्तर आहे.

**मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम्।**
**कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च।। गीता, १०/९**

माझ्या ठिकाणी आपले चित्त निरंतर ठेवणारे माझे गुणगान करीत संतुष्ट होतात, परस्परांमध्ये माझीच चर्चा करतात. येथूनच सुरुवात होते.

क्रमशः स्तर उन्नत होताच उठणे-बसणे-चालणे इत्यादी क्रिया भगवंत करवितात. निर्धारित कर्म आता उत्तम प्रकारे होऊ लागते. ह्यानंतर कर्म एक, साधनेचा परिणाम एक व सुविधाही सर्वांना एकसारखीच मिळते.

भगवान म्हणतात, – "अर्जुना! तू निमित्त मात्र होऊन उभा रहा, कर्ता-धर्ता तर मीच आहे, विजय तुला मिळेल." –'**निमित्त मात्र भव सव्यसाचिन** '– "माझ्याद्वारे मेलेल्यांना तू मार व यश प्राप्त कर." वस्तुतः जोपर्यंत परमात्मा स्वतः आपल्या आत्म्यापासून अभिन्न होऊन जागृत होत नाही, मार्गदर्शन करू लागत नाही तोपर्यंत पूर्ण निवृत्ती मिळवून देणारी साधना अजून जागृतच झालेली नाही.

अशाप्रकारे साधन एक आहे, विधि एक आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात –

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः।**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्।। गीता, १६/२**

हा शास्त्रात सांगितलेला विधि सोडून जे अन्य विधींनी मला भजतात त्यांच्या जीवनात ना सुख असते, ना सिद्धी व ना परमगति. असे लोक भ्रष्ट होतात. म्हणून –

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि।। गीता, १६/२४**

तुमचे कर्तव्य कोणते व अकर्तव्य कोणते ह्याच्या निर्णयामध्ये शास्त्र हेच प्रमाण आहे. दुसऱ्या कोणत्याही शास्त्राच्यामागे धावू नये. भगवंत स्वतः म्हणतात –

**इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ।**
**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत।। गीता, १५/२**

हे निष्पाप अर्जुना! हे अत्यंत गुह्य शास्त्र मी तुला सांगितले आहे. कोणते शास्त्र? गीताशास्त्र. गीता हे एक संपूर्ण शास्त्र आहे. त्याचे चांगल्याप्रकारे अध्ययन करून आचरण कर. तू अमृतमय, अनामय पद प्राप्त करशील, सदा असणारे जीवन व समृद्धी प्राप्त करून कृतार्थ होशील.

●

**प्रश्न ५ :- धर्माचे उद्दिष्ट कोणते?**

**उत्तर :**– ह्या लोकी समृद्धी व परमेश्वराची प्राप्ति हे धर्माचे उद्दिष्ट असते. जीवन हे जन्म व मृत्यू ह्या दोघांमधील एक पडाव आहे. मृत्यूच्या पश्चात् कोणीही परत येऊन आपले घर वा इतर व्यवस्था पाहू शकत नाही. गीतेमध्ये म्हटले आहे – **स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।** (१८/६२) तुम्ही असे निवासस्थान प्राप्त करता की जे अजर–अमर आहे. तुम्ही, तुमचे जीवन व तुमचे मोक्षधाम सदैव राहील. गीता सदा रहाणारी समृद्धी, शांति देते. ज्या परमात्म्याचे तुम्ही अंश आहात त्या परमात्म्याने दर्शन, स्पर्श व त्यामध्ये स्थिती देवविते.

ही विचित्र गोष्ट आहे की आपण एखादी गोष्ट त्यांच्याजवळ मागतो ज्यांच्याजवळ ती गोष्ट नाही. ज्यांच्याजवळ नाही ते कोठून देणार? आपण एखाद्या फळझाडाकडे हंगामामध्ये फळ मागितले तर ते झाड आपल्याला अवश्य फळ देईल; परंतु आपण त्याच्याकडे मुक्ति वा भक्ति मागितली तर ते कोठून देणार?

●

**प्रश्न ६ :- धार्मिक विकृतींचे कारण काय आहे?**

**उत्तर :**– ह्या विकृतींचे कारण केवळ शास्त्र विस्मृत होणे, त्याची अवहेलना होणे व त्यावर विचारशून्य, बेधडक प्रतिबंध लागणे होय. गीता धर्मशास्त्राच्या रूपात प्रतिष्ठित होताच स्पष्ट होईल की संपूर्ण मानव एका परमात्म्याची संतती आहे. परमात्माच एकमात्र शाश्वत सत्य आहे, नित्यतत्त्व आहे. त्यास धारण करणे हा धर्म आहे. त्यास धारण करण्याचा विधि, संपूर्ण साधना–पद्धति गीतेमध्ये आहे. गीता माणसांमध्ये उच्च–नीच असा भेदभाव उत्पन्न करीत नाही. गीतोक्त धर्म माणसांच्या हृदयामधील दुःखांच्या कारणांचे निवारण करण्याचे व सहज सुखाच्या प्राप्तीचे साधन आहे.

गीतेमधील पहिलाच श्लोक –

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।**
**मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय।। गीता, १/१**

'धर्म' एक क्षेत्र आहे तसेच 'कुरु' एक क्षेत्र आहे. वस्तुतः हे क्षेत्र कोठे आहे? युद्ध कोठे झाले? क्षेत्रज्ञ कोण? गीताकारांनी स्वतःच स्पष्ट केले आहे. –

**इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते । ( १३/१ )**

अर्जुना! हे शरीरच क्षेत्र आहे. त्यामध्ये पेरलेले चांगले-वाईट बीज संस्कार रूपामध्ये उगवते. शुभ वा अशुभ अशा अनंत योनींचे कारणही हेच आहे. जो ह्या चक्राच्या पलिकडे जातो तो क्षेत्रज्ञ. जो ह्या क्षेत्रामध्ये अडकून न राहता उलट त्याचा रक्षक असतो, त्यापासून उद्धार करतो तो क्षेत्रज्ञ. अर्जुना! सर्व शरीरांमध्ये मी क्षेत्रज्ञ आहे व जो हे जाणतो तोही क्षेत्रज्ञ असतो. ह्यावरून स्पष्ट आहे की श्रीकृष्ण एक महायोगेश्वर, पूर्ण सद्गुरु आहेत.

शरीर एक क्षेत्र आहे. त्यामध्ये लढणाऱ्या दोन प्रवृत्ति आहेत – धर्मक्षेत्र व कुरुक्षेत्र. एक परमधर्म परमात्मा जो शाश्वत आहे, अनादि आहे, सत्य आहे त्यास धारण करण्याचा विधि, तर दुसरी आहे कुरु अर्थात 'करा', करतच रहा, सतत त्यात प्रवृत्त रहा, चालत रहा, परंतु तुम्ही पोहोचणार कुठेही नाही व चालणे कधी थांबणार नाही. ह्याचे नाव आहे प्रवृत्ती मार्ग. ज्यामध्ये अज्ञानरूपी धृतराष्ट्र आहे व गो अर्थात इंद्रियांवर आधारलेली दृष्टी म्हणजेच गांधारीपासून तिची रचना होते. अज्ञानाने प्रेरित असलेला मोहरूी दुर्योधन, दुर्बुद्धीरूपी दुःशासन, विजातीय कर्मरूपी कर्ण, भ्रमरूपी भीष्म, द्वैतभावाचे आचरणरूपी द्रोणाचार्य, संशयरुपी शकुनि-अशाप्रकारे आसुरी संपत्ती अनंत आहे तरीही त्यास अकरा अक्षौहिणी म्हंटले आहे. दहा इंद्रिये व एक मन-मनासहित इंद्रियांमध्ये रममाण झालेल्या दृष्टीपासून जिची रचना होते ती आसुरी संपत्ती, विजातीय संपत्ती, तेच कुरुक्षेत्र, तोच प्रवृत्ती मार्ग, ज्यावर आपल्याला विजय मिळवायचा आहे.

ह्याच अंतःकरणात एक दुसरी प्रवृत्ती आहे. ती म्हणजे धर्मक्षेत्र. परम शाश्वत, सनातन, अव्यक्त, व्याप्त, कालातीत असा एकमात्र परमतत्व परमात्मा आहे. त्यास धारण करणे हा धर्म आहे. ह्या धर्मक्षेत्रामध्ये कर्तव्यरूपी कुंती व पुण्यरूपी पांडु आहेत. पुण्य जागृत होण्याआधी मनुष्य कर्तव्य समजून जे काही करतो, त्याच्या बुद्धीनुसार ते बरोबर असते. परंतु खरे ती असते विजातीय संपत्ती. तो जणु काही अंधारात मारलेला बाण असतो. पांडुशी संबंध येण्याआधी कुंतीने जे काही अर्जित केलेले असते, तो म्हणजे कर्ण. वास्तविक सख्खा भाऊ असूनही पांडवांचा सर्वात मोठा, निरंतर वैरी कोण होता तर तो कर्ण.

नकळत धर्म समजून काहीही केले तर तो धर्म होत नाही. भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, की अविवेकी लोकांची बुद्धी अनंत शाखांची बनलेली असते म्हणून ते लोक धर्माच्या नावावर अनंत क्रियांची रचना करतात. दिखाऊ मधुर वाणीने ते व्यक्तही करतात की स्वर्गप्राप्ती हेच सर्वात श्रेष्ठ उद्दिष्ट असते. त्यांच्या वाणीची छाप ज्यांच्या चित्तावर पडते त्यांची बुद्धीही नष्ट होते. ते काहीही प्राप्त करीत नाहीत.

प्रत्येक पुरुष श्रद्धाळू असतो. कोठे ना कोठे त्याची श्रद्धा अवश्य असते; परंतु कामनायुक्त अविवेकपूर्ण बुद्धी अनंत क्रियांची संरचना करते. म्हणून पुण्य जागृत होण्याआधी मनुष्य कर्तव्य समजून आपापल्यापरीने जे काही करतो ते कर्मच असते, परंतु ते विजातीय कर्म असते. आसूरी संपत्तीचा तो एक भाग असतो. जेव्हा पुण्यरूपी पांडूशी संबंध येतो तेव्हा धर्मरूपी युधिष्ठिराची उत्पत्ती होते. युधिष्ठिराला 'अजातशत्रु' असे म्हंटले जाते, म्हणजे ज्याला कोणीही शत्रु नाही. वास्तविक सर्व युधिष्ठिराचेच शत्रु होते. राज्याभिषेक युधिष्ठिराचा होणार असतो तरीही युधिष्ठिराला अजातशुत्रु म्हंटले जात होते; कारण ईश्वर-पथामध्ये आरंभाचा नाश होत नाही. एकदा साधना जागृत झाली की ती परमेश्वराच्या संरक्षणाखाली चालू राहते. प्रकृतीमध्ये एवढी ताकद नसते की परमेश्वराच्या हातून तुम्हाला खेचून अधोगतीकडे ढकलेल. परमेश्वरच तसे होऊ देणार नाही.

**करऊँ सदा तिन्ह के रखवारी। जिमि बालक राखद महतारी।।**

**( रामचरितमानस ३/४२/३ )**

अशाप्रकारे धर्मरूपी युधिष्ठिर (जे शाश्वत तत्त्व आहे त्यास धारण करण्याची जागृती), भावरूपी भीम (भावे विद्यते देवा। - भावामध्ये इतकी क्षमता असते की परमदेव परमात्मा विदित होतो), अनुरागरूपी अर्जुन (परमेश्वराबद्दल प्रेम म्हणजे अनुराग. राग म्हणजे सृष्टीबद्दल प्रेम व अनुराग म्हणजे इष्ट बद्दल प्रेम. ''**मम गुन गावत पुलक सरीरा। गदगद गिरा नयन बह नीरा - ( रामचरितमानस - ३/१५/६ )** अशी अनुरागी पुरुषाची लक्षणे आहेत.) नियमरूपी नकुल, सत्संगरूपी सहदेव, सात्विकतारूपी सात्यकी, काशिराज (कायारूपी काशीमध्येच साम्राज्य आहे), सारथीच्या रूपामध्ये भगवंत म्हणजे अंतःकरणात जागृत इष्ट सद्‌गुरु- असे हे धर्मक्षेत्र आहे. त्याची संख्या सात अक्षौहिणी म्हंटली आहे. ईश्वरपथामध्ये

क्रमाक्रमाने उन्नत होत जाणाऱ्या सात भूमिका असतात. ह्या भूमिकांच्या दृष्टीने, एका परमात्ममयी दृष्टीने ज्याची रचना होते ते म्हणजे धर्मक्षेत्र. ह्या वृत्तीही अनंत आहेत. वृत्तींचा प्रवाहच आहे. जेव्हा धार्मिक वृत्ती प्रबळ होते तेव्हा हे शरीरच धर्मक्षेत्र बनते.

कुरुक्षेत्र व धर्मक्षेत्र ह्यांमधील संघर्ष तोपर्यंत चालू रहातो जोपर्यंत विजातीय प्रवृत्तीचा, आसुरी संपत्तीचा अंतिम सदस्य दुर्योधन शांत होत नाही. जेव्हा दुर्योधन समाप्त झाला, कुळातील कोणीही शिल्लक राहिले नाही तेव्हा आंधळा धृतराष्ट्र काही काळ अवश्य व्याकुळ झाला, परंतु शेवटी त्यानेही संन्यास घेतला व परमेश्वराच्या द्वारी जाऊन चिंतन करू लागला. अशाप्रकारे गीता ही अंतःकरणातील दोन प्रवृत्तींचा संघर्ष आहे.

प्रत्येक मनुष्य हा प्रकृती–प्रधान अथावा धर्म–प्रधान असतो. अज्ञानात सुद्धा, अदृश्य रूपाने का होईना पण कोणत्या ना कोणत्या रूपात शरण जाण्यायोग्य स्वतःपेक्षा उच्चतम सत्ता तो अवश्य शोधतो. मनुष्य अपूर्ण असतो. त्यास पूर्णत्व प्रदान करणे, सदा टिकणारे जीवन व शांति प्रदान करणे, अभय पद देणे – हेच गीतेचे क्रियात्मक साधन आहे. साधना उन्नत होताच परमेश्वर ही फक्त एक कल्पनाच रहात नाही. मागे–पुढे, उठता–झोपता परमेश्वराचा वरदहस्त प्राप्त होतो. जेव्हा कृपा होऊ लागते तेव्हा अर्जुनाप्रमाणे तुम्हालाही दिव्यदृष्टी प्राप्त होते, समोर दृश्य दिसू लागते, मग तुम्हाला कोणीही भ्रमित करू शकत नाही. हेच प्रत्यक्ष दर्शन होय, जी एक जागृती आहे व ती गीतेच्या माध्यमातून होते. गीता तुम्हाला तुमच्या विशुद्ध स्वरूपाची प्राप्ती करवून देते. जन्म–मृत्यूच्या चक्रातून मुक्ति देऊन तुम्हाला ह्या लोकी सर्व प्रकारची समृद्धी व अभयपद प्रदान करते.

●

**प्रश्न ७ :- खाण्या-पिण्याने, स्पर्श केल्याने वा समुद्र पार केल्याने धर्म नष्ट होतो का?**

**उत्तर :**– विचार करण्यायोग्य आहे की स्पर्श कशास करावा? जर आपण विकारांना स्पर्श करीत आहात, आसुरी प्रवृत्तीला स्पर्श करीत आहात तर नाश अवश्य होईल – **श्रृंगी की भृंगी करी डारी, पराशर के उदर विदार। रमैया की दुलहन लूटा बाजार।।** साधनेच्या विरुद्ध जर आपण दृष्टी नेलीत तर साधन नष्ट होते. साधना कधी नष्ट होत नाही. कारण भगवत्पथामध्ये आरंभाचा नाश होत नाही.

आता राहिला प्रश्न स्पर्श केल्याने धर्म नष्ट होण्याचा. कोणाही व्यक्तीच्या स्पर्शाने धर्म नष्ट होणे कदापि संभव नसते; कारण भगवान श्रीकृष्ण म्हणतात की पुरुष माझा विशुद्ध अंश आहे. प्रकृति ही गर्भधारण करणारी माता आहे व मी बीजरूपाने पिता आहे, अन्य माता-पिता तर निमित्त मात्र आहेत. "**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।। ( गीता १५/७ )** म्हणून गीतेनुसार कोणत्याही मनुष्याच्या स्पर्शाने धर्म कदापि नष्ट होत नाही; परंतु जर आपण सत्याचा व नित्याचा मार्ग सोडून अनित्याचा मार्ग धराल, त्यास स्पर्श कराल तर विनाश अवश्य होईल. जर ह्या जन्मी मुक्ति मिळणार असेल तर एक-दोन जन्म आणखी घ्यावे लागतील.

गीतेनुसार यज्ञ (ज्याच्या परिणामी सनातन ब्रह्माचे दर्शन व त्यामध्ये स्थिती प्राप्त होते.) करण्याचा अधिकार त्या सर्वांना आहे, ज्यांना मानव शरीर प्राप्त झालेले आहे. भगवंत म्हणतात - अर्जुना! यज्ञ रहित (गीतोक्त साधनारहित) पुरुषास पुन्हा मनुष्य शरीरही प्राप्त होत नाही तर स्वर्ग कोठून प्राप्त होणार? ज्यांना मानवी शरीर प्राप्त झालेले आहे, त्या सर्वांनी यज्ञ केला पाहिजे. समाजातील उच्च-नीच जाती ह्या त्या त्या काळातील समाज व्यवस्थेचा भाग होत्या. ज्या वर्गातील लोकांची मिळकत बळकट आहे असे लोक गरीब वर्गाकडून कामे करून घेऊ लागले. असा उतार-चढाव तर कायम चालत आलेला आहे. ज्या समूहांमध्ये फूट पडते त्या समूहांवर एकत्रित असलेले-संघटित राहिलेले समूह सत्ता गाजवतात. बुद्धिवान भोक्ता असतो व बुद्धिहीन भोजन होतो. परंतु ईश्वर-पथामध्ये ह्या विषमतेचे काहीही मूल्य नसते. ह्या वाईट गोष्टी आपणच निर्माण केलेल्या आहेत. धर्मामध्ये त्यांना कोणतेही स्थान नाही.

त्याचप्रमाणे एकमेकांबरोबर खाण्या-पिण्याने धर्म नष्ट होण्याऐवजी उलट प्रेमभाव वाढतो. भगवान श्रीकृष्ण म्हणतात, "हा आत्मा अच्छेद्य आहे. अदाह्य आहे. पाणी त्यास ओले करू शकत नाही, आकाश त्यास स्वतःमध्ये समावून घेऊ शकत नाही. तो सर्व व्यापक, अचल, स्थिर रहाणारा व सनातन आहे." तुम्ही कोण आहात? सनातन धर्माचे अनुयायी! सनातन कोण आहे? आत्मा! जर तुम्ही आत्म्यापर्यंत पोहोचण्याचा विधि जाणत नसाल तर तुम्ही सनातन धर्मही जाणत नाहीत. खाणे-पिणे तर दूरच परंतु प्रकृतिमध्ये उत्पन्न झालेली कोणतीही वस्तू त्या सनातनास स्पर्शही करू शकत नाही. तेव्हा सनातन धर्म स्पर्श करण्याने, खाण्याने नष्ट कसा होईल?

समुद्र पार केल्याने धर्म नष्ट होतो ही सुद्धा एक भ्रामक कल्पना आहे. आमचे तर असे म्हणणे आहे की समुद्र पार करणे हाच धर्म आहे, पार न करण्याने धर्म अवश्य नष्ट होतो. संसार हा एक समुद्र आहे. तो पार करण्यासाठीच तर तुम्ही आम्ही चालत असतो. भगवान श्रीकृष्ण म्हणतात – जे अनन्य भावाने मला समर्पित होतात, त्यांना मी "संसारसागरात्–" संसाररूपी समुद्रामधून पार नेतो.

**भवसिंधु अगाध परे नर ते। पद पंकज प्रेम न जे करते।। ( मानस ७/१३/५ )** जे पावन परमेश्वराच्या चरण–कमलांवर प्रेम करीत नाहीत ते अथांग भवसागरात पडलेले आहेत. आपल्याला, परमेश्वराला शरण जाऊन, हा भवसागर पार करावयाचा आहे. समुद्र पार केल्यानेच शाश्वत स्थिती प्राप्त होते.

समाजात असे प्रचलित आहे की समुद्र पार करू नये, फल्गु नदी पार करू नये, कर्मनाशा नदीमध्ये पाय टाकू नयेत नाहीतर धर्म–कर्म नष्ट होते. अशाप्रकारच्या चाली–रितींना वा अंधविश्वासाला धर्मामध्ये कोणतेही स्थान नाही. सीता जेव्हा लंकेहून अयोध्येला परत आली तेव्हा सर्वजण तिच्याकडे आदरानेच बघत होते. श्रीरामांनी समुद्र पार केला, हनुमान समुद्र पार करून परत आले, त्याचप्रमाणे सर्व वानर सेना, अस्वलें समुद्र पार करून गेली व परत आली. श्रीरामांना जेव्हा विजय मिळाला, तेव्हा सर्व देवता त्यांना अभिवादन करण्यासाठी आल्या. ब्रह्मदेवांनी वानरसेनेचीही प्रशंसा केली की – **कृतकृत्य विभो सब वानर ये। निरखन्ति तवानन सादर ए।। ( मानस ६/११०/९ )** ब्रह्मदेवांनी वास्तविक वानर भ्रष्ट झाले, त्यांचा धर्म नष्ट झाला असे म्हणावयास हवे होते. परंतु ते तर स्तुति करू लागले. वानरांस वशिष्ठ इत्यादींचा स्नेह प्राप्त झाला. भगवान श्रीरामांनी त्यांस आपला सखा मानले. तेव्हा हा समज निराधार आहे की समुद्र पार केल्याने धर्म नष्ट होतो.

सृष्टीमध्ये जर जल नसेल तर जीवाची उत्पत्तीच असंभव आहे – **छिती जल पावक गगन समीरा। पंच रचित अति अधम शरीरा।। ( मानस ४/१०/२ )** शरीर हे पंचमहाभूतांनी निर्माण झालेले आहे. वैज्ञानिकांचे असे म्हणणे आहे की मानव शरीरात ९४ टक्के द्रव पदार्थ असतो. संत कबीरांनी म्हटले आहे '**पानी केरा बुलबुला, अस मानुस की जात।**' तर कोणी त्यास दवबिंदूची संज्ञा दिलेली आहे. पृथ्वीतलावर जे काही पाणी वापरले जाते ते सर्व समुद्रापासूनच मिळते. पृथ्वीवर भूभागाच्या तिप्पट क्षेत्रफळ हे पाण्याने व्यापलेले आहे. पाण्यामध्येही

जीवसृष्टी आहे. ही जीवसृष्टी पाण्यात असलेलाच ऑक्सीजन ग्रहण करते. तेव्हा असा हा समुद्र पार केल्याने वा न केल्याने धर्मावर काहीही परिणाम होत नाही. परंतु ईश्वर-पथामध्ये चिंतनात मग्न असलेला साधक जर संसारसमुद्रात पाय ठेवेल, काम-क्रोध-लोभ-मोह इत्यादींच्या दिशेने जाऊ लागेल तर त्याची साधना नष्ट होईल. समूळ नष्ट तर होणार नाही, परंतु लक्ष्य प्राप्तिमध्ये विलंब होऊ शकतो.

**बिरति चर्म असि ग्यान मद, लोभ मोह रिपु मारि।**
**जय पाइअ सो हरि भगति, देखु खगेस बिचारि।।**
**(मानस, उत्तरकांड, १२० ख)**

वैराग्य ही ढाल आहे व ज्ञानाची तलवार. मद, मोह, लोभ हे शत्रु आहेत. ह्या शत्रूंचा वध करून जो विजय प्राप्त केला जातो त्याचे नाव आहे हरिभक्ति. संसार हा षड्विकारांचा प्रसार आहे. साधक साधनेपासून विचलित होऊन जेव्हा ह्या विकारांकडे उन्मुख होतो तेव्हा तो चूक करतो, त्यास पुन्हा भगवत्पथावर फिरून यावे लागते. ह्यामध्ये बीजाचा नाश होत नाही. साधनेचा स्वल्प अभ्यास जरी झाला असला तरी पुढच्या जन्मी जेथे साधना थांबली होती तेथूनच पुढे चालू होते. विचलित होण्याने मार्ग थोडा लांब व कठीण होतो.

समुद्र सुद्धा सृष्टीच्याच अंतर्गत येतो. सृष्टी योगाचा एक भाग आहे. अतिशय दुःखद आहे. त्याच्या पलिकडे जाण्यासाठी दुर्लभ मानव शरीर मिळालेले आहे. मानव शरीर काय भारतातच आहे? आपण पशु, किटक, वनस्पती नसून मानव आहोत. मानव हा योगाचा भाग आहे. महाराज मनुपासून जन्मल्यामुळे सर्व मनुज आहेत. मानव आहेत. '**स्वयंभू मनु अरु सतरुपा। जिन्ह ते भै नर सृष्टि अनूपा।। (मानस १/१४१/१)** याचा अर्थ अनुपम म्हणजेच ज्याची कोणतीही तुलना नाही, अशी एक शुद्ध सृष्टी तयार झाली. अशाप्रकारे संपूर्ण सृष्टीतील मानव हे महाराज मनुचे शुद्ध अंश आहेत, ज्यांच्या शिवाशिवीने धर्म नष्ट होण्याचा प्रश्नच नाही.

रामचरित मानसमध्ये म्हंटले आहे की भगवान श्रीरामांनी स्वतः एक सभा बोलावून सर्वांना समजावले - "**बडे भाग मानुष तनु पावा। सुर दुर्लभ सब ग्रंथन्हि गावा।।" (मानस ७/४२/७)** मोठ्या भाग्याने हे मानव शरीर मिळालेले आहे. ते देवतांनाही दुर्लभ आहे. देवताही ह्या नर शरीराची आशा करतात. देवतांच्या

तुलनेत आपल्याकडे त्यांच्यापेक्षा एक वस्तू जास्त आहे. देवलोकामध्ये देवता असीम सुखाचा उपभोग अवश्य घेतात, परंतु पुण्य क्षीण होताच "**क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।" ( गीता ९/२१ )**, तेथून मृत्युलोकात येऊन पडतात. देवराज इंद्र अजगर होऊन पडले तर कोणी सरडा झाले. हे निश्चित नसते की पुन्हा त्यांना दुर्लभ मानवतन मिळेल. देवलोकात ते सुख अवश्य भोगतात परंतु नवीन साधना करून स्वतःचे परमकल्याण करून घेऊ शकत नाहीत. तसे करण्याचे माध्यम हे दुर्लभ मानव शरीर आहे. हे साधनेचे धाम आहे, मुक्तीचे द्वार आहे. असे दुर्लभ मानव शरीर प्राप्त होऊनही जो स्वतःचे कल्याण करून घेत नाही –

**सो परत्र दुख पावइ, सिर धुनि धुनि पछिताइ।**
**कालहि कर्महिं ईश्वरहि, मिथ्या दोष लगाइ।।**

**( मानस ७/४३ )**

त्यास जन्मोजन्मी दुःख प्राप्त होते, स्वतःचे डोके आपटून त्यास पश्चात्ताप करावा लागतो. काळ, कर्म व ईश्वरास तो व्यर्थ दोष देत रहातो. मनुष्य नेहमी असे बहाणे सांगतो की वेळ अनुकूल नाही (काळाला दोष देणे), नशिबात लिहिलेले नाही (कर्माला दोष देणे), कर्ता–धर्ता तर परमेश्वर आहे, तो करवून घेत नाही (ईश्वराला दोष देणे); परंतु भगवान श्रीराम म्हणतात की असे दोष देणे व्यर्थ आहे. दुर्लभ मानव शरीर प्राप्त झाले असूनही भवसागर पार केला नाही तर तो सर्व दोष आपला आहे. मानव शरीर हे साधना करण्याचे ठिकाण आहे, अशी साधना जी मोक्षापर्यंत आपल्याला घेऊन जाईल. श्रद्धा, समर्पण, विवेक, वैराग्य, साधना असे जे काही हवे त्या सर्व गोष्टींनी युक्त असे दुर्लभ मानव शरीर परमेश्वराने निर्माण केलेले आहे. म्हणून ह्या शरीरास स्पृश्य वा अस्पृश्य म्हणणे म्हणजे परमेश्वराची आज्ञा अनभिज्ञ असणे होय. अशाप्रकारे भवसागर पार केलाच पाहिजे. बाहेरच्या जगात जितके समुद्र आहेत ते सर्व उपयोगी आहेत. जगामध्ये समुद्र नसते तर पृथ्वीसुद्धा इतर ग्रहांसारखी जीवरहित झाली असती, जेथे पाण्याच्या अभावी जीवाचे अस्तित्व नसते. समुद्र पार केल्याने धर्म नष्ट होत नाही. हां! संन्यासी जर साधना सोडून वासनांच्या समुद्राकडे आपले पाऊल टाकेल तर ही गोष्ट अवश्य चिंताजनक आहे. त्याने स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारल्यासारखे आहे. तो साधना करू शकला

असता, परंतु अनावधानाने विषयांशी संबंध आल्याने त्यास एखादा जन्म आणखी घ्यावा लागतो. धर्म नष्ट होण्याची चिंता अशावेळेसही नसते.

●

**प्रश्न ८ :- धर्मामध्ये प्रवेश मिळण्याचा अधिकार कोणाला आहे?**

**उत्तर :–** धर्मामध्ये प्रवेश मिळण्याचा अधिकार समस्त मानवमात्रास आहे. भगवंत म्हणतात – **''अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्।' ( गीता ९/३३ )** – क्षणभंगुर परंतु दुर्लभ अशा मानव शरीरास प्राप्त करून माझी साधना कर – म्हणजेच सर्वांना प्रवेश आहे. समुद्रामध्ये बुडत असलेल्यास किनाऱ्याला येण्याचा अधिकार सर्वप्रथम आहे. जो जंगलात वाट चुकलेला आहे त्यास योग्य वाटेने घरी परतण्याचा अधिकार आहे. म्हणून अत्यंत पाप करणाऱ्यांपेक्षाही अधिक पापी असला तरी गीतोक्त ज्ञानाच्या द्वारे निःसंदेह त्याचा उद्धार होतो, अमृतमय पद तो प्राप्त करू शकतो. साधनेचा अधिकार दोन हात–दोन पाय असणाऱ्या मनुष्यांना आहे.

लोक म्हणतात की माझ्यामध्ये साधना करण्याचा संस्कार नाही. निषादराज गुह मध्ये सुद्धा एकही शुभ संस्कार नव्हता –

**साधु समाज न जाकर लेखा।**
**राम भगत महुँ जासु न रेखा।।( मानस, २/१८९/७ )**

नशिबात राम–भक्तीची रेषाच नव्हती, परंतु

**राम कीन्ह आपन जबही तें।**
**भयउँ भुवन भूषन तबही तें।।( मानस, २/१९५/२ )**

ज्यास भगवान श्रीरामांनी आपलेसे केले आहे तो तीनही लोकांत पवित्र होतो. निषादराज म्हणूनच भक्त शिरोमणि झाले. नशिबात लिहिलेले नसले तरी काही बिघडत नाही, इतके तर लिहिलेले आहे की आपण मनुष्य आहात. मनुष्य शरीर प्राप्त झालेले आहे इतके पुरेसे आहे. मनुष्य कर्मांचा निर्माता आहे, संस्कारांचा रचयिता आहे. केवट अशाच कुळातील होता. लहानपणापासून त्याच्या मनात येई की आपले वडील–आजोबा आयुष्यभर एका तीरावरून दुसऱ्या तीरावर नाव नेत, कठोर परिश्रम करत शेवटी मरून गेले. जीवनात एवढेच ध्येय असते की

ह्याच्याही पुढे जाऊन आणखी काही सत्य असते? तो विचारांमध्ये तल्लीन झाला. समज वाढली तसतसा तो चिंतनात मग्न होऊ लागला. परमेश्वराच्या विरहाने नाव चालविणेच विसरून गेला. भगवान श्रीरामांना त्यांचा मार्ग बदलून त्याच्याकडे यावे लागले. त्यास बोलवावे लागले. त्याने श्रीरामांना नावेतून नदीपार नेले व त्याचाही उद्धार झाला. अशाप्रकारे कोणत्याही मानवी शरीरास साधनेमध्ये प्रवेश आहे.

मनुष्य कितीही क्षूद्र असला तरी गीतोक्त पद्धतीने त्याच्यामध्ये साधना जागृत होते. अन्नाची सर्वात अधिक आवश्यकता त्यास असते जो चार दिवस भुकेला आहे. म्हणूनच पापी लोकांना सर्वप्रथम साधनेमध्ये प्रवेश आहे. ज्या लोकांमध्ये पाप अधिक असते त्यांना धर्मामध्ये प्रवेश नाही, असे म्हणणारे लोक भ्रमित झालेले असतात. पुण्यात्मा तो असतो जो पूर्णत्वाकडे वाटचाल करतो व पापी तो असतो जो जाणून-बुजून आसुरी प्रवृत्तींनी लिप्त असतो, परंतु बहुसंख्य लोक ना पापात्मा असतात ना पुण्यात्मा. गीतेमध्ये म्हंटले आहे की '**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।' ( २/६९ )** जगत् रूपी रात्रीमध्ये सर्व निश्चेष्ट पडलेले आहेत. ते ना पापात्मा आहेत ना पुण्यात्मा आहेत. ते निश्चेष्ट आहेत, अनभिज्ञ आहेत. केवळ संयमी पुरुष जागा असतो. सर्व अचेत प्राण्यांमध्ये जो कोणी गीतोक्त साधनेचा अभ्यास करून, साधना समजून घेऊन त्याप्रमाणे चार पावले पुढे जातो तो जागा असतो. तो आपल्या शुद्ध स्वरूपाकडे, मोक्षाकडे उन्मुख होतो, जेथे मृत्यू नसतो. तेव्हा धर्मामध्ये प्रवेश मिळण्याचा अधिकार मानव शरीराला आहे, भले तो सृष्टीमध्ये कोठेही जन्मलेला असो.

●

**प्रश्न ९ :- ग्रंथ, संप्रदाय ह्यांना 'धर्म' ही संज्ञा कशी मिळाली?**

**उत्तर :-** पूज्य गुरुदेव (श्री परमानन्दजी महाराज) म्हणत, "**गुरु के रियाज पर घमंड करे चेला।**" संयम तर गुरु महाराजांनी केला व स्थिति प्राप्त केली, परंतु शिष्यवर्ग मात्र त्याप्रमाणे साधना न करता शेखी मिरवायला लागतात की आमच्या गुरुंनी हे केलं, ते केलं. आमचे गुरु महाराज असे होते वगैरे. ते स्वतःचे परिक्षण करत नाहीत की आपण काय आहोत? अकारण अतिशयोक्ती करून जेवणाखाण्याची व्यवस्था मिळू शकते, त्यापेक्षा अधिक काही मिळत नाही. महापुरुष समाजामध्ये कधीही फूट पाडत नाहीत. जर एखादा फूट पाडत असेल तर तो अजून मार्ग हरवलेला पथिक आहे. महापुरुषाच्या जागी जेव्हा कोणी अयोग्य

व्यक्ती गादीवर बसतो तेव्हा ग्रंथ, संप्रदाय, परस्पर विरोधी आचार-विचार ह्यांचे सृजन होऊ लागते.

●

**प्रश्न १० :- धर्माच्या नावावर परस्परांमध्ये फूट पडण्याचे कारण काय?**

**उत्तर :-** धर्म एकच आहे. कोणता दुसरा धर्म असेल तर तो भ्रम आहे. धर्म कधी फूट पडण्याचे कारण बनूच शकत नाही. केवळ धर्मच माणसांना एका परमेश्वराची लेकरे मानून एकमेकांशी जोडतो, अन्य सामाजिक व्यवस्था तर त्यांना एकमेकांपासून तोडतात. धर्मामध्ये एकाच साधकाच्या अवस्थेचे प्रकार असू शकतात. वरच्या-खालच्या इयत्तांचे स्तर असू शकतात. ज्याप्रमाणे शिशु वर्गातील मुले आपापसात भांडतात, कोणाची पेन्सील तोडतात, कोणाला मारतात. त्यांची अवस्था कमी स्तरावरची असते.

परमात्मा एक आहे. त्यास प्राप्त करण्याचा विधीही एकच आहे. त्या विधीप्रमाणे आचरण करणे म्हणजे धर्माचरण. साधना आरंभिक अवस्थेची असू शकते. तोच साधक मध्यम अवस्था प्राप्त करू शकतो. कोणी संघर्षशील क्षत्रिय श्रेणीचा होऊ शकतो. विकार समाप्त होताच परमात्म्यामध्ये विलीन होण्याच्या योग्यतेचा, ब्राह्मण स्तराचा होऊ शकतो. स्तर वरचा खालचा होऊ शकतो परंतु धर्म वेगळा होऊ शकत नाही.

धर्माच्या नावावर फूट आणि संघर्ष कदाचित गादी मिळवण्यावरून होत असतील व ती प्राप्त होताच ते शांतही होतात. विशिष्ट वेशभूषा व केस असतील तर ते धर्माप्रमाणे आहे. हे सर्व तोपर्यंत ठीक आहे जोपर्यंत साधना जागृत होत नाही. जेव्हा धर्माची धुरा आसुरी प्रवृत्तीवाले सांभाळतात तेव्हा असे संघर्ष वाढतात.

●

**प्रश्न ११: - धर्मामध्ये उच्च-नीच भेद, रंग-भेद, वंश-भेद व लिंग-भेदाला कोणते स्थान आहे?**

**उत्तर :-** धर्मामध्ये उच्चनीच, रंग-भेद, वंश व लिंग भेदाला कोणतेही स्थान नाही. हवामान तसेच तापमानातील फरकामुळे त्वचेच्या रंगामध्ये परिवर्तन होत रहाते. अतिउष्ण प्रदेशात रहाणाऱ्यांचा रंग काळा असणे स्वाभाविक आहे. थंड

प्रदेशातील लोकांचा रंग गोरा असतो. समशीतोष्ण हवामान असलेल्या प्रदेशातील लोकांचा रंग गव्हाळ असतो. ही तर तापमानाची देणगी आहे. धर्माचे ह्या गोष्टीशी काहीही घेणे-देणे नाही. गीतेनुसार "शरीर एक वस्त्र आहे. जसे मनुष्य जुने वस्त्र टाकून नवीन वस्त्र धारण करतो त्याचप्रमाणे भूतादिकांचा स्वामी आत्मा शरीररूपी वस्त्राचा त्याग करून नवीन शरीर धारण करतो." रंग-भेद, वंश-भेद हे त्या वस्त्राचे भेद आहेत, तुमचे नाही. आत्मा शुद्ध आहे, तत्त्व आहे, परमसत्य आहे. तोच आपले निज स्वरूप आहे. साधनेच्या योग्य फेऱ्यामध्ये पडल्यावर मनुष्य तेथेच पोहोचतो जेथे आत्मा विदित होतो व तो आत्म-तृप्त, आत्मस्थित होतो. बाह्य-भेद तर प्रकृतीने निर्माण केलेले आहेत. ईश्वर-पथामध्ये कोणताही भेदभाव नाही. -

**नाम जपत कुष्ठी भला, चुइ चुइ गिरे जो चाम।**
**सुघर देह किस काम की, जिस मुख नाहीं नाम।।**

भगवान श्रीकृष्ण गीतेमध्ये म्हणतात - पुरुष क्षर असतो किंवा अक्षर. तो एक तर इंद्रियांच्या स्तरावर जीवन जगतो अथवा संयमाच्या स्तरावर जगतो. जगामध्ये मनुष्याच्या फक्त ह्याच दोन श्रेणी आहेत. तिसरी श्रेणी म्हणजे अनिर्वचनीय, जो शाश्वत परमात्मा आहे. ही श्रेणी प्राप्त होताच ना तो क्षर असतो ना अक्षर. तो कैवल्यस्वरूप असतो, कल्याण-तत्त्व असतो.

●

**प्रश्न १२ : - नरकाचे भय व स्वर्गलोकीची प्रलोभने येथपर्यंतच धर्माचे अंतिम उद्दिष्ट मर्यादित असते का?**

**उत्तर :** - नरकाचे भय दाखविण्याची काय गरज आहे, प्रत्येक व्यक्ती नरकवास भोगत आहे. इच्छा नसतानाही एखाद्या कुटुंबामध्ये लुळे-पांगळे मूल जन्माला येते व पैसा-अडका, सर्व वैभव असूनही चिंता लागून रहाते. श्रीमंती असते, परंतु ती भोगायला वेळ नाही, खायला-प्यायलाही वेळ नाही, रात्रीची झोप लागत नाही. इच्छा नसतानाही कॅन्सर होतो, मुलाचा अपघात होतो. विनाकारण कधीतरी एखाद्यावर आरोप लादले जातात, त्यामध्ये तो अडकला जातो. सृष्टी **'दुखालयं अशाश्वतम्'** - संसार हा दुःखाचा सागर आहे, अशाश्वत आहे, नश्वर आहे. तेव्हा नरकाचे भय दाखविण्याची काय आवश्यकता?

मुले आईच्या मांडीत असतात तोपर्यंत सुखी असतात, परंतु जशी मोठी होतात, त्यांना समज येते तेव्हा सगळीकडे दुःखच अनुभवतात. तेव्हा वेगळे भय दाखविण्याचे औचित्य नाही. सुखमय जीवन हाच स्वर्ग व दुःखमय जीवन हा नरक आहे. स्वर्ग व नरक ह्या संसाराच्याच दोन सीमा आहेत. मानस मध्ये म्हटले आहे -

**कहँहिं बेद इतिहास पुराना। विधि प्रपंचु गुन अवगुन साना।।**
**दानव देव ऊँच अरु नीचू। अमिय सुजीवनु माहुरु मीचू।।**
**सरग नरक अनुराग बिरागा। निगमागम गुन दोष बिभागा।।**
**( मानस, १/५/२-५ )**

अर्थात् स्वर्ग-नरक, देव-दानव, सुख-दुःख, पाप-पुण्य, दिवस-रात्र हा सर्व विधात्याचा प्रपंच आहे. काही सद्गुणांची नावे तर काही दुर्गुणांची नावे आहेत, परंतु प्रपंचाचाच भाग आहेत. स्वर्ग प्राप्त झाला तरी त्याचा शेवट दुःखद होतो. सर्व देवतासुद्धा शेवटी पतित होऊन येथेच आल्या. "**क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।**" - पुण्य क्षीण होताच मृत्युलोकीची यात्रा पुन्हा आरंभ होते.

कुराणामध्ये म्हटले आहे की इबलिस देवता होता, देवदूत होता. त्याच्या हातून जराशी चूक झाली व अल्लाने त्यास स्वर्गातून मृत्युलोकी पाठविले.

जर देवतांचे एवढेच अस्तित्व आहे तर आपल्याला स्वर्गाबद्दल एवढे प्रेम का वाटावे? बाइबलमध्ये म्हटले आहे की 'आदम' आदिमानव होते. स्वर्गामध्ये ते जन्मले व तेथेच रहात असत. त्यांनी केवळ एक फळ खाल्ले तर ईश्वराने त्यास मृत्युलोकी जावयास सांगितले. खूप मोठी शिक्षा दिली. रस्टीकेशन तर एका क्षणात होते. एक फळ काय खाल्ले आणि बाहेर काढले गेले. आमच्याकडे एखादे फळ खाल्ले असते तर आम्ही घरी घेऊन जाण्यासाठी आणखी दहा फळे बांधून दिली असती. तेव्हा हे स्वर्ग-नरक विशेष काहीही नसून समाजाची केवळ व्यवस्था आहे.

ह्या प्रपंचामध्ये केवळ एक परमात्माच शाश्वत सत्य आहे. त्याचे दर्शन, स्पर्श व त्यामध्ये स्थिति मिळण्याआधी जीवाला विश्रांती नाही, दुःखांपासून मुक्ती नाही. भगवान श्रीकृष्ण म्हणतात -

**भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन।**
**ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप।। गीता, ११/५४**

परंतप अर्जुना! अनन्य भक्तिद्वारे, अनन्य ्हणजे अन्य कोणत्याही देव-देवता, भूत-भवानी ह्यांचे चिंतन न करता, पूर्ण श्रद्धेने जो मला भजतो तो मला प्रत्यक्षपणे पाहू शकतो (जसे तू पाहिलेस), स्पर्श करू शकतो व सहजपणे माझ्यामध्ये स्थित होऊ शकतो. त्यास अशी स्थिती प्राप्त होते जी शाश्वत आहे, असे स्वरूप मिळते जे शाश्वत आहे व असे स्थान प्राप्त होते जे शाश्वत आहे.

गीता आपल्याला परमात्म-स्वरूपामध्ये स्थान प्राप्त करून देते, स्वर्गाचे प्रलोभन आणि नरकाचे भय दाखवून सोडून देत नाही. गीता आपल्याला असा जन्म देते की ज्याच्यानंतर मृत्यू नसतो, अशी शांति देते की ज्याच्या पश्चात् अशांति रहात नाही.

स्वर्ग-नरक ह्या संसाराच्या दोन सीमा आहेत. प्राथमिक साधकांना सावधान अथवा प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार वा दंडाच्या स्वरूपात अनुक्रमे स्वर्ग व नरक ह्या परिकल्पना आहेत, परंतु साधना उत्तम प्रकारे चालू झाल्यावर त्यांची आवश्यकता रहात नाही. परमेश्वर स्वतः साधकाचे बोट धरून त्यास चालवू लागतात, जसे रामचरितमानसमध्ये म्हंटले आहे - "**उमा राम सुभाउ जिन्ह जाना। ताहि भजन तजि भाव न आना।।**" - जेव्हा परमेश्वराचा प्रभाव, त्याचा महिमा, त्याचा स्वभाव पहाण्यास मिळतो तेव्हा साधना सोडून दुसरे काहीही रुचकर वाटेनासे होते. सृष्टीमध्ये असे काही नाही जे त्यास साधनेपासून अलग करू शकेल. जोवर ह्या स्तरापर्यंत साधन जागृत होत नाही तोपर्यंत सुख-दुःख प्रभावित करीत असतात. प्रारंभी साधना कशी करावी हे समजवावे लागते, जेव्हा जागृती होते तेव्हा समजवावे लागत नाही. जागृती होताच साधकाच्या हृदयामध्ये जो परमेश्वर असतो तो स्वतः समजावू लागतो. स्वर्ग व नरकाचे त्याच्यासाठी काही प्रयोजन उरत नाही.

●

## प्रश्न १३ : - 'धर्म' एखाद्या राष्ट्रापुरताच मर्यादित असतो का?

**उत्तर :** - राष्ट्र हे वंश, वर्ण, भाषा, भू-भाग वा संप्रदाय इत्यादींवर आधारित भावात्मक एकतेचे संघटन होय, जे तशाच प्रकारच्या दुसऱ्या संघटनांच्या मनुष्यांना भिन्न ओळखण्यास मदत करते. राष्ट्र हे आपली भौगोलिक सीमा असू शकते, परंतु धर्माची नाही. जेथे जेथे मानवाचे अस्तित्व आहे तेथे धर्माचे राष्ट्र आहे. उत्तर ध्रुवापासून

दक्षिण ध्रुवापर्यंत जिथे मानव आहे, त्याच्या हृदयामध्ये जन्म–मृत्यू, जरा–व्याधींचा भयंकर वेग चालू असतो. तो ह्या दुःखांचा अंत व सहज सुखाची प्राप्ती कशी करता येईल हे शोधत असतो. 'धर्म' मनुष्याच्या दुःखांचे निवारण व सहज सुखाच्या प्राप्तीचे साधन असल्याने त्याची सीमा मानव मात्रापर्यंत आहे. आणखीही कोणत्या ग्रहावर मनुष्यप्राणी असलाच तर त्याचाही हाच धर्म आहे. मनुष्य दुःखी आहे. जर दुःखी नाही तर तो संघर्ष का करीत आहे? संघर्ष करून कोणाला हरविण्याचा प्रयत्न करीत आहे? हरवूनही त्याला काही प्राप्त होत नाही, परंतु गीतेमध्ये एक असे युद्ध सांगितलेले आहे की ज्यामध्ये एकदा विजय मिळाला की त्यानंतर कधीही पराभव नसतो. विजय मिळताच मोक्ष, अमृतमय पद प्राप्त होते व जर साधना करीत असताना मोक्ष प्राप्त होण्याआधीच एखाद्याच्या शरीराची वेळ संपली व निवृत्ती मिळाली नाही तरीसुद्धा तो दैवी संपत्ती अवश्य प्राप्त करतो. ईश्वर पथामध्ये बीजाचा नाश होत नाही. त्याचा स्वल्प अभ्याससुद्धा जन्म–मृत्यूच्या महान भयापासून उद्धार करणारा असतो.

'गीता' मानव मात्राचे आदि धर्मशास्त्र आहे. ते दर्शन–शास्त्र आहे. भारतामध्ये त्याची उत्पत्ती झाली म्हणून भारतीयांचा तो गौरव–ग्रंथ आहे. भारताने पूर्ण विश्वाला दिलेली ती एक देणगी आहे. विश्वातील सर्व धर्मशास्त्रांचे उगमस्थान गीता आहे. वेद वगैरे ग्रंथ गीतेताच विस्तार आहेत. कारण गीता प्रथम अवतरली त्यानंतर वेदांची उत्पत्ती झाली.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात – "अर्जुना! हा अविनाशी योग कल्पाच्या प्रारंभी मी सूर्याला सांगितला" कल्प म्हणजे सृष्टी. सूर्याने तो आपला पुत्र मनु ह्यास सांगितला. काही दिले नाही तर केवळ तोंडाने सांगितले. सांगितलेली गोष्ट ऐकून हृदयामध्ये धारण केली जाते, अंतःकरणात जे लक्षात ठेवले जाते त्यास 'स्मृति' म्हणतात. मनूने हे स्मृति–ज्ञान सर्वांना सुलभ होण्यासाठी स्मृतींची परंपरा चालू केली. त्याने ह्या स्मृतीस आपला पुत्र इक्ष्वाकु ह्यास कथन केले. त्याच्याकडून राजर्षींनी जाणले. त्या महत्त्वपूर्ण काळानंतर हा अविनाशी योग पृथ्वीवरून लुप्त झाला होता. "तोच पुरातन योग मी तुला सांगत आह, कारण तू माझा प्रिय भक्त व अनन्य सखा आहेस."

अर्जुनाने भगवंतांना अनेक प्रश्न विचारले, "तुमचा जन्म आत्ता झाला, सूर्याचा जन्म तर खूप आधी झाला, तेव्हा कल्पाच्या प्रारंभी आपणच सूर्याला

सांगितलात हे मी कसे मानू?" अर्जुन प्रश्न-परिप्रश्न करू लागला व भगवंत उत्तरे देऊ लागले. शेवटी अर्जुनाचे समाधान झाले. जे प्रश्न अर्जुन विचारू शकला नाही, जे जीवाच्या समजण्यापलीकडचे होते, असेही काही प्रश्न भगवंतांनी स्वतः विचारले की अर्जुना, ईश्वर कोठे रहातो ते तुला माहीत आहे का? व शेवटी भगवान श्रीकृष्णाने विचारले, "अर्जुना! तू माझा उपदेश एकाग्र चित्ताने ऐकलास का? मोहापासून उत्पन्न झालेले तुझे अज्ञान नष्ट झाले का?" तेव्हा अर्जुन म्हणाला -

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव।। गीता, १८/७**

प्रभु! अज्ञानामुळे उत्पन्न झालेला माझा मोह नष्ट झाला आहे. स्मृतिर्लब्धा - जी सूर्यापासून मनूला, मनूपासून इक्ष्वाकूला अशी स्मृति-परंपरा चालू होती, आज तीच स्मृति मला प्राप्त झाली आहे.

त्या काळी लेखनाचे साधन सहज उपलब्ध नव्हते. श्रुत अर्थात 'ऐका' व स्मृत अर्थात 'लक्षात ठेवा' अशी परंपरा होती. अर्जुन म्हणाला की तीच स्मृति मला प्राप्त झाली आहे. मी तुमच्या आदेशाचे पालन करेन. त्याने धनुष्य उचलले व युद्ध झाले. अर्जुन विजयी झाला. एका धर्मसाम्राज्याची स्थापना झाली. धर्मात्मा युधिष्ठिराचा राज्याभिषेक झाला. धर्मशास्त्राच्या रूपात गीता पुन्हा प्रसारित झाली. अशाप्रकारे 'गीता' हे आपले धर्मशास्त्र सृष्टीच्या प्रारंभी होते, इक्ष्वाकु वंशज श्रीरामाच्या काळात म्हणजे त्रेता युगात होते, त्यानंतर गीता-ज्ञान विस्मृत झाले. भगवान श्रीकृष्णाने ते द्वापार युगात पुन्हा प्रकाशित केले. द्वापार युगात 'गीता' धर्मशास्त्राच्या रूपात पुन्हा प्रतिष्ठित झाली. मध्यंतरी पुन्हा त्यावर प्रतिबंध लावला गेला. - "महाभारत वाचू नका नाहीतर घरामध्ये महाभारत घडेल. तो महाविनाशाचा ग्रंथ आहे." वस्तुतः महाभारत हे आपले संस्कृति-शास्त्र आहे. परमात्म्याचे स्मरण करीत खाणे-पिणे, रहाणे, जीवन-निर्वाह करण्याचा विधि महाभारतात नमूद आहे, पूर्वजांची गौरव गाथा आहे, परंतु त्यावर निर्बंध लावला गेला की ते वाचू नका नाहीतर घरात महाभारत घडेल. महाभारत एवढा मोठा ग्रंथ आहे की तो नीट वाचायला किमान एक वर्ष नक्की लागेल. त्या काळात परिवारात काही दुर्घटना घडणे स्वाभाविक आहे. परंतु त्याचा दोष मात्र महाभारत ग्रंथाच्या पठणाला दिला जाऊ लागला. महाभारतातील 'भीष्म-पर्वा'मध्ये गीता आहे. जेव्हा

महाभारत ग्रंथावरच प्रतिबंध लावण्यात आला, तेव्हा गीता कोण कशी वाचणार? महापुरुषांनी महाभारतातून गीतेला काढून त्याचे स्वतंत्र पुस्तक तयार केले. परंतु गीतेवरही प्रतिबंध लावला गेला की ती केवळ संन्याशांना उपयुक्त आहे. तुमच्या मुलाने जर गीता वाचली तर तो साधु-संन्यासी होईल. तरुणांचे ठीक आहे पण वृद्धांना तरी ती वाचण्याची परवानगी असावी? परंतु असा प्रतिबंध लावला की गीता घरातसुद्धा ठेवू नका, पाहू नका, वाचू नका. वास्तविक गीता हे आपणा सर्वांचे धर्मशास्त्र आहे. आपले धर्मशास्त्र आपल्यालाच बघण्यास बंदी ! गीता-ज्ञान लुप्त होताच अनेक धर्मशास्त्रांची रचना होऊ लागली. ज्याच्या जे मनात येईल ते तो धर्माच्या नावावर रचू लागला व आदरणीय ऋषींच्या नावे खपवू लागला. धर्म, कर्म व यज्ञ ह्याच्या नवीन व्याख्या तयार केल्या गेल्या. 'तेरा ब्राह्मण व चौदा चूली' ही म्हण सार्थक होऊ लागली. 'कनौजी' ही ब्राह्मणांची एक शाखा आहे. त्यांच्यामध्ये एका ठिकाणी अग्नि तयार केला जाई व तिथून अग्नि घेऊन तेरा भाऊ आपापला वेगळा स्वयंपाक करीत. एकमेकांचे स्पर्श केलेले अन्न खात नसत, विस्तवाच्या बाबतही पावित्र्याचे भान ठेवत. – असा होता त्यांचा धर्म ! असे अनेक रीतिरिवाज, वाईट चाली हे धर्मशास्त्र गीता विस्मृत होण्याचे दुष्परणाम आहेत. त्यामुळे समाज विखुरला गेला. आपापसात फूट व राष्ट्राचे विभाजन होण्यास धर्म कारणीभूत बनला. गीता आपले धर्मशास्त्र आहे व असे धर्मशास्त्र असताना कोणताही संप्रदाय, ग्रंथ, कोणत्याही वाईट रीति, धर्म म्हणवणारी कोणतीही भ्रांती निर्माण होऊ शकत नाही. ह्या गोष्टींपासून प्रेरित होऊन वेगळया राष्ट्राच्या मागणीचे सृजनही होऊ शकत नाही. धर्माचे क्षेत्र राष्ट्रापुरतेच मर्यादित नसून समस्त मानवमात्रापर्यंत आहे.

●

**प्रश्न १४ : – धर्मांतर म्हणजे काय? धर्म खरेच परिवर्तनशील असतो का?**

**उत्तर :** – सर्वांचा धर्म एकच आहे, तेव्हा परिवर्तनाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मनुष्याचा स्वभाव दोन प्रकारचा असतो – देवतांसारखा व आसुरांसारखा. दैवी स्वभाव असणाऱ्याचे परिवर्तन झाले तर तो फार तर आसुरी संपत्तीचा शिकार होतो, आणखी काही होत नाही. कोणताही दुसरा धर्म असणे शक्यच नाही. कारण धर्म एकच आहे. हां, आपली अवस्था वरची-खालची, प्राथमिक शाळांप्रमाणे असते. ठराविक सीमेपर्यंत वेग-वेगळी प्रतीत होते, परंतु साधनेची एक ठराविक सीमा पार केल्यावर महापुरुषांसमोर एकच उद्दिष्ट असते. निरीक्षक-परीक्षक एकच होऊन

जातात. त्याच्या निर्देशाप्रमाणे चालण्याचे नावच धर्माचरण होय. ह्या स्तरावरचे साधक एकाच आईची मुले असल्याप्रमाणे एकमेकांशी स्नेहभावाने वागतात. ते धर्मांतराच्या गोष्टी करू शकत नाहीत. धर्मांतराचे झगडे शिशु वर्गातील लोकांचे आहेत, धर्माचे नाहीत.

धर्मात बदल नव्हे, तर त्याचा ऱ्हास होतो. गीतेनुसार एक आत्माच सत्य आहे. त्यास शस्त्रे तोडू शकत नाहीत, अग्नि जाळू शकत नाही, वायु सुकवू शकत नाही, पाणी भिजवू शकत नाही, आकाश त्यास स्वतःमध्ये विलीन करू शकत नाही अर्थात पंचमहाभूतांपासून (पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आकाश) निर्माण झालेला कोणताही पदार्थ आत्म्यास स्पर्शही करू शकत नाही. तेव्हा कोणाच्या हातून दोन घोट पाणी पिण्याने, दोन घास अन्न खाल्ल्याने सनातन धर्म नष्ट कसा होईल? अविनाशीचा विनाश होतो हा भ्रम गीता विस्मृत होण्याचा दुष्परिणाम होता. नित्य, सत्य, सनातन धर्माचे कधी परिवर्तन होऊ शकते का?

गीतेनुसार सत्य, सनातन केवळ आत्मा आहे. त्यास जाणण्याचा विधि, योग-विधि म्हणजे 'यज्ञ' होय. गीतेमध्ये चौदा प्रकारचे यज्ञ समजावून सांगितले आहेत. जसे यज्ञस्वरूप महापुरुषाला शरण, त्याच्या स्वरूपाचे ध्यान, इंद्रियांचा संयम, ॐचा जप, श्वास-प्रश्वासाचे यजन, प्राणायाम इत्यादी. ह्या यज्ञाच्या परिणामी ज्ञानामृत अर्थात अमृतरूपी ज्ञान प्राप्त होते, अजर-अमर-शाश्वत तत्त्व परमात्म्याचे ज्ञान होते व त्या ज्ञानामृताचे सेवन करणारा योगी सनातन ब्रह्मामध्ये स्थित होतो. यज्ञ म्हणजे असा विधि जो सनातन ब्रह्मामध्ये प्रवेश व स्थिति देववितो.

हा यज्ञ ज्या उपायाने संपन्न होतो त्याचे नाव आहे 'कर्म'. तेव्हा नोकरी करणे, शेती करणे ह्या क्रिया करून परमात्मा प्राप्त होत असेल तर अवश्य करा, परंतु तसे होत नाही. हे कर्म शांत-एकांतात सचेतावस्थेमध्ये चिंतनाद्वारे केल्यानेच होते.

सारांश - आत्मा हाच सत्य, नित्य व सनातन आहे. त्यास जाणण्याचा योग-विधि म्हणजे 'यज्ञ'. हा यज्ञ पूर्ण करण्यास 'कर्म' म्हणतात. कर्माच्या परिपक्व अवस्थेत मृत्यूच्या पलीकडे असलेल्या अमृत तत्त्वाचे ज्ञान व त्यामध्ये स्थिति प्राप्त होते. हे कर्म करण्याचे दोन मार्ग आहेत - ज्ञानमार्ग आणि निष्काम कर्मयोग.

ज्ञानमार्गाचा आशय असा नाही की नुसते हातावर-हात ठेवून बसून रहायचे व म्हणायचे की मी शरीर नसून आत्मा आहे, ब्रह्म आहे, पूर्ण आहे. ज्ञानमार्गामध्ये

सुद्धा युद्ध करायचे असते. विजातीय प्रवृत्तींना नष्ट करायचे असते. लाभ–हानि ह्याचा निर्णय स्वतः घेऊन, त्याची जाण ठेवून कर्मामध्ये प्रवृत्त रहाणे हा ज्ञानयोग होय. त्याचे दोन परिणाम असतात – पराभव झाला तर देवत्व व विजय मिळाला तर महामहीम स्थिति प्राप्त होते. '**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।। ( गीता २/३७ )**

भगवंत म्हणतात की हेच आता निष्काम कर्मयोगाच्या संदर्भात ऐक, ज्यामुळे तू कर्मबंधनाचा चांगल्याप्रकारे नाश करू शकशील. भगवंतांनी निष्काम कर्मयोगाचे पहिले वैशिष्ट्य सांगितले की हा योग कर्मांचे बंधन जे जन्म–मृत्यूचे कारण असते त्याचा अंत करतो. दुसरे वैशिष्ट्य सांगताना भगवंतांनी 'धर्म' शब्दाचा प्रयोग केला आहे–

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।। गीता, २/४०**

अर्जुना! ह्या निष्काम कर्मयोगामध्ये आरंभाचा नाश होत नाही. सुरुवात करून तुम्ही दोन पावले जरी पुढे चाललात तरी तुमचा कधी विनाश होणार नाही. पुढच्या जन्मी तुम्ही तिसऱ्या पावलापासूनच सुरुवात कराल व पुढे जाल. प्रकृती केवळ पडदा टाकू शकते व ते सुद्धा तुमचेच आधीचे संस्कार असतात जे आवरण बनतात. काही जन्मांनंतर तुम्ही तेथेच पोहोचता ज्यास मोक्ष म्हणतात, परमगति म्हणतात. जे माझे निजस्वरूप आहे, अमृतमय पद आहे. अशाप्रकारे निष्काम कर्मयोगाच्या दुसऱ्या वैशिष्ट्यावर प्रकाश टाकला की ह्यामध्ये आरंभाचा नाश होत नाही.

तिसरे वैशिष्ट्य असे सांगितले की ह्यामध्ये सीमित फळरूपी दोष नाही. स्वर्ग, वैकुंठ, ऋद्धि–सिद्धि ह्यांमध्ये अडकून तुम्हाला सोडून दिले जात नाही. हे सीमित फळच आहे की ज्याचे प्रलोभन वाटल्याने आपण मार्गात थांबतो. ह्या धर्माचा स्वल्प अभ्याससुद्धा (अर्धा नाही, पाव नाही तर अगदी थोडा अभ्यास) जन्म–मृत्यूच्या महान् भयापासून उद्धार करणारा असतो.

**व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन।**
**बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम्।। गीता, २/४**

अर्जुना! ह्या निष्काम कर्मयोगामध्ये निश्चयात्मक क्रिया एकच असते. काहीही करणे म्हणजे धर्म नव्हे. जेव्हा त्या कर्माला कार्यरूप देण्याचा प्रश्न आला तेव्हा

भगवान श्रीकृष्णांनी 'धर्म' ह्या शब्दाचा प्रयोग केला. ह्या धर्माद्वारे आपण त्या परमात्म्यास धारण करतो ज्यामध्ये निश्चयात्मक क्रिया एक आहे, बुद्धी एक आहे. इतर ज्या अनेक क्रिया सांगितल्या आहेत, त्या करणे म्हणजे साधना नव्हे काय? भगवंत म्हणतात की अविवेकी लोकांची बुद्धी अनंत शाखांची बनलेली असते, त्यामुळे ते अनंत क्रियांचा विस्तार करतात. दिखावटी शोभायुक्त वाणीमध्ये ते त्या व्यक्तही करतात. त्यांच्या वाणीची छाप ज्यांच्या-ज्यांच्या चित्तावर पडते त्यांची बुद्धीही नष्ट होते व ते काहीही प्राप्त करत नाहीत. '**स्वर्गपराः**' - ते स्वर्गालाच सर्वश्रेष्ठ उद्दिष्ट मानतात जेथे ऐश्वर्य मिळते, विषयसुख मिळते. ज्यांना वासनांची आसक्ती आहे तेच लोक त्यांचे ऐकतात व फसतात. जन्म-मृत्यूरूपी फळ देणाऱ्या अनंत क्रियांमध्ये भटकत रहातात. परंतु सर्वजण त्यात फसत नाहीत.

जेव्हा धर्मामध्ये निश्चयात्मक क्रिया एक आहे, दुसरा धर्मच अस्तित्वात नाही तेव्हा धर्म-परिवर्तन कसे होईल? आपल्या साधनेचा स्तर खालचा, मध्यम वा उन्नत असू शकतो, साधनेपासून आपण वासनेकडे विचलित झालो तर ऱ्हास होऊ शकतो, परंतु धर्माचा विनाश होत नाही. रूढींमध्ये परिवर्तन होते, परंपरा-प्रथांमध्ये परिवर्तन होते, परंतु धर्मामध्ये परिवर्तन होत नाही. आपली रहाणी बदलू शकते, पण धर्म नाही.

थोडक्यात धर्म एकच आहे, परमात्मा एक आहे, त्यास धारण करण्याचा विधि एक, त्या विधिप्रमाणे असलेले निर्धारित कर्म एक, साधना जागृत झाली तर मिळणारी सुविधा एकसारखी, निरीक्षण-परीक्षण एकसारखे व परिणाम एक, तो म्हणजे परमात्म्यामध्ये स्थित होणे, अमृतमय-परमपदाची प्राप्ति होणे. असे असताना धर्मांतर कसे शक्य आहे?

साधनेच्या काळात साधकाच्या मनात कधी-कधी सुख-भोगाची इच्छा प्रबळ होते. तो परमेश्वराजवळ स्वर्ग-सुख मागतो, भगवंत म्हणतात की मी त्याला ते देतो -

**ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं।**
**क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।। गीता, ९/२१**

तो स्वर्गाचा उपभोग घेतो व पुण्य क्षीण होताच परत तेथेच येऊन पडतो जेथून आरंभ केला होता. परत त्याच्या वाट्याला दारिद्र्य येते. स्वर्ग-भोग संपतो. सिंहासन लुप्त होते व तो रस्त्यावर येतो, कारण त्याने नश्वर गोष्टच मागितलेली

असते. ते नष्ट होणारच होते. भोग जरी नष्ट झाले तरी त्या भक्ताचा विनाश होत नाही, कारण भगवत्पथामध्ये बीजाचा नाश होत नाही. जेथे आपण थांबतो तेथूनच पुढे जावयाचे असते, तेव्हा धर्मांतर कसे होईल?

विश्वामध्ये एकच धर्माचरण आहे ते म्हणजे परमात्म्यास समर्पण, त्यास संबोधित करणाऱ्या अशा त्याच्या कोणत्याही दोन–अडीच अक्षरांच्या नावाचा जप, तत्त्वदर्शी महापुरुषास शरण व त्यांचे सान्निध्य असे धर्मशास्त्र गीतेमध्ये सांगितलेले आहे.

●

**प्रश्न १५ : – धर्मामध्ये उपासनेच्या स्थळांचे ( देऊळ, मशीद, चर्च इत्यादी ) काय महत्त्व आहे?**

**उत्तर :** – देऊळ, मशीद, चर्च इत्यादी प्रार्थना–स्थळे आहेत. महापुरुष प्रत्येक गावात, नगरात, घरा–घरात जाऊन सत्याचा प्रचार करू शकत नाहीत. पूर्वीच्या काळी महापुरुषांनी शिवलिंगाची स्थापना केली. लिंग म्हणजे चिन्ह. तो ईश्वर एक आहे. तो ज्योतिर्मय आहे व त्या एका ईश्वरास शरण जा. इतकाच शिवलिंगाचा आशय आहे. ज्या महापुरुषांनी ज्योतिर्मय परमात्म्यास प्राप्त केले होते, त्यांच्यानंतर भक्तांनी त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शिवलिंगाची स्थापना केली व त्या महापुरुषाचे नाव त्यास जोडले. कालांतराने त्या ज्योतिर्लिंगांना मंदिराचे रूप आले. मंदिर हे त्या महापुरुषाच्या नंतर त्याच्या श्रद्धाळू भक्तांनी जपून ठेवलेली त्यांची स्मृति आहे.

मंदिर, मशीद, चर्च, गुरुद्वारा ह्यांमध्ये गुरुमहाराजांनी काय प्राप्त केले? कोणता मार्ग दाखविला? हा उपदेश दिला जातो. जर तसा उपदेश दिला जात नसेल व ते केवळ मंदिर असेल तर ते अजून अपूर्ण आहे. भिंती तर काही बोलू शकत नाहीत. महापुरुषांचा उपदेश लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे.

मंदिरांमध्ये अनंतकाळापासून ईश्वर प्राप्त झालेल्या, कैवल्यपद प्राप्त झालेल्या तत्त्वदर्शी महापुरुषांच्या मूर्ति आहेत, सर्वजण त्यांचा आशीर्वाद घेतात, त्या आपल्या प्रेरणा–स्त्रोत आहेत. जर त्या स्मारकांमध्ये हे सांगितले गेले नाही की ती कोणत्या महापुरुषाची मूर्ती आहे, त्यांनी काय उपदेश दिला, तर त्या मंदिराचा दुरुपयोग होईल. जर गीतेनुसार परमात्मा एक असल्याचा संदेश दिला जाईल, त्यास प्राप्त

करण्याचा गीतोक्त विधि सांगितला जाईल तर मंदिराचा सदुपयोग होईल. जर तेथे अनेक क्रियांची धूर्तता सांगितली जात असेल तर समजावे की त्या क्रिया लोकांनी रचलेल्या आहेत, मूढबुद्धी अविवेकी लोकांनी निर्माण केलेल्या आहेत.

मंदिर हे खुल्या पुस्तकाप्रमाणे असते, श्रद्धेचे केंद्र असते. जर त्या मंदिरांमध्ये गीतेनुसार एक परमात्माच सत्य असून त्यास प्राप्त करण्याच्या विधींवर प्रकाश टाकला जात नसेल तर ते मंदिर अशा शाळेसारखे आहे ज्यामध्ये शिक्षक नाहीत, केवळ घंटा वाजते. म्हणून गीतेचे प्रसारण प्रत्येक मंदिरामधून झाले पाहिजे.

महापुरुषांचा जेथे जन्म झाला, त्यांनी जेथे उपासना केली, साधना केली, जेथे उपदेश दिला, जेथे समाधि घेतली अशा सर्व स्थळांच्या ठिकाणी श्रद्धाळू लोकांनी स्मारके बांधली. ती म्हणजेच मंदिर, मशीद, चर्च, गुरुद्वारा. हेच त्यांचे स्पष्टीकरण आहे, ह्या व्यतिरिक्त तेथे काही नाही. धर्माच्या नावावर जितके संप्रदाय, उपसंप्रदाय बनले ते सर्व महापुरुषांच्या नंतर त्यांच्या श्रद्धाळू भक्तांच्या एकत्रित झालेल्या संघटना आहेत, परंतु त्या महापुरुषांनी काय प्राप्त केले? कशी साधना केली? ह्यावर प्रकाश टाकला गेला नाही तर त्यांच्यापासून प्रेरणा कशी मिळणार? आरंभिक प्रेरणा ह्या स्थळांपासूनच मिळते, परंतु संपूर्ण साधना प्राप्त करण्यासाठी मात्र कोणा तत्त्वदर्शी महापुरुषास शरण जावे लागते. त्यांच्याद्वारेच भक्ती जागृत होते. "**भगति तात अनुपम सुखमूला। मिलइ जो सन्त होइँ अनुकूला।।**" **( मानस ३/१५/२ )** लक्ष्मणा! भक्ती अनुपम सुखाचे मूळ आहे, परंतु ती मिळते तेव्हा, जेव्हा संतांची कृपा होते, त्याशिवाय मी सुद्धा देऊ शकत नाही. ती शून्यामध्ये प्राप्त होत नाही. कोणा तत्त्वदर्शी महापुरुषाद्वारा हृदयामध्ये ही साधना जागृत होते. तेव्हा परमेश्वर स्वतः बोलू लागतात, मार्गदर्शन करू लागतात.

●

## प्रश्न १६ : – धर्म कसा प्राप्त करावा?

**उत्तर :** – अर्जुनाने भगवान श्रीकृष्णांना हाच प्रश्न विचारला होता – "प्रभो! ज्या साधनेचे फळ ज्ञानामृत आहे – 'अमृत' म्हणजे जेथे मृत्यूला प्रवेश नाही, जो अजर–अमर–शाश्वत आहे अशा परमात्म्याचे ज्ञान व तत्क्षणी ब्रह्मामध्ये स्थिति – असे ज्ञान मी कसे प्राप्त करू?"

भगवंत म्हणतात,

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः।। गीता, ४/३४**

अर्जुना! कोणा तत्त्वदर्शी महापुरुषाकडे जाऊन, निष्कपट भावाने त्यांची सेवा करून व त्यांना प्रश्न विचारून तू ते ज्ञान प्राप्त कर. ते तत्त्व जाणणारे महापुरुष तुला त्या ज्ञानाचा उपदेश करतील. '**यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव।**' **( गीता ४/३५ )** ते ऐकल्यावर तुला जीवनामध्ये कधीही संदेह निर्माण होणार नाही आणि जेव्हा त्यानुसार तू अभ्यास करशील तेव्हा ते ज्ञान तू तुझ्या हृदय-देशामध्ये प्राप्त करशील. अशाप्रकारे धर्माच्या प्राप्तीसाठी भगवंतांनी तत्त्वदर्शी महापुरुषास शरण जाण्यास सांगितले.

गीतेच्या शेवटच्या अध्यायात भगवंतांनी ह्यावर पुन्हा प्रकाश टाकला - **ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना। ( १८/१८ )** 'परिज्ञाता' म्हणजे पूर्ण ज्ञाता महापुरुष, त्यांच्याद्वारे सांगितले गेलेले साधन अर्थात 'ज्ञान' आणि कोणाची साधना करावी अर्थात 'ज्ञेय' - ह्या तिनही गोष्टी कळताच कर्माची प्रेरणा मिळते आणि '**करणं कर्म कर्तेति' ( १८/१८ )** ह्या गोष्टींमुळे कर्माचा संग्रह होतो.

तेव्हा प्रत्येक अवस्थेमध्ये धर्मास प्राप्त करण्यासाठी कोणा तत्त्वदर्शी महापुरुषास शरण जावेच लागते. दुसरा कोणताही मार्ग नाही. त्यांच्याकडूनच धर्माचा विशुद्ध विधि तुम्ही प्राप्त कराल. पुस्तके वाचल्याने पुण्य-पुरुषार्थाची अभिवृद्धि होऊ शकते, धर्माची जागृती होऊ शकत नाही.

●

**प्रश्न १७ : - ईश्वराचा निवास कोठे आहे?**

**उत्तर :** - हा प्रश्न अर्जुनाने विचारला नव्हता. असे वाटते की इतका सूक्ष्म प्रश्न विचारण्याची त्याची क्षमता नव्हती. म्हणून गीतेच्या समापनापूर्वी जेव्हा अर्जुनाचे सर्व प्रश्न विचारून झाले तेव्हा भगवंतांनी स्वतःच प्रश्न विचारला, "अर्जुना! परमेश्वर कोठे रहातो हे तुला माहित आहे का?" व त्यांनी स्वतः त्याचे उत्तरही दिले -

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।। गीता, १८/६१**

अर्जुना! तो ईश्वर, परमतत्त्व परमात्मा समस्त भूतमात्रांच्या हृदय-देशामध्ये निवास करतो. 'भूत' म्हणजे प्राणी-अर्थात् ईश्वर प्राणिमात्रांच्या हृदय-देशामध्ये निवास करतो.

वैदिक काळापासून 'भूत' हा शब्द अतिशय आदरार्थी वापरला गेलेला आहे. भूत अर्थात् प्राणी. ईश्वर प्राणिमात्रांच्या हृदय-देशामध्ये निवास करतो. इतक्या जवळ हृदयामध्ये असूनही लोक त्याला का पाहू शकत नाहीत? भगवंत म्हणतात - लोक मायारूपी यंत्रावर आरूढ होऊन भ्रमवश भटकत रहातात, म्हणून पाहू शकत नाहीत. मायारूपी यंत्रावर ते स्वतःच धावत जाऊन आरूढ होतात. कितीही समजावले, दिवसभर ज्ञान ऐकून घेतील व शेवटी पवित्रा बदलून सुरा-सुंदरीमध्ये गुंतून जातील.

जर ईश्वर हृदयातच आहे तर आम्ही शरण कोणाला जावे? पुढच्याच श्लोकात भगवंत म्हणतात.

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।**
**तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।। गीता, १८/६२**

अर्जुना! त्या हृदयस्थित ईश्वराला शरण जा. 'सर्वभावेन'-संपूर्ण भावासहित जा. थोडा भक्तिभाव संकटमोचनठायी, थोडा भाव पशुपतिनाथाठायी, थोडा वैष्णव देवीच्या ठायी, थोडा बंबादेवी, मैहर देवी, गडबडा देवी इत्यादींपाशी - आमचा बराचसा भक्तिभाव तर विखुरला गेला. मन तर एकच आहे, त्यातील भाव इतक्या ठिकाणी विभागला गेला. परमेश्वरासाठी तर त्यातील अगदी थोडाच शिल्लक राहिला. अशाने कल्याण होणे शक्य नाही. संपूर्ण भावासहित हृदयस्थित ईश्वराला शरण जावे.

समजा आपण साऱ्या प्रथा मोडून हृदयस्थित ईश्वराला शरण गेलोच तर त्यापासून काय लाभ होईल? '**तत्प्रसादात्परां शान्तिं**' - त्याच्या कृपाप्रसादाने परमशान्ति प्राप्त होईल व '**स्थानं प्रांप्स्यसि शाश्वतम्**' - असे स्थान प्राप्त होईल जे शाश्वत आहे. अजर-अमर आहे. तुम्ही रहाल व तुमचा निवास कायम राहील.

बऱ्याच काळापासून अनेक रूढी चालत आलेल्या आहेत. परंपरेने त्या आपल्याला मिळालेल्या आहेत. लहानपणी आई मुलाला सांगते - 'नमस्कार कर, उदबत्ती लाव, ही अमूक देवी आहे, तो तमूक देव आहे. हे आपले कुलदैवत

आहे' वगैरे. मोठे झाल्यावरही त्या मुलाच्या मनात ह्या गोष्टी घट्ट बसून रहातात. म्हणून भक्तीभाव विखुरला जातो. भगवंत म्हणतात – ह्या सर्व भक्तिभावाला एकत्रित करून हृदयस्थित ईश्वराला शरण जावे. हे पूर्वग्रह आपली पाठ लवकर सोडत नाहीत. जर ह्या पूर्वग्रहांपासून मुक्त होऊन सर्व भावाने शरण गेले तर त्याच्या कृपेने परमशान्ति, मोक्ष, अनंत जीवन, अमृतमय पद आणि समृद्धी प्राप्त होते – त्याचेच नाव निजस्वरूप होय.

हृदयस्थित ईश्वराला तर आम्ही पाहिले नाही तेव्हा कोणाला शरण जावे? श्रीकृष्ण म्हणतात – "मला शरण या", म्हणजेच कोणा तत्त्वदर्शी महापुरुषाला शरण जा.

●

**प्रश्न १८ : – जर परमात्माच सत्य आहे तर देवपूजेचे काय महत्त्व आहे?**

**उत्तर :** – गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी स्पष्ट आश्वासन दिले आहे की माझा भक्त कधी नष्ट होत नाही. ह्या जन्मी त्याचा थोडासा अभ्यास जरी झाला असेल तरी पुढच्या जन्मी त्या स्तरापासून पुढचा अभ्यास चालू होईल. अनेक जन्मांच्या परिणामी तो तेथेच पोहोचेल ज्यास परमगति, परमधाम म्हणतात, जे माझे निजस्वरूप आहे. तरीही ज्यांची बुद्धी कामनांच्या अधीन आहे असे मूढबुद्धी अविवेकी लोक अन्य देवी-देवतांची पूजा करतात. ज्यांची ते पूजा करतात तेथे देवता नावाची कोणतीही सक्षम सत्ता नसते, परंतु मनुष्याची श्रद्धा भूत-भवानीमध्ये, झाडा-झुडपांमध्ये, नदी-नाल्यांमध्ये, ग्रह-उपग्रहांमध्ये जेथे कोठे टिकून असते, त्या श्रद्धेला मीच दृढ करतो, त्याबरोबर फळाची व्यवस्थाही मीच करतो. फळ तत्काळ प्राप्त होते, भोगले जाते व नष्ट होते, परंतु माझा भक्त कधी नष्ट होत नाही.

जर फळ मिळत असेल, तेही आवश्यकतेनुसार तत्काळ मिळत असेल तर भले ते फळ नंतर नष्ट झाले तर काय झाले? तेव्हा देवपूजा करण्यामध्ये काय नुकसान आहे? गीतेच्या नवव्या अध्यायात भगवंतांनी अर्जुनाला म्हंटले आहे – देवपूजा करणारे माझीच पूजा करतात, परंतु ती अविधिपूर्वक असते म्हणून नष्ट होते. जर साधना करायचीच आहे तर विधिपूर्वक का करू नये?

देवपूजा करणाऱ्यांना जर हा बोध झाला की ज्याची मी पूजा करतो तो दुर्बळ आहे, तर ते पूजा करणे सोडून देतील. त्यांच्या बुद्धीनुसार ते सर्वशक्तीशाली,

सर्वत्र व्याप्त, ज्योतिर्मय सत्तेच्या शोधात असतात. हां, केवळ त्यांना विधि ज्ञात नसतो. पुरुष हा श्रद्धेचा पुतळा असतो, कोठे-ना-कोठे त्याची श्रद्धा अवश्य असते. त्याला कोणीही काही दाखविले की तो श्रद्धेने त्याच्यामागे लागतो. अज्ञानावस्थेत तो माझाच पुजारी असतो, मलाच शोधत असतो. कणा-कणात व्याप्त असलेल्या सर्व शक्तिशाली परमात्म्यालाच शोधत असतो. त्याचे पूजणे अविधिपूर्वक असते, म्हणून नष्ट होते.

गीतेमध्ये परमात्म्याला जाणण्याचा विधि सांगितलेला आहे. भगवंत म्हणतात - "अर्जुना! आपल्या दोघांमधील हा संवाद मार्ग चुकलेल्या भक्तांना जो सांगेल त्यापेक्षा मला अधिक प्रिय असे कोणतेही कार्य ह्या विश्वामध्ये नसेल. जो हा संवाद श्रवण करेल, त्याच्याद्वारे मी चांगल्या प्रकारे पूजला जाईन व तो मला प्राप्त करेल. जो केवळ कानाने ऐकेल त्यासही उत्तम लोक प्राप्त होईल. 'गीता' आपले असे धर्मशास्त्र आहे की ते श्रवण केल्याने उत्तम लोक प्राप्त होतो, कथन करणारा मला प्रिय होतो व जो त्यानुसार साधना आरंभ करतो तो मला प्राप्त करतो, माझ्या भगवत् स्वरुपास प्राप्त करतो." परमात्म्यास प्राप्त करण्याचा संपूर्ण विधि म्हणजे 'गीता' आहे.

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः।**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्।। गीता, १६/२३**

हा शास्त्रविधि सोडून अन्य विधींनी जे भजतात, त्यांच्या जीवनात ना सुख असते, ना सिद्धी असते व ना परमगति असते. ते सर्वापासून वंचित रहातात, काही प्राप्त करीत नाहीत. त्यांचे समर्पण व्यर्थ जाते.

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि।। गीता, १६/२४**

म्हणून तुमच्या कर्तव्य व अकर्तव्याच्या बाबतीत हे शास्त्रच प्रमाण आहे. गीता शास्त्र चांगल्या प्रकारे समजून घेऊन त्याप्रमाणे आचरण कर, तू माझ्याठायी निवास करशील.

देवपूजा करणाऱ्या साधकाला साधनेची योग्य पद्धत प्राप्त झालेली नसते. इतकाही नीच नसतो की त्यास नष्ट करावे. तो केवळ वाट चुकलेला असतो, त्यास मार्गदर्शनाची आवश्यकता असते.

**इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ।**
**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्याकृतकृत्यश्च भारत।। गीता, १५/२०**

अर्जुना! हे गुह्य, अत्यंत रहस्ययुक्त धर्मशास्त्र मी तुला सांगितले आहे. ते जाणल्याने तू समग्र अनुभूति, कैवल्यज्ञान आणि परमश्रेय प्राप्त करशील. शास्त्राच्या नावावर इतरत्र भटकून अन्य काहीही शोधत बसू नका. गीता स्वतंत्रपणे एक संपूर्ण शास्त्र आहे, ती अपौरुषेय वाणी आहे. मनुष्याच्या उत्पत्तीच्या आधी गीता प्रकट झाली. ती परमात्म्याने प्रसारित केली.

●

**प्रश्न १९ : - सत्य काय आहे व नश्वर काय आहे?**

**उत्तर :** - गीतेच्या दुसऱ्या अध्यायात अर्जुन म्हणाला - "हे गोविंद! कुलधर्म सनातन आहे, शाश्वत आहे, जातिधर्मच सत्य आहे. अशा नरसंहारानंतर कुळातील स्त्रिया बिघडतील, वर्णसंकर होईल." अर्जुन सामाजिक जीवन, खाणे-पीणे, रहाणी, कुल, जात, वर्ण ह्या गोष्टींना सनातन समजून युद्धापासून विरक्त होऊ पहात होता.

भगवंत हसून म्हणतात, "अर्जुना! ह्या विषम स्थळी हे अज्ञान तुझ्याठायी कोठून उत्पन्न झाले. हे ना कीर्ति वाढविणारे आहे, ना कल्याण करणारे आहे, ना पूर्वीच्या महापुरुषांनी चुकूनसुद्धा त्याप्रमाणे आचरण केले, ना प्रत्यक्षदर्शी महापुरुषांनी तसा उपदेश दिला. तुला हे अज्ञान कोठून आले?"

अर्जुन धर्माच्या रक्षणासाठी प्राण द्यावयास तयार होता. तो कुळाचार, जातिधर्म ह्यास शाश्वत सनातन धर्म मानीत होता, पिंडदान क्रिया लुप्त होण्याच्या विचाराने तो बेचैन झाला होता, तो स्त्रियांना दूषित होण्यापासून वाचवू पहात होता, परंतु ह्या सामाजिक व्यवस्थांना भगवंतांनी अज्ञान म्हणून संबोधित केले. आजच्या प्रचलित स्मृतिंमध्येही हेच लिहिलेले आहे - जगण्याची-खाण्याची पद्धत, नश्वर शरीर व त्याच्या निर्वाहाची व्यवस्था. 'अनार्यजुष्टम्' - श्रीकृष्ण म्हणतात हे अनार्यांसारखे वागणे तू कोठून शिकलास? गीता आर्यसंहिता आहे.

अर्जुनाने तेव्हा प्रश्न केला, "भगवंत! आपणच सांगा की सत्य काय आहे?" भगवंत म्हणतात -

**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।**
**उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः।। गीता, २/१६**

अर्जुना! सत्य वस्तूचा तिनही काळात अभाव नसतो, त्यास नष्ट करणे शक्य नसते व असत्चे अस्तित्व नसते, त्यास थांबविणे शक्य नसते. कारण ते नसतेच. अर्जुना! आत्माच सत्य आहे व भूतादिकांचे शरीर नाशिवंत आहे. प्राणीमात्रांचे शरीर नाशिवंत आहे.

नाशिवंतांच्या यादीत कोण-कोण येते?

**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन।**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते।। गीता, ८/१६**

अर्जुना! सृष्टीची रचना करणारा विधाता व त्यापासून उत्पन्न झालेले संपूर्ण विश्व, देव-दानव-मानव सर्व पुनर्जन्म पावणारे आहेत, दुःखांची खाण आहेत, क्षणभंगूर आहेत, परंतु माझा भक्त कधी नष्ट होत नाही. आत्मा, माझा भक्त, ब्रह्मा, पुरुषोत्तम, परमात्मा इत्यादी त्या एका तत्त्वासाठी वापरलेली संबोधने आहेत, पर्यायवाची शब्द आहेत. शरीर नाशिवंत आहे म्हणून तू युद्ध कर.

●

**प्रश्न २० : - 'अधम' कोणास म्हणतात? 'कर्म' व 'यज्ञ' म्हणजे काय?**

**उत्तर :** - योग-विधि म्हणजे यज्ञ होय व त्या विधिस कार्यान्वित करणे म्हणजे कर्म होय. यज्ञाद्वारे देवतांची उन्नती करावी, देवता तुमची उन्नती करतील. परस्परांची उन्नती करीत परमश्रेय प्राप्त करावे. त्यानंतर दैवी संपत्तीची आवश्यकता उरत नाही व तुम्हीही त्यापासून वेगळे रहात नाही. देवता ही हृदयात असणारी वस्तू आहे.

सोळाव्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात, "अर्जुना! प्राण्यांचे स्वभाव दोन प्रकारचे असतात, देवतांसारखा आणि आसुरांसारखा" दैवी संपत्ति परमकल्याणासाठी असते व आसुरी संपत्ती अधोगती व नीच योनींमध्ये भटकण्यासाठी असते. दैवी संपत्तीची लक्षणे त्यांनी सांगितली जी सर्व एखाद्या महापुरुषाची लक्षणे आहेत, अंशात्मक रूपात आपल्यामध्येही आहेत. जी परमात्म्याचे देवत्व अर्जित करविते तिचे नाव दैवी संपत्ती व जी देवत्व अर्जित न करविता प्रकृतिरुपी अंधःकाराकडे प्रवृत्त करते ती आसुरी संपत्ती होय.

आसुरी संपत्तीस प्राप्त झालेला पुरुष स्वतःला ईश्वर व ऐश्वर्याचा भोक्ता मानतो. तो समजतो की स्त्री-पुरुषाच्या संयोगाने ही सृष्टी निर्माण झालेली असून परमेश्वर नावाची कोणतीही वस्तू अस्तित्वात नाही. माझ्याजवळ इतकी संपत्ती

आहे व आणखी इतकी मला मिळवायची आहे. माझ्या शत्रूंना मीच मारणार. अशाप्रकारे अनंत इच्छा व वासनांनी तो व्यापलेला असतो.

आसुरी संपत्तीस प्राप्त असलेला पुरुष असे म्हणतो की मी यज्ञ करेन, दान करेन व यश प्राप्त करेन. शास्त्रविधि रहित, गीतोक्त नियत विधि रहित नाममात्र यज्ञ करून जे ढोंगीपणाने होमहवन करतात ते क्रूरकर्मी, पापी व मनुष्यांमध्ये अधम असतात. त्यांनी यज्ञाचे आचरण केले तरी ते पातकी असतात, नराधम असतात. यज्ञ करणारा कधी अधम असतो का? हो असतो, कारण त्याने केलेला यज्ञ खरा नसतो. काहीही उलट–सुलट बोलले म्हणजे यज्ञ होत नाही. असा नराधम माझा, अंतर्यामी परमात्म्याचा द्वेष करणारा असतो. एखाद्या मनुष्याने दुसऱ्या मनुष्याचा द्वेष केला तर कदाचित तो वाचू शकेल, परंतु असा नराधम वाचू शकेल का? श्रीकृष्ण म्हणतात – कदापि नाही, अशा नराधमांना मी वारंवार आसुरी योनींमध्ये ढकलतो. परमेश्वराशी शत्रुत्व केल्यावर कसे वाचतील?

तेव्हा योग–विधि म्हणजे यज्ञ, त्यास कार्यान्वित करणे म्हणजे 'कर्म'. निर्धारित कर्म केवळ एकच आहे, अन्य सर्व भ्रामक कल्पना आहेत. ते कर्म आचरणात आणणे म्हणजेच धर्माप्रमाणे आचरण करणे. शास्त्रविधि सोडून मनाप्रमाणे कोणत्याही इतर गोष्टी करणारा व त्यास यज्ञ समजणारा नराधम असतो, अन्य कोणी नाही.

●

**प्रश्न २१ : – वेगवेगळ्या जाती परमेश्वराने निर्माण केल्या आहेत का? वर्ण म्हणजे काय?**

**उत्तर :** – वर्ण हे साधनेचे सोपान आहेत. गीतेनुसार कर्म म्हणजे आराधना, चिंतन. एकाच कर्माला परमेश्वराने चार भागांमध्ये विभागले आहे. **चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभगशः। ( ४/१३ )** चार वर्णांची रचना मी केली. श्लोकाचा केवळ अर्धाच भाग लक्षात घेऊन सहस्त्र जाति, उपजातींमध्ये भारत विभागला गेला व गुलाम झाला. परमेश्वरानेच चार वर्ण निर्माण केले आहेत असे लोक समजू लागले. परमेश्वराने कशाची विभागणी केली ते समजून घेतलेच नाही. त्याने काय माणसांना विभागले का? परमेश्वर म्हणतात '**गुणकर्म विभागशः**' गुणांच्या माध्यमातून कर्माला चार भागांमध्ये विभागले आहे. जर कर्म कोणते ते कळले तर विभाजनही समजेल.

गीतेनुसार '**यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः।**' ( ३/९ ) अर्जुना! यज्ञाला कार्यान्वित करणे म्हणजे कर्म होय. यज्ञ हा एक निर्धारित विधि आहे. त्या व्यतिरिक्त अन्यत्र जे काही केले जाते, ते केवळ ह्या लोकीचे बंधन आहे, कर्म नव्हे. योग्य-विधि, साधन-पद्धतीला कार्यरूप देणे म्हणजे कर्म करणे. कर्म म्हणजे चिंतन, अर्जुना! हे कर्म करून '**मोक्ष्यसेऽशुभात्**' ( ४/१६ ), तू अशुभ अर्थात संसार-बंधनातून चांगल्या प्रकारे मुक्त होशील.

एकाच कर्म-पथाला चार भागांमध्ये विभागले आहे. गुणांच्या प्रभावानुसार आपण जेव्हा चिंतन करतो तेव्हा आरंभी आपले मन एकाग्र होत नाही. तेव्हा आपण अल्पज्ञ असतो, शुद्र असतो, कारण तामसी गुणांचे बाहुल्य असते. अशा दशेमध्ये '**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम्। ( १८/४४ )** – सत्पुरुषांची सेवा व त्यांचे शरण-सान्निध्य ह्यामुळे विधि जागृत होतो, हृदयामध्ये साधना जागृत होते.

विधि जागृत झाल्यावर दैवी संपत्तीचा संग्रह होऊन वैश्य श्रेणी प्राप्त होते. साधना उन्नत होताच संघर्ष करण्याची क्षमता येते व क्षत्रिय श्रेणीमध्ये उन्नती होते. परमेश्वर मनाचा लगाम हाती घेऊन साधकाला चालवू लागतात. त्यांच्या संरक्षणाखाली संघर्षशील होणे ही क्षत्रीय श्रेणी होय. त्यानंतर त्यांच्या आज्ञेचे पालन करणे हीच साधना असते. अंतिम विकार समाप्त होतो, आता कोणताही शत्रु शिल्लक रहात नाही तेव्हा नष्ट कोणाला करणार? अशावेळी ब्रह्मामध्ये विलय पावण्याची योग्यता प्राप्त होते.

**शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च।**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम्।। गीता, १८/४२**

अर्जुना! मनाचे शमन, इंद्रियांचे दमन, मनासहित इंद्रियांनी इष्टदेवतेच्या अनुरूप आराधना करणे, सरळ स्वभाव, धारणा, ध्यान, समाधि, परमेश्वराची ओळख, अनुभव उपलब्ध होणे, ही सर्व योग्यता जेव्हा स्वभावात प्राप्त होते तेव्हा तो ब्राह्मण होतो. अजूनही तो पूर्ण नसतो, सात्विक गुण त्याच्यामध्ये जिवित असतात. परमेश्वराचे दर्शन, स्पर्श, प्रवेश व स्थिति प्राप्त झाली की तो ''**न ब्रह्मणो न क्षत्रियः न वैश्यो न शूद्रः चिदानन्दरूपो शिवोऽहं शिवोऽहम्।।**'' होतो. मग तो कोणत्याही श्रेणीचा कर्ता नसतो, तो परम आनन्दस्वरूप होतो. कैवल्यस्वरूप शिव मात्र शेष रहाते.

गीतेच्या शेवटच्या अध्यायात भगवंत म्हणतात – **ब्राह्मण क्षत्रिय विशां शूद्राणां च परंतप। कमार्णि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः।। ( १८/४१ )** ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्यांच्या कर्माला मी विभक्त केले, '**स्वभावप्रभवैर्गुणैः**' – स्वभावजन्य गुणांनुसार त्यांना प्रवृत्त केले. तामसी गुणांचे बाहुल्य आहे, आळस, निद्रा, उन्माद आहे, दहा तास साधना करायला बसूनही मन मात्र दहा मिनिटे सुद्धा एकाग्र होऊन साधना करू शकत नाही, अशी अवस्था असणारा अल्पज्ञ आहे, शूद्र आहे. त्याच्यासाठी सेवा करणे हेच कर्म होय. सेवा, शरण–सान्निध्याने तामसी गुण क्षीण होऊन जातात, साधनेचा विधि जागृत होतो, राजसी गुण संचार करतात व तोच शूद्र क्रमशः उन्नत सोपानांकडे अग्रेसर होतो.

स्वभाव परिवर्तनशील आहे. एकदा रत्नाकर नावाच्या नीच अपराध्याला जंगलात सप्तर्षि भेटले. रत्नाकराने त्यांस आव्हान केले, "खबरदार! जे काही तुमच्याजवळ आहे ते मला द्या." महात्मा म्हणाले, "वत्सा! तू जंगलात एकटा काय करीत आहेस?" रत्नाकर म्हणाला, "चालाखी दाखवू नका. जे तुमच्याजवळ आहे ते मला द्या." ऋषिंनी विचारले, "इतका नीच अपराध तू कशासाठी करतोस?" तो म्हणाला 'परिवाराच्या उदर–पोषणासाठी.' ऋषि म्हणाले, "तू जे करतोस, त्यामुळे तुला भीषण नरक यातना भोगावयास लागू शकतात. तुझा परिवारही त्या कृत्यामध्ये भागीदार होण्यास तयार आहे का?" रत्नाकर म्हणाला की नक्कीच तयार होईल. ऋषि म्हणाले, "त्यांना तू तसे कधी विचारलेस का?"

त्या ऋषींना बांधून रत्नाकर आपल्या परिवाराला विचारण्यास गेला, तेव्हा सर्वजणांनी साफ नकार दिला व म्हणाले, 'करावे तसे भरावे'. आम्हाला काय माहीत तू काय करतोस ते? आम्ही कोठे तुला डाका टाकावयास सांगितला? रत्नाकर उदास झाला. खिन्न मनाने तो ऋषींना शरण गेला व स्वतःचा उद्धार करण्यासाठी उपाय विचारला.

ऋषींनी त्याचे सांत्वन केले व म्हणाले, "वत्सा! तू अपराधी नाहीस. तू जे काही केलेस ते नादानपणामुळे केलेस. अनवधानाने सापावर पाय पडणे, अचानक वाघ समोर येणे अशा दुर्घटना घडत असतात. तू अनभिज्ञ आहेस. तेव्हा काही हरकत नाही, म्हण 'राम'."

रत्नाकर जन्माचा पातकी असल्यामुळे त्याच्या तोंडून ते पवित्र नाम निघतच नव्हते. तो म्हणाला 'मरा'. ऋषी म्हणाले, "काही हरकत नाही. तू 'मरा'चा जप कर. आम्ही परत येईपर्यंत येथे 'मरा मरा' असा जप करीत रहा. भूक लागली असता ह्या झाडाची फळे खायची व इथले पाणी प्यायचे. कोणाशी बोलायचे नाही व काही पहायचे नाही. केवळ नामजप करीत रहायचे." जिद्दी तर तो होताच, ऋषींच्या आदेशाचे तंतोतंत पालन करू लागला.

बारा वर्षांनी महात्मा जेव्हा परत त्या ठिकाणी आले तेव्हा रत्नाकराची समाधि लागलेली होती. त्याच्या चहुबाजूंना मुंग्यांनी वारूळ केले होते, मातीचा ढीग तयार झाला होता. म्हणून त्याचे नाव 'वाल्मीकि' असे पडले. ऋषींनी त्यास सचेत केले. **'उलटा नामु जपत जगु जाना। वाल्मीकि भये ब्रह्म समाना।। ( मानस २/१९३/४ ) जान आदिकवि नाम प्रतापू। भयऊ सुद्ध करि उलटा जापू।। ( मानस १/१८/३ )** वाल्मीकिंना ब्रह्म समान स्थिति प्राप्त झाली. काय बदल झाला? शरीर तर तेच होते. स्वभावात परिवर्तन झाले. तामसी गुणांचा प्रभाव होता तेव्हा ती व्यक्ती डाकू, दरोडेखोर, खुनी, अनभिज्ञ जीव होती. महापुरुषांना शरण व त्यांच्या सान्निध्याने 'मरा मरा'चा जप करीत अल्पज्ञ स्तरावरची तुटकी-फुटकी साधना आरंभ केली व नंतर ब्रह्मसमान स्थितिवाले झाले.

भगवान श्रीकृष्ण आश्वासन देतात, "अर्जुना! असे कोणतेही पाप नाही जे मला शरण आल्यास नष्ट होत नाही." आपण एकाच जन्मात इतकी प्रगती करू शकतो. वाल्मीकि ह्याच शरीरात डाकू होते, नंतर त्याच शरीरात ब्रह्मर्षि झाले.

वर्ण हे साधनेचे क्रमाक्रमाने उन्नत होणारे सोपान आहेत. समाजातील प्रचलित जाति केवळ समूहांची नावे आहेत. अनेक भावंडे असतील तर त्यांना हाक मारण्यासाठी वेगवेगळी नावे ठेवायलाच हवीत. जाती ह्या कुळ-गोत्र ह्यांची संबोधने आहेत, धर्माशी काहीही त्यांचे घेणे-देणे नाही. जाती बदलत रहातात - गावाच्या नावाने, प्रदेशाच्या नावानेही जाती बनल्या जातात. वंशामध्ये कोणी महान् पुरुष झाला असेल तर त्याच्या नावाने जाती तयार होतात. त्याचप्रमाणे व्यवसायानुसारही जाती तयार झालेल्या आहेत. ह्या सर्व आपल्या पूर्वजांच्या गौरव-गाथा आहेत. धर्माचा त्याच्याशी काहीही संबंध नाही.

गीतेनुसार मनुष्य आस्तिक व नास्तिक, देव–प्रधान वा प्रकृति–प्रधान, देवता वा असुर अशा दोनच जातींमध्ये विभागलेला आहे व 'वर्ण' हे साधनेचे चार क्रमोन्नत सोपान आहेत.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात – **'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।' ( २/६९ )** अर्जुना! हे जग रात्र–सदृश आहे. ह्यामध्ये प्रत्येक प्राणी अचेत असतो, परंतु संयमी पुरुष मात्र सचेत रहातो. जेव्हा गीतोक्त साधना समजते, त्याप्रमाणे पहिले पाऊल टाकले जाते तेव्हा सचेतावस्था येते. **जानिय तबहिं जीव जग जागा। जब सब विषय विलास विरागा।। ( मानस २/९२/२ )** त्यानंतर एकच साधना करावयाची असते व एकाच कर्माच्या क्रमोन्नत सोपानामध्ये प्रवेश प्राप्त होतो.

अल्पज्ञ, क्षूद्र अवस्थेमध्ये प्रथम समर्पणाने आरंभ होतो. साधनेचा विधि जागृत होताच प्रकृतीच्या द्वन्द्वामधून हळू–हळू आत्मिक संपत्ति अर्जित केली जाते, जी खरी संपत्ती असते, निश्चित कल्याण करणारी असते, त्याचबरोबर इंद्रय–संयम साध्य होतो. ही वैश्य श्रेणी होय. परमेश्वराच्या हातातील यंत्र बनून जाण्याची क्षमता येताच संघर्ष झेलण्याची क्षमता येते व हाच क्षत्रिय वर्ण होय. जेव्हा विकार समाप्त होतात, ब्रह्मामध्ये विलय पावण्याची योग्यता येते तोच ब्राह्मण वर्ण. परमेश्‍वराचे दर्शन, स्पर्श आणि प्रवेश प्राप्त झाला की ह्या श्रेण्या समाप्त होतात. आता कर्म केल्याने ना लाभ होतो, ना सोडल्याने काही क्षति होते. प्राप्त करण्या योग्य कोणतीही वस्तू शेष रहात नाही, परमेश्वरही कोणी वेगळा नसतो ज्यास त्याने शोधावे.

हेच गीता–शास्त्रानुसार वर्ण व साधनेचा विधि आहेत. शास्त्र–विधीला सोडून साधना करणे ही कसली साधना? ती एक अनभिज्ञ अवस्था आहे, अन्य काही नाही.

●

## प्रश्न २२ : – शास्त्र कोणते आहे?

**उत्तर :** – 'गीता' मानवमात्राचे धर्मशास्त्र आहे. तेच आदिशास्त्र आहे, वेद त्याचे विस्तार आहेत. भिन्न–भिन्न देशात व काळांमध्ये अनेक महापुरुषांनी विविध भाषांमध्ये जे उपदेश दिले ते गीतेमधील संदेशाचे प्रसारण आहे. 'गीता' एकाच परमात्म्याचे प्रसारण आहे. परमेश्वर अनेक भाषांमध्ये बोलू शकतात. आपण कोठेही साधना करा, कोणतीही भाषा बोलणारे असा, परमेश्वर तुमच्याच भाषेत तुमच्याशी बोलू लागतील. परंतु ही जागृति कोणा तत्त्वदर्शी महापुरुषाद्वारेच होते.

**प्रश्न २३ : - जाती, वर्ण, संप्रदाय व भेदभाव ह्या सर्वांपासून मुक्त असलेले मानवमात्राचे धर्मशास्त्र कोणते?**

**उत्तर :** - धर्मशास्त्र एकच आहे, ते म्हणजे श्रीमद्भगवद्गीता. ती परमात्म्याच्या श्रीमुखाची वाणी आहे व तेच आदिशास्त्र आहे.

●

**प्रश्न २४ : - पूर्ण विश्व भारताच्या आध्यात्मिक विद्येचे ऋणी आहे. भारत विश्वगुरु आहे. तेव्हा त्याचे धर्मशास्त्र कोणते?**

**उत्तर :** - श्रीमद्भगवत्गीता मनुष्यमात्राचे धर्मशास्त्र आहे. सौभाग्याने त्याची उत्पत्ती भारतामध्ये झाली तेव्हा भारतीयांचेही शास्त्र होण्याचा गौरव गीतेला आहे. '**एकं शास्त्रं देवकीपुत्र गीतं**' - एकच शास्त्र आहे जे देवकीपुत्र भगवान श्रीकृष्णाने गायले आहे. त्यामध्ये कोणते सत्य सांगितले आहे? केवळ एक परमात्माच सत्य आहे. मंत्रही केवळ एकच आहे. कोणत्या नावाने त्या परमात्म्यास हाक मारावी? तर ती म्हणजे 'ओम्' ह्या नामाने आणि तेच तत्त्व आहे, तेच परमसत्य आहे. दुर्लभ असे मानवी शरीर प्राप्त झाले आहे तेव्हा आपणा सर्वांचे एकच कर्तव्य आहे, '**कर्माप्येको तस्य देवस्य सेवा**' - त्या परमदेव परमात्म्याची सेवा करावी. उठता-बसता, चालता-फिरता प्रत्येक वेळी त्याची आठवण असावी, प्रभूच्या नामाचे स्मरण रहावे. सकाळ-संध्याकाळ अर्धा तास असे स्मरण करण्यास अवश्य वेळ द्यावा. हवे तर केवळ पाच मिनिटे वेळ देऊन सुरुवात करा परंतु अवश्य करा. एखादी दुर्घटना घडली असली तरीही अवश्य वेळ द्या, नियम खंडित करू नका. परमेश्वर जाणतो की भक्त त्यास हाक मारीत आहे. तो हेही जाणतो की तुम्हाला काय हवे आहे, ते तो देतो. जे मागाल, ते मिळेल.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात - आर्त, अर्थार्थी, जिज्ञासु व ज्ञानी असे चार प्रकारचे भक्त मला भजतात. चारही इमानदार आहेत कारण ज्यास भजायला हवे त्यास भजतात व ज्याच्याकडे मागावयाला हवे त्याच्याकडे मागतात. मागितलेली वस्तू मिळते व परमेश्वराशी संलग्न असल्याकारणाने ह्या पथामध्ये आरंभाचा नाश होत नाही. वस्तूचा उपभोग घेत क्रमशः पुढे जातात व एके दिवशी परमेश्वराचे दर्शन, स्पर्श व त्यामध्ये स्थिति प्राप्त करतात. म्हणून गीता हेच संपूर्ण शास्त्र आहे. आपण ती अवश्य वाचावी.

कधी-कधी साधक माया प्रबळ झाल्यामुळे आणि लोक-व्यवहारासाठी साधनेमध्ये शिथिल होतात, परंतु अशी बाधा साधना जागृत होण्याआधीच्या अवस्थेपर्यंतच येते. एक कथाकथन करणारे पंडित होते. कथेमध्ये ते केवळ सत्यच सांगत असत. एके दिवशी कलियुग, पुरुष-वेशामध्ये त्यांच्याकडे आला व म्हणाला, "पंडितजी! सध्या आमचे राज्य आहे तेव्हा त्याबद्दलही काहीतरी कथेमध्ये सांगावे." पंडितजींनी विचारले, "तू कोण आहेस?" तो म्हणाला, "मी कलियुग आहे."

पंडितजी रागावले व म्हणाले, "नालायक! सकाळी-सकाळी येथे येण्याची तुझी हिम्मत कशी झाली? ह्या माझ्या मुखातून कधीही असत्य बाहेर पडणार नाही. केवळ परमेश्वराचे स्मरण व त्याचेच गुणगान वदले जाईल." कलि म्हणाला, "माझे राज्य आहे तेव्हा ह्यावर काहीतरी उपाय मी नक्की करेन."

पंडितजींच्या प्रवचनाला अपार गर्दी होत असे. दुसऱ्या दिवशी स्वच्छ कपडे घातलेला एक इसम प्रवचनाला आला. तो मधेच मंचाच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करीत होता तर कधी मागे फिरत होता. कधी तोंडात सिगरेट धरत होता. श्रोत्यांनी त्यास मनाई केली व म्हणाले, "आपण असे कसे असभ्य. हजारो लोक येथे शांतपणे गीतेची कथा ऐकत आहेत, जणू अमृत बरसत आहे आणि तुम्ही शांतपणे कथा ऐकू शकत नाही का?" तो म्हणाला, "तुमचे बरोबर आहे पण मी येथे काही कामासाठी आलो आहे व जरा घाईत आहे." लोकांनी विचारले की काय काम आहे. तो म्हणाला, "ह्या पंडितजींकडेच काम आहे. जुगारामध्ये काही कर्ज त्यांच्यावर बाकी आहे. ते म्हणाले होते की कथा सांगितल्यावर पैसे मिळतील त्यातले देईन. बाकी काही नाही. पंडितजी सभ्य माणूस आहेत, ते नक्की परत करतील तेव्हा मी निघतो." तो इसम निघून गेला. परंतु पंडितजी जुगार खेळतात असा प्रचार मात्र झाला.

पाच-सात दिवसातच श्रोत्यांची गर्दी निम्मी झाली. परत एकदा प्रवचनाला एक माणूस आला. सभेमध्ये सर्वात पुढे बसून सारखा चुळबूळ करत होता. मध्येच उभा रहात होता, बसत होता. लोकांनी त्रासून त्याला काय झाले ते विचारले. तो म्हणाला, "काही विशेष नाही. दारूच्या दुकानातील शेठने मला पाठविले आहे पंडितजींकडून पैसे वसूल करायला. पंधरा दिवसांची उधारी आहे." लोकांना वाटले की ह्या पंडितजींना दारूचे सुद्धा व्यसन आहे. आणखी गर्दी कमी होऊ लागली.

काही दिवसांनी असेच एकदा प्रवचन चालू असताना एक फाटका इसम म्हणाला, ''काय पंडितजी? प्रवचनच करीत रहाल का जरा इकडे लक्ष द्याल?'' पंडितजींनी विचारले, ''तू कोण आहेस?'' तो म्हणाला, ''कोठ्यावरच्या बाईने पाठविले आहे. बरेच दिवसांपासून नाच गाण्याचे तुमचे पैसे बाकी आहेत. मिळाले तर बरे होईल. उशीर होत आहे.'' हे ऐकताच जवळ-जवळ सर्व श्रोते निघून गेले. दोन-चार वृद्धच केवळ शिल्लक राहिले. ते पंडितजींची समजूत काढत राहिले.

एके दिवशी कलियुग पुन्हा पंडितजींना एकांतात भेटला. त्याने विचारले, ''कसे चालले आहे?'' पंडितजी म्हणाले, ''कसले-कसले आरोप माझ्यावर लावले जात आहेत, माहीत नाही. आता तर प्रवचनाला लोकही येत नाहीत.'' तो म्हणाला, ''तुमच्या प्रवचनाला परत गर्दी व्हायला लागेल असे मी करतो, परंतु तुम्ही कलीयुगातल्या काही गोष्टी कथेमध्ये सांगा.'' पंडितजी तयार झाले.

दुसऱ्या दिवशी पंडितजींचे प्रवचन सुरू असताना एक पोलिस अधिकारी तीन अपराध्यांना पकडून घेऊन आले व म्हणाले, ''पंडितजी! ह्या तिघांनीच तुमच्या प्रवचनांमध्ये अडथळे आणले, अफवा पसरवल्या होत्या ना? हरिद्वारच्या कुंभमेळयामध्येही ह्यांनीच दंगल केली. हे धर्माचा विरोध करणारे आहेत.'' लगेच तेथे जमलेले लोक म्हणाले, ''साहेब ह्या अपराध्यांना सोडू नका.''

चार वेगवेगळी रूपे घेऊन कलियुगच आलेला होता. त्यानंतर पंडितजींनी कथेच्या शेवटी मध्यम मार्ग अवलंबण्याचा उपदेश दिला. ते म्हणाले की सत्य हे सदैव सत्य असते, परंतु 'जैसी देखो दुनिया की रिति । वैसी उठाओ अपनी भीति' थोडेसे परिस्थितीनुरूप समजून वागणे गरजेचे असते, ते पाप नसते.

''**धरा न काहू धीर, सबके मन मनसिज हरे।**'' प्रकृति जेव्हा साधकाला गुरफटून टाकते तेव्हा साधक स्वतःला हरवून बसतो, परंतु परमेश्वर जेव्हा आपला वरदहस्त ठेवतात, तेव्हा आपल्याला खोटे बोलण्याची आवश्यकता नाही -

**होइ न बाँको बाल भगत को, जो कोई कोटि उपाय करे।**

गीतेत सांगितलेल्या पद्धतीनुसार साधना करणे जेव्हा उत्तम प्रकारे सुरू होते त्यानंतर हा कलियुग धोका देऊ शकत नाही. 'हरि भक्तन के पास न आवें, भूत, प्रेत पाखंड।।' हे सर्व जवळ फिरकूही शकत नाहीत. परंतु जोपर्यंत साधना अविधिपूर्वक असते तोपर्यंत प्रापंचिक गोष्टी चालू रहातात.

●

**प्रश्न २५ : – धर्माच्या नावावर होणारे आतंकवाद, जातीयवाद, भ्रष्टाचार, सामाजिक भेदभाव व विभक्तवाद थांबविण्यासाठी आपला काय संदेश आहे?**

**उत्तर :** – ह्या सर्व समस्यांचे निराकरण गीतेमध्ये आहे म्हणून आमचाही तोच संदेश आहे. एक धर्मशास्त्र व साधनेचा एक उत्तम विधि प्राप्त होताच सर्व मैत्रीच्या नात्याने एकत्रित होतील, धर्माचा साइन बोर्ड घेऊन कोणीही आपसात लढणार नाही.

समाजात भावा–भावांमध्ये भांडणे होत असतात. एक पौराणिक कथा आहे. दोन असुर भाऊ होते. दोघांचे एकमेकांवर अगाध प्रेम होते. दोघांनी अत्यंत उग्र तपस्या करून विधात्याला प्रसन्न केले. ब्रह्माने सांगितले, ''वर मागा.'' ते म्हणाले आम्हाला अमर बनवा. ब्रह्मा म्हणाले, ''मीसुद्धा अमर नाही, तेव्हा दुसरे काहीतरी मागा.'' दोघा भावांनी आपसात चर्चा केली की विधात्याला आपल्याला अमरत्व तर द्यावयाचे नाही, तेव्हा अशी युक्ति करू की त्यानंतर अमरत्वच प्राप्त होईल. विचार करून ते म्हणाले, ''आम्ही दोघे भाऊ जेव्हा एकमेकांना मारू तेव्हाच मरू असा वर द्या.'' ब्रह्मा 'तथास्तु' म्हणाला.

दोघा भावांनी स्वर्गावर आक्रमण केले. इंद्रासनावर दोघेही बसले. सर्वत्र त्यांच्या विजयाची पताका फडकू लागली. जेव्हा मृत्यूची वेळ आली तेव्हा एक सुंदर स्त्री कारणीभूत ठरली. दोघेही तिच्याकडे आकर्षित झाले. एक म्हणाला की तिने प्रथम त्याच्याकडे पाहिले दुसरा म्हणाला, ''नाही, तिने मला वरले आहे. तिच्याकडे वाईट दृष्टीने तू बघितलेस तर ते पाप आहे.'' दोघांमध्ये इतके भांडण झाले की मिळालेला वर विसरून गेले. आपसात लढले व मरण पावले.

सृष्टीमध्ये भांडणे कायम होत आलेली आहेत. कधी धन–संपत्तीसाठी भांडणे होतात, तर कधी जीवन–निर्वाहासाठी होतात. मान–सन्मानावरून कधी विवाद होतात तर कधी कीर्ति प्राप्त करण्यावरून होतात, क्षूद्र यश प्राप्त करण्यावरून होतात. कधी जमिनीच्या मालकीवरून तर कधी सुंदर स्त्रीमुळे भांडणे होतात. हे सर्व चालूच रहाणार, परंतु धर्माच्या नावाखाली तोपर्यंत लढतील जोपर्यंत अनभिज्ञ आहेत. ईश्वर–पथामध्ये अशांति वा आतंकवादाला कोणतेही स्थान नाही. धर्मशास्त्र न समजण्याचा हा दुष्परिणाम आहे. जर 'गीता' हे एक धर्मशास्त्र माणसापर्यंत विधिवत् पोहोचले तर हे भय कायमचे निघून जाईल. आपल्या बुद्धीनुसार गीतेमध्ये

काही नवीन भाग घालू नका अथवा त्यातील काही भाग वगळू नका, एक शब्दही वाढवू अथवा कमी करू नका. जशी आहे तशी पोहोचवा. गीतेमध्ये सातशे संस्कृत श्लोक आहेत, त्यांचे मनन करा व त्या श्लोकांचा अर्थ ज्यामध्ये धर्म म्हणजे काय? कर्म कोणते? वर्ण काय आहेत? यज्ञ म्हणजे काय? तो आचरणात आणून त्याचे पालन कसे करावे? इत्यादी प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत ती व्यवस्थित समजण्यासाठी गीतेची व्याख्या असलेले 'यथार्थ गीता' हे पुस्तक चार वेळा वाचा. त्यानंतर भगवत्गीता तुम्हाला आपलीशी वाटेल. मानवमात्राच्या कल्याण्यासाठी गीतेच्या नियमित अध्ययना शिवाय दुसरा कोणत्याही चांगला मार्ग नाही.

●

**प्रश्न २६ : - जानेवारी २००५ मध्ये कलकत्ता येथे भारतीय सांस्कृतिक संसदेच्या सुवर्णजयंती उत्सवाच्या वेळी संसदेने एका पत्रकाच्या माध्यमातून धर्माचे स्वरूप, धर्म आणि सांस्कृतिक, धर्म आणि राष्ट्र तसेच धर्म आणि विज्ञान इत्यादी विषयांवर महाराजजींची मते प्रकाशित केली, ती मते येथे वाचकांसाठी प्रस्तुत करीत आहोत.**

**उत्तर : – धर्माचे स्वरूप** – 'धर्म' भारत राष्ट्राचा आत्मा आहे. त्या धर्मास 'सनातन धर्म' म्हंटले जाते. 'सनातन' शब्दाचा अर्थ जो शाश्वत आहे अथवा अनादी व अनंत आहे. सनातन धर्माचे सार असे आहे की संपूर्ण विश्वामध्ये एकच शाश्वत सत्य आहे ज्यास वेदांत वा उपनिषदांनी 'ब्रह्म' म्हटले आहे. ब्रह्म हेच परमसत्य आहे. संपूर्ण विश्व (ब्रह्मांड) ब्रह्मापासूनच उत्पन्न झालेले आहे व त्यामध्येच विलीन होते. त्यास अनुक्रमे सृष्टी व प्रलय असे म्हटले जाते. त्या ब्रह्मास जाणण्यासाठी मनुष्य–योनि हे एक सर्वश्रेष्ठ माध्यम आहे.

वर नमूद केलेली धर्माची जी व्याख्या आहे तिला धर्माची उचित, विशुद्ध व्याख्या म्हणता येईल, परंतु वर्तमानामध्ये ही व्याख्या किती लोकांना ठाऊक आहे? कदाचित भारतातील एक टक्का लोकांनासुद्धा ही व्याख्या माहीत नसेल. बहुतेक लोक 'सनातन' ह्या शब्दाचा वेगळाच अर्थ लावतात. तो म्हणजे आपल्या विचारवंत ऋषि–मुनींनी तयार केलेली व परंपरागत चालत आलेली सदाचार–संहिता. ह्या रूढी–परंपरांमध्ये, खाणे–पीणे वा विवाहाच्या नियमांमध्ये परिवर्तन करण्याचे साहस आजच्या अपक्व, बुद्धीवादी पिढीने करता कामा नये. परंपरागत चालत आलेले हे नियम म्हणजेच 'सनातन'.

सध्या भारतातील लोक अस्पृश्यता, भेदभाव व परस्परांमध्ये तिरस्कार ह्या गोष्टींनी दडपले गेलेले आहेत. अधिकांश लोक बंधुभाव, समानता व सद्‌व्यवहार ह्यांसाठी तळमळत आहेत. काही दिवसांपूर्वी जोधपुरमध्ये हरिजनांना देवळात जाण्यास बंदी केली गेली. परमेश्वर काय कोणा विशिष्ट जातीच्या वा वंशाच्या लोकांची मालमत्ता आहे का?

रामायण नीट वाचले तर कळेल की श्रीरामाने उच्च वर्णियांचा उद्धार केला नाही, तर हरिजनांना जवळ केले. हरिजनांपेक्षाही हीन मानल्या जाणाऱ्या असंख्य आदिवासींचा, रानात रहाणाऱ्या जमातींचा त्यांनी उद्धार केला.

गोस्वामी तुलसीदासांच्या रामचरितमानसमध्ये म्हटले आहे की श्रीरामांच्या राज्याभिषेकानंतर कुळाचे पुरोहित महर्षि वशिष्ठांनी श्रीरामांना निवेदन केले – **'उपरोहित्य कर्म अति मन्दा। बेद पुरान सुमृति कर निन्दा।। जब न लेउँ मैं तब विधि मोही। कहा लाभ आगे सुत तोही।।' ( ७/४७/६ ).** "भगवान्! पौरोहित्य कर्म अतिशय नीच दर्जाचे आहे. वेद, पुराण, स्मृति सर्वांनी त्याची निंदा केलेली आहे. मलाही हे पद नको होते. परंतु परमेश्वराने सांगितले की तू हे कर्म कर, त्याने तुला लाभ होईल. ह्याच कुळात पुढे श्रीरामाचा जन्म होणार आहे, जे तुझा उद्धार करतील. तेव्हा तुम्ही मला तुमच्या चरणांची अविरत भक्ति प्रदान करावी." ज्या गुरुंच्या मांडीवर बसून प्रभू रामचंद्र लिहायला–वाचायला शिकले, धनुष्यावर प्रत्यंचा चढवायला शिकले त्यांना ते 'तथास्तु' कसे म्हणतील? श्रीराम मौनच राहिले. वशिष्ठांनी चरणांपाशी सादर प्रणाम केला व निघून गेले. 'मौनं सम्मति लक्षणम्' असे जरी का मानले तरी केवळ एकाच उच्च वर्णियाचा उद्धार श्रीरामांच्या द्वारे झाला, तो सुद्धा जेव्हा त्यांनी चरणांपाशी विनंती केली तेव्हा आणि आज लोक म्हणतात की नीच वर्णियांनी देवळात जायचे नाही!

देवळात बसून कधी कोणा महात्म्याला सिद्धी प्राप्त झाली आहे का? श्रीराम जेव्हा अयोध्येमध्ये होते तेव्हा त्यांना विश्वामित्र भेटले. तेही जंगलातूनच आले होते व त्यांच्या यज्ञाच्या रक्षणासाठी ते श्रीरामाला जंगलात घेऊन गेले. वनवासकाळात प्रयाग येथे जेव्हा श्रीरामांनी वास्तव्य केले तेव्हा तेथे घनदाट जंगल होते. जंगलातच भारद्वाज ऋषि, महर्षि अत्रि, वाल्मीकि, सरभंग, सुतीक्ष्ण, अगस्त्य, शबरी इत्यादी मुनींच्या आश्रमांना त्यांनी भेट दिली. त्या आश्रमांमध्ये चिंतन, कथा–वाचन,

साधना होत असे, मंदिर कोणाजवळही नव्हते. मंदिरात बमसून कधी कोणाला मुक्ती मिळालेली आहे? आणि मंदिरात दर्शनाला येण्यास मनाई करतात!

मंदिरे अनावश्यक आहेत असे नाही. मंदिरांमध्ये आपण आपल्या पूर्वजांच्या, महान विभूतिंच्या आठवणी जतन करून ठेवलेल्या आहेत, जे आपले आदर्श आहेत. आपले आदर्श जीवित असतील तर आपण जीवित राहू व त्यासाठी मंदिरे आवश्यक आहेत. येथपर्यंत ठीक आहे. परंतु परमेश्वर सर्वांचे आहेत, केवळ सवर्णियांचे नाहीत.

परमेश्वराने ज्या लीला केल्या, ज्यांच्या सान्निध्यात ते राहिले ते पुष्कळसे लोक तर अनुसूचित जाति-जमातींचे होते. अधमाहूनही अधम जातीचे होते. "**अधम ते अधम अधम अति नारी शबरी थी।**" (मानस ३/३४/३) वानर अधम होते, निशाचर अधम होते. "**गीध अधम खग आमिष भोगी।**" (मानस ३/३२/२) रानात रहाणारे भिल्ल, आदिवासी अधम होते. ह्या सर्वांचा उद्धार श्रीरामाने आपल्या जीवनकाळात केला. त्या सर्वांना जवळ केले. असा आपला गौरवास्पद इतिहास आहे. अशा महान विभूतीचे मंदिर तर असायलाच हवे. जीवंतपणी भगवंताने ज्या लोकांकडून फळ-फूल खाल्ले, कालांतराने जेव्हा देवळाच्या रूपात त्या भगवंताचे स्मारक उभारले गेले तेव्हा पुरोहित म्हणतात की तेथे त्या लोकांना येण्यास बंदी आहे. ज्यांचा उद्धार भगवंतांनी केला त्याच लोकांना बंदी. असे कसे ते बंद करू शकतात? एक भयंकर भ्रांति समाजामध्ये पसरलेली आहे.

आज तुम्हाला धर्माची विशुद्ध व्याख्या हवी आहे, परंतु अजूनही भारतामध्ये जो धर्म म्हणून प्रचलित आहे तो एखाद्या खवळलेल्या समुद्रासारखा सर्वत्र पसरलेला आहे. सर्वांच्या हृदयात आजही स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव आहे. देवळांमध्ये प्रवेश करण्यावरून निषेध होतो, तलाव वा विहिरीचे पाणी पिण्यावरून निषेध होतो. भारतातल्या प्रत्येक गावातील कित्येक लोक अजूनही हीन भावनेने जगत आहेत. हरियाणातील घोडी (पलवल) येथे आपला एक आश्रम आहे. तेथे पिण्याच्या पाण्याची एक टाकी बसविली. पाणी पिण्यासाठी टाकीला नळ लावले होते. एकदा काही लोक सांगू लागले, "महाराज! गजब झाला. एका डोंबाऱ्याने नळाला स्पर्श केला." आम्ही म्हटले, "मग काय झाले? नळाला पवित्र करणारे मंत्र म्हणा."

कोठून लागली ही कीड? कोणी शिकवला हा धर्म? जो कोट्यवधी हिंदूंच्या हृदयात घर करून बसला आहे, त्याचे मूळ आधी शोधले पाहिजे व ते नष्ट केले पाहिजे. त्यानंतर धर्माची विशुद्ध व्याख्या सांगावी, तेव्हाच तुम्ही सफल व्हाल.

गीता प्रसारित हेण्याआधी अर्जुन सुद्धा अशाच एका भ्रांतिमध्ये आकंठ बुडालेला होता व त्या भ्रांतीलाच तो शुद्ध सनातन धर्म समजत होता. तो म्हणाला, "हे गोविंद! कुलधर्म सनातन आहे. जातधर्म सनातन आहे. असे युद्ध केल्याने सनातन धर्म लुप्त होऊन जाईल. कुळातील स्त्रिया बिघडतील, वर्णसंकर होईल जो कुळाला व कुलक्षय करणाऱ्यांना नरकात घेऊन जाण्यासाठी असतो. अशा युद्धाने पितर अधोगतीला जातील, पिंडोदक क्रिया लुप्त होतील. गोविंद, आपण सर्व बुद्धिमान असूनही महत्पाप करण्यास उद्युक्त झालेलो आहोत. त्यापासून वाचण्यासाठी आपण काहीतरी उपाय का नाही करावा?" त्याने असे म्हणून भगवान श्रीकृष्णालाही दोष लावला की तूही आमच्याबरोबर मोठी चूक करीत आहेस. धनुष्य टाकून अश्रू गाळत रथाच्या मागील बाजूस जाऊन तो बसला व म्हणाला, "केशव! ह्या शस्त्रधारी कौरवांनी मला मारून टाकले तरीही मी युद्ध करणार नाही, कारण त्यामुळे सनातन धर्म लोप पावेल." एका धार्मिक भ्रांतीने अर्जुनाला मरणाच्या दारात उभे केले होते. भगवान श्रीकृष्ण हसून म्हणाले, "**कुतस्त्वा कश्मलमिंद विषमे समुपस्थितम्।।**" (गीता २/२) ह्या विषम अशा स्थळी तुझ्यामध्ये हे अज्ञान कसे उत्पन्न झाले? अर्जुनाने ज्यास सनातन धर्म म्हणून संबोधिले त्यास श्रीकृष्णांनी 'अज्ञान' अशी संज्ञा दिली. त्याच्या योग्यतेच्या संदर्भात भगवंत म्हणतात की ना ते कीर्ति वाढविणारे आहे, ना कल्याण करणारे व ना पूर्वीच्या महापुरुषांनी चुकूनसुद्धा त्याप्रमाणे आचरण केले. '**अनार्यजुष्टम्**' – हे अनार्यासारखे आचारण तू कोठून शिकलास?

ज्यामुळे कीर्ति मिळत नाही, कल्याण होत नाही, श्रेष्ठ महापुरुषांनीही चुकून सुद्धा त्याप्रमाणे आचरण केले नाही ह्यावरून सिद्ध आहे की ते अज्ञान आहे. अर्जुन हतप्रभ झाला की आत्तापर्यंत ज्यास तो सनातन धर्म समजत होता ते अज्ञान निघाले. तेव्हा तो समर्पित झाला व म्हणाला, "गोविंद! हे सर्व अज्ञान आहे तर आता आपणच सांगा की सत्य काय आहे? '**धर्मसमूढचेता**' – धर्माधर्म जाणण्याच्या बाबतीत मी मूढमतीचा आहे. तेव्हा आपणच आता सांगा."

प्रथम भगवंतांनी त्याच्या भ्रांतीचे निवारण केले. त्याच्यामधील उणीवा सांगितल्या. त्या दूर केल्या व त्यानंतर सत्य काय आहे ते सांगितले. म्हणून धर्माचे विशुद्ध रूप माणसा-माणसांपर्यंत पोहोचविण्याच्या आधी धर्माच्या नावावर ज्या वाईट रीति पसरलेल्या आहेत त्यांचे निवारण केले पाहिजे. भांडे रिकामे झाले व मनापासून जाणून घेण्याची इच्छा असेल तरच धर्म म्हणजे काय ते समजवावे. सांगण्यापेक्षाही आधी त्यांस धर्मशास्त्र द्यावे जे ते स्वतः वाचू शकतील, घरी राहून समजून घेऊ शकतील, तुम्हाला समजावून सांगण्याची गरज पडणार नाही.

प्रश्न आहे की कोणत्या व्यावहारिक पद्धतींनी धर्माचा प्रचार व प्रसार होऊ शकतो? आमचे असे मत आहे की धर्माच्या प्रचाराच्या आधी धर्माच्या नावावर ज्या प्रचलित भ्रांती आहेत, त्या कोठून निर्माण झाल्या त्याचा शोध घ्यावा. कोणत्या काळापासून व का आल्या ते शोधावे. ते शोधताना तुम्हाला कळेल की त्यांचे मूळ केवळ स्मृतींमध्ये आहे. जवळजवळ एकशे चौसष्ठ स्मृति आहेत. त्यांचे लेखन ईसवीसन काळात आरंभ झाले. सातव्या शतकात त्या मोठ्या प्रमाणावर प्रकाशात आल्या व प्रशासनात त्यांना स्थान मिळाले. तसे तर त्यातल्या काही स्मृति सोळाव्या शतकापर्यंत लिहिल्या गेल्या. भेदभाव व स्पृश्यास्पृश्य ह्या गोष्टींना काही मर्यादेपर्यंत हे स्मृति-लेखक जबाबदार आहेत.

ह्या स्मृतिकारांनीच गीतेवर प्रतिबंध लावले. गीता घरी ठेवण्यास मनाई केली, असे ह्या कारणासाठी केले की गीतेतील शिकवण लोकांना माहीत झाली तर माणसा-माणसांमध्ये फूट पाडणे शक्य होणार नाही. गीतेमध्ये भगवंत म्हणतात, 'मनुष्य माझाच विशुद्ध अंश आहे.'' तितकाच पवित्र आहे जितके स्वयं भगवंत आहेत. मग फूट पाडणे कसे शक्य होईल?

ह्या स्मृतिंमधील 'सृष्टी'-प्रकरण पहावे. त्यामध्ये म्हटले आहे की सरस्वती व दृषद्वंती ह्या नद्यांच्या मधील भाग म्हणजे देवतांनी वसविलेला ब्रह्मावर्त देश होय. दोन्ही पांचाल व शूरसेन म्हणजेच मथुरा - हे ब्रह्मर्षि देश आहेत जे ब्रह्मावर्तापेक्षा कमी महत्त्वाचे आहेत. सरस्वती नदीच्या पूर्वेच्या, प्रयागपासून पश्चिम हिमालय व विंध्य पर्वताच्या मधल्या भू-भागास मध्यप्रदेश म्हणतात. पूर्वेकडील समुद्रापासून पश्चिमेकडील समुद्रापर्यंत हिमालय व विंध्य पर्वताच्या मधील भागाला पंडितांनी 'आर्यावर्त' म्हंटले आहे, अर्थात काशीजवळील मिर्जापूर येथे जो विंध्य पर्वत आहे त्या पर्वतापासून हिमालयाच्या मधला भू-भाग हा आर्यावर्त होय, जेथे काळ्या

रंगाची हरिणे आढळतात. हा यज्ञास योग्य असा प्रदेश आहे. ह्याव्यतिरिक्त बंगाल, मद्रास, कलिंग इत्यादी अनार्य देश आहेत जे अधमांचे-अभाग्यांचे आहेत. ब्राह्मणांनी प्रयत्नपूर्वक आर्यावर्तामध्येच राहिले पाहिजे. जीवनात संकट आल्यावर जो शूद्र आहे तो कोणत्याही देशामध्ये राहू शकतो. असे स्मृतींमधील 'सृष्टी-उत्पत्ती' ह्या प्रकरणात सांगितले आहे.

स्मृतींमध्ये वर्णन केलेल्या विधात्याला हे ही माहीत नाही की हिमालयाच्या पुढे चीन आहे, समुद्राच्या पलीकडे आफ्रिकेसारखे मोठे खंड आहेत. हरिणा व्यतिरिक्त कांगारू इत्यादींसारखे जीवही सृष्टीमध्ये आहेत. वर दिलेले तेवढेच वर्णन करून सृष्टी प्रकरण संपविलेले आहे. त्या युगामध्ये जेथपर्यंत लोक पायी यात्रा करू शकत होते, तेथपर्यंतचेच वर्णन स्मृतींमध्ये सापडते. स्मृतींमध्ये वर्णन केलेले आहे तेवढीच सृष्टी आहे का?

कविवर्य गुरु कालिदासांच्या 'रघुवंश' ह्या महाकाव्यातही सृष्टीचे असेच वर्णन पहावयास मिळते. महाराज रघु जेव्हा त्रैलोक्यावर विजय मिळविण्यासाठी निघाले तेव्हा ते आसामच्या दिशेने गेले. तेथे विजय मिळविला. तेथील झाडा-झुडपांचे वर्णन महाकाव्यात केलेले आहे. तेथून ते बंगाल-ओरीसा मार्गे मद्रासला आले, तेथे असलेल्या काळी मिरी व काजूच्या झाडांचा उल्लेखही त्यात आहे. त्यानंतर गुजरात, कच्छ, राजस्थानचे वाळवंट, सिंधु नदी पार करून काश्मिर व बद्रीनाथ येथल्या उत्तुंग पर्वत शिखरांवर गेले. रघु महाराजांचे हत्ती चालत जात असताना त्यांच्या अंगाला घासले गेल्याने साग वृक्षांच्या खोडांची साले निघालेली तेथे रहाणाऱ्या लोकांनी पाहिली आहेत. ते हत्ती ऐरावत जातीचे होते.

त्यानंतर पराक्रमी महाराज रघुने एक बाण पाताळात मारला तेव्हा तेथील राजा बलि शरण येऊन रक्षणाची याचना करू लागला. एक बाण वरच्या दिशेने मारला तेव्हा इंद्राने शरणागती पत्करली. अशाप्रकारे त्रैलोक्यावर विजय मिळविल्यानंतरच त्याने तलवार खाली ठेवली. सहा महिन्यांनंतर त्रैलोक्य विजयाच्या मोहीमेमध्ये कैदी झालेल्या राजांना मुक्त करण्यात आले. त्यांची संख्या इतकी होती की महाराज रघुच्या चरणांवर प्रणाम करताना त्या राजांच्या मस्तकावरील चंदनाने रघुच्या पायांची बोटे गोरी झाली. (असे वाटते महाराज रघु सावळ्या रंगाचे होते.) अशाप्रकारे रघुवंश महाकाव्य व मनुस्मृति ह्यांमधील सृष्टी प्रकरण इतकेच आहे.

सर्व स्मृतिंमध्ये मनुच्या नावाने प्रचलित 'मनुस्मृति' सर्वाधिक मान्यता प्राप्त आहे व तिला सर्वात प्राचीन मानले जाते. ह्या स्मृतीची रचना कोणी केली हे सांगणे कठीण आहे, परंतु इतके नक्की की मानवाचे आदि पूर्वज महाराज मनुने ह्याची रचना केली नाही कारण त्यामध्ये वेद, आरण्यक , वेदांगांचा, अत्रि–गौतम–भृगु–वैखानस–वशिष्ठ इत्यादी स्मृतिकारांचा उल्लेख आहे. 'केचित्', 'अपरे', 'अन्ये' अशी संबोधने वापरून अन्य लेखकांच्या मतांचाही संदर्भ दिलेला आहे, तसेच 'वेद बाह्या: स्मृतय:' असे म्हणून भारतातील नास्तिकतेच्या दिशेनेही संकेत केला असल्याचा संभव आहे. ह्या स्मृतिंमध्ये मुसलमान, शख, पहलव तसेच चीन इत्यादींची नावे आहेत ज्यांचा उल्लेख सम्राट अशोकाच्या शिलालेखातही आढळतो. (आदि मनुच्या काळात सृष्टीमध्ये इतक्या जाती, मतभेद, इतके स्मृतिग्रंथ होते का?) गीतेसारखे मानव धर्मशास्त्र असताना स्मृतींमध्ये म्हटले आहे की ह्या स्मृतीच धर्मशास्त्र आहेत – '**श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः।**' (मनु. २/१०)

ह्या स्मृतीच्या रचनाकारांनी त्यांचे नाव का लपविले ह्या बाबतीत काय सांगणार? परंतु हे म्हणू शकतो की ह्या ग्रंथाला प्राचीन व प्रामाणिक बनविण्यासाठी त्यांनी सृष्टीचे आदि पूर्वज राजा मनुच्या नावाने त्याचा प्रचार केला.

ज्योतिष शास्त्रानुसार भारतामध्ये नवजात बालकाचे रास, नक्षत्र व चरण ह्याप्रमाणे जे अक्षर येते, त्या अक्षरावरून नाव ठेवण्याची परंपरा आहे. स्मृतींनुसार जन्मानंतर बाराव्या दिवशी बारश्याच्यावेळी ब्राह्मण बालकाचे नाव मंगलसूचक, क्षत्रियाचे नाव शौर्यसूचक, वैश्य बालकाचे नाव धनसूचक व शूद्राचे नाव घृणासूचक ठेवतात. उदाहरणार्थ – जर 'क' हे अक्षर आले तर ब्राह्मण बालकाचे नाव 'करुणाकर', क्षत्रिय बालकाचे नाव 'कृतांतसिंह', वैश्य बालकाचे नाव 'करोडीमल' व शूद्र बाल काचे नाव 'कतवारू' ठेवतात. ज्यामुळे सृष्टीमध्ये हा मुलगा कुठेही गेला तरी त्याचे नाव ऐकताच त्याची जात कळेल व त्याला कशी वागणूक द्यायची ते कळेल. स्मृतींचे असे मानणे आहे की ब्रह्माच्या मुखापासून ब्राह्मण व पायांपासून शूद्र उत्पन्न झाले. म्हणून ब्राह्मण पवित्र आहेत, श्रेष्ठ आहेत; परंतु गीतेमध्ये स्पष्ट सांगितले आहे की विधाता व त्यापासून उत्पन्न झालेली सृष्टी नश्वर आहे – ''**आब्राह्मभुवनाल्ल ोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन। मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते।।** (८/१६)

स्वयं सृष्टीची रचना करणारा ब्रह्मा व त्यापासून उत्पन्न झालेले यावन्मात्र जगत् पुनर्जन्म पावणारे, मरण पावणारे आहे व दुःखांची खाण आहेत. मग कोणी ब्रह्माच्या मुखापासून जन्मलेला असो वा पायापासून असो, असतो तर मरण पावणारा. ह्यामध्ये श्रेष्ठता काय आहे? ही हजार–दोन हजार वर्षांपासून स्मृतिंद्वारा माणसा–माणसामध्ये टाकलेली फूट आहे. ह्यामुळे अधिकांश भारतीयांचे हृदय दिवस–रात्र खवळत असते. आपण दहा जणांना सत्य समजविण्याचा प्रयास करतो, परंतु येथे तर कोट्यावधी भ्रांतींचे कोट्यावधी अध्यापक प्रचाराच्या मागे लागले आहेत की स्पृश्य–अस्पृश्यता पाळली पाहिजे. भ्रांतीचे प्रचारक बारश्याच्यावेळी, लग्न समारंभाच्या वेळी, अंत्यसंस्कारांच्या वेळी घरो–घरी जाऊन तेच सांगतात जे त्यांना शिकविले जाते. प्रथम ह्या प्रचारकांचा भ्रम दूर केला पाहिजे.

मनुस्मृतिमध्ये म्हटले आहे – 'श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः।' (मनु. २/१०), परंतु आदि शंकराचार्यांनी भगवत्गीतेलाच स्मृति म्हंटले आहे. 'गीता' हे शास्त्र आदिमनुला सूर्यापासून परंपरेने मिळाले. (गीता ४/१) सूर्याने आपला पुत्र मनु ह्यास ते सांगितले, दिले काही नाही केवळ सांगितले. पूर्वजांची बुद्धी एवढी ग्रहणशील होती की जे काही सांगितले ते सर्व स्मृतीमध्ये धारण केले. प्राचीन भारतामध्ये ह्या श्रुतज्ञानाला जीवित ठेवण्यासाठी स्मृतींची परंपरा चालू केली. त्याच परंपरेनुसार मनुने इक्ष्वाकुला सांगितले व इक्ष्वाकुकडून तेच गीता–ज्ञान राजर्षींनी जाणले. नंतर ते ज्ञान लोप पावले होते व भगवान श्रीकृष्णांनी पुन्हा ते प्रकाशात आणले.

भगवान श्रीकृष्णाने म्हटले आहे, "अर्जुना! योग अविनाशी आहे. तेव्हा गीता–ज्ञान कधी नष्ट होऊ शकत नाही, परंतु मनुष्य ते विसरून अवश्य गेलेला आहे. तेच विस्मृत ज्ञान मी तुला सांगत आहे, कारण तू माझा भक्त आहेस, प्रिय सखा आहेस." शेवटी भगवंतांनी विचारले, "अर्जुना! मी सांगितलेले तू एकाग्र चित्ताने श्रवण केलेस का?" अर्जुन म्हणाला, "हे गोविंद! माझा मोह नष्ट झाला. मला स्मृती प्राप्त झाली." हीच मनुस्मृती होय. गीताच वास्तविक मनुस्मृति आहे, सृष्टीचे आदी धर्मशास्त्र आहे.

त्यानंतर वृद्धावस्थेमध्ये राजा मनुने एक प्रलय पाहिला. जेव्हा प्रलयाचे दृश्य शांत झाले, तेव्हा मनुला सृष्टी व्यवस्थित करण्याची इच्छा झाली, तेव्हा परमेश्वराने त्यास दर्शन दिले, चारही वेद दिले व सांगितले की मनुष्याने ते ऐकले तर त्यामुळे त्याचे हित होईल. महाराज मनुने त्याचे 'श्रुति' असे नामकरण केले. ह्याच्या व्यतिरिक्त मनुला काही प्राप्त झाले नाही तेव्हा गीता-ज्ञानापेक्षा वेगळे मनु काय व कोठून सांगेल?

'गीता' ही विशुद्ध मनुस्मृति आहे ज्यास योगेश्वर भगवान श्रीकृष्णांनी पुन्हा प्रकाशित केले. परमात्म्याच्या श्रीमुखाची वाणी असलेल्या गीतेला सर्वसम्मत शास्त्राचा मान पहिल्यापासूनच प्राप्त आहे. धर्मशास्त्र म्हणून ती विस्मृत होत चालली आहे, तिला पुन्हा प्रसिद्ध करा, घरा-घरात पोहोचवा. अजूनपर्यंत भारताचा राष्ट्रीय ग्रंथ कोणता हे निर्धारित होऊ शकलेले नाही, आंतरराष्ट्रीय ग्रंथाचे स्थानही रिक्तच आहे. आपण सर्वांनी मिळून घोषित केले पाहिजे की भारताचे मूळशास्त्र 'श्रीमद्भगवत्गीता' हे आहे. आर्यांचे, सनातन धर्मियांचे, मानवमात्राचे मूलशास्त्र हेच आहे.

मनु, याज्ञवल्क्य, पराशर ह्यांच्या नावांनी प्रचलित असलेल्या स्मृतिंमध्ये त्या महापुरुषाच्या विचारांचा समावेश नाही. त्या स्मृति म्हणजे मध्यकाळातील तसेच अर्वाचीन लहान-लहान संस्थानांचे, राज्यांचे प्रचलित कायदे विषयक ग्रंथ होते. तत्कालीन सामाजिक व्यवस्थेसाठी उपयुक्त असे संदर्भ त्यात असू शकतील, परंतु वर्तमानातील कायदे-नियमांचा स्त्रोत अशा रूपात त्यांचा उल्लेख केल्याने त्यांना गौरव प्राप्त झाला आहे. वास्तविक असमानतामूलक अनेक निंदनीय व्यवस्था ह्यामध्ये आढळतात. स्वातंत्र्यानंतर भारतातील कायदेविषयक अनेक व्यवस्था स्मृतींनी सांगितलेल्या व्यवस्थांना विरोध करतात, तेव्हा स्मृतीजन्य व्यवस्थांना चिकटून रहाण्याचे काहीच औचित्य नाही. धर्माचा प्रचार करण्याआधी भ्रांती उत्पन्न करणाऱ्या ह्या पुस्तकांना न्यायालयांमधून, जन-मानसातून हटवा, भ्रांतींना समूळ नष्ट करा, त्यानंतर भगवद्गीतेचा प्रसार करा. जेव्हा मूळ विचार सुधारतील तेव्हा आराधनेबरोबरच इतर सर्व कार्ये आपोआप योग्य पद्धतीने होऊ लागतील. धर्म म्हणजे काय? सत्य कोणते? त्याचे पालन कसे करावे? ह्या सर्व शंकांचे निरसन श्रीमद्भगवद्गीतेचे भाष्य 'यथार्थ गीता' ह्या पुस्तकात केलेले आहे.

आपण जाणू इच्छिता की धर्माच्या प्रसारासाठी वेदांतामधील सिद्धांतांचा प्रचार कोणत्या पद्धतीने करता येईल? वेदांत हा आदि शंकराचार्यांच्या पश्चात् संघटित झालेला संप्रदाय आहे व कोणताही संप्रदाय इतर संप्रदायांशी समन्वय साधण्याचा आदर्श ठेवू शकलेला नाही. प्राचीन भारतीय साहित्यास प्रथम लिपिबद्ध करण्याचे श्रेय महर्षि वेदव्यासांना जाते. चारही वेद, भागवत, महाभारत, ब्रह्मसूत्र व महाभारतातील भीष्मपर्वाच्या अंतर्गत असलेली गीता ह्या त्यांच्या प्रमुख रचना आहेत. भागवतामध्ये भगवान श्रीकृष्णांच्या लीला वर्णिलेल्या आहेत ज्या मनोरंजक आहे व प्राथमिक स्तरावर प्रेरणादायी आहेत. म्हणून व्यासांनी त्यांच्या शिष्यांना भागवत शिकवले. परंतु गीता संपूर्ण साधनात्मक आहे. प्रस्थानत्रयीचाही आधारग्रंथ आहे. भगवान वेदव्यासांनी त्यास 'शास्त्र' ही संज्ञा दिली. म्हणून धर्माच्या प्रचारासाठी कोणत्याही संप्रदायाचे नाव न घेता सर्वमान्य असलेले एकच शास्त्र तुम्ही वाचावयास द्यावे. नवीन काही लिहिण्याची गरज नाही, आपल्याजवळ पुरातन काळात लिहिलेले 'गीता' शास्त्र आहे. त्यास 'राष्ट्रीय धर्मशास्त्र' म्हणून मान्यता मिळवून द्या व सरळ, सोप्या भाषेत गीतेचा अर्थ सांगणारे 'यथार्थ गीता' हे पुस्तक घरा-घरांमध्ये पोहोचवा. त्यामुळे सर्व वाईट रीतींचे, भ्रांतींचे निवारण होऊन धर्माची पुनर्स्थापना होईल.

● **धर्म आणि संस्कृति :** संस्कृति बाबत संसदेने आपल्या नावास व लौकिकास अनुरूप अशीच यथार्थ धारणा प्रस्तुत केलेली आहे व त्या बरोबरच वर्तमान काळात संस्कृतीच्या झालेल्या शोकांतिकेकडेही लक्ष्य आकर्षित केलेले आहे. वस्तुतः धर्म, साहित्य, कला, विज्ञान, संगीत इत्यादी क्षेत्रे संस्कृतीच्या अंतर्गत येतात, परंतु 'धर्म' निःसंशय संस्कृतीचा प्राण आहे. धर्माबद्दलची धारणा धूसर झाल्यामुळेच संस्कृतीमध्ये विकृति आलेली आहे.

'सः' म्हणजे तो परमात्मा. हेच उद्दालक ऋषींनी आपला पुत्र श्वेतकेतु ह्यास समजाविले की 'तत्त्वमसि' – तू तोच परमात्मा आहेस. 'कृति'चा अर्थ 'कार्य' जेव्हा परमात्म्याशी संयुक्त होऊन त्याच्या निर्देशानुसार कृति होते तेव्हा तीस संस्कृति म्हंटले जाते.

खाणे-पिणे, रहाणी, वेशभूषा, रीति-रिवाज, प्रथा-परंपरा ह्या सर्व गोष्टी शिष्टाचाराचा भाग आहेत, ज्या देश, काळ, परिस्थितिनुसार बदलत असतात, परंतु धर्म प्रेरित संस्कृति शाश्वत असते, कारण धर्म शाश्वत आहे. म्हणून धर्मविहीन संस्कृति केवळ बाह्य आचरण व शिष्टाचारामध्ये गुरफटून विकृत होत चालली आहे.

महाभारताच्या सभापर्वामध्ये उल्लेख आहे की महिष्मतीपुरीमध्ये स्त्रिया स्वच्छंदी वृत्तीने जीवन व्यतीत करावयाच्या. प्राचीन ऋषींनी विवाहाच्या माध्यमातून एक पति-एक पत्नीची व्यवस्था दिलेली होती. ही व्यवस्था टिकून रहाण्यासाठी त्यांनी धर्मशास्त्रास, एका परमात्म्यास साक्षी बनविले, ज्योतिर्मय परमात्म्याचे प्रतीक म्हणून अग्नीला साक्षी बनविले. अशाप्रकारे जीवनातील प्रत्येक घटनेला, क्रियेला व्यवस्थित स्वरूप प्रदान केले व त्यास एका परमात्म्याशी जोडले. जीवनातील प्रत्येक क्षेत्रात प्रवेश करतेवेळी परमात्म्याचे स्मरण करावे असा नियम घातला, त्यालाच संस्कृति म्हणतात.

महाभारतातीलच आणखी एक प्रसंग पहा. अर्जुन पितामह भीष्मांच्या मांडीवर बसला होता. पितामह म्हणाले, "अर्जुना! आज शस्त्र-पूजा आहे." अर्जुनाने विचारले, "शस्त्रांची पूजा करायला शस्त्र म्हणजे परमेश्वर आहेत का?" पितामह म्हणाले, "नाही, पूजा तर परमेश्वराचीच करावयाची, परंतु असा उद्देश ठेवून करावयाची की परमेश्वर आपल्याला शस्त्र-कौशल्यात पारंगत करू देत." म्हणूनच भारतात शेतकरी सुद्धा नांगर चालविण्याच्या आधी नांगराला नमस्कार करतो, सावकार पेढीवर बसण्याआधी गादीला नमस्कार करतो, आखाड्यामध्ये शिरण्याआधी पहिलवान मातीला स्पर्श करून प्रणाम करतो. ह्याचा आशय असा की कार्य करण्याआधी जो सत्य आहे, नित्य आहे अशा परमतत्त्व परमात्म्याचे आपण स्मरण करतो. परमेश्वराच्या स्मरणाशिवाय भारतामध्ये कोणतेही कार्य होत नाही. हीच भारतीय संस्कृती आहे.

परमेश्वराचे स्मरण कोणत्या पद्धतीने करावे तर गीतेनुसार एका परमात्म्याचे स्मरण करावे. परंतु जेव्हापासून स्मृतिंचा उत्पात माजला तेव्हापासून लोक भूत-भवानी, असंख्य देवी-देवता व आणखी कोणा-कोणाचे चिंतन करू लागले. ही सर्व स्मृतींची देणगी आहे. जर संस्कृती सुधारावयाची असेल तर आपल्याला एक शास्त्र व एक सत्य समाजासमोर ठेवावयास हवे.

सर्वांना हे चांगलेच माहित आहे की प्रत्येक राज्याच्या वेगवेगळया देवी-देवता आहेत. उदाहरणार्थ - चितोडचा एकलिंग देव, जोधपूरची चामुंडादेवी, बिकानेरची करणी देवी, गहरवार क्षत्रियांची गडबडा देवी. अशा अनंत देवी-देवतांमध्ये भारत भरकटलेला आहे. ह्या सर्वांच्या मूळाशी स्मृती आहेत. स्मृतींमध्ये लिहिले आहे

की देवतांची पूजा करावी. केवळ ब्राह्मण त्याच्या मर्जीनुसार देवतांना वाढवू अगर कमी करू शकतो. (म्हणजेच देवता काल्पनिक आहेत) म्हणून ब्राह्मण सर्वात उच्च देवता आहे.

गेल्या दोन हजार वर्षांच्या काळामध्ये होऊन गेलेल्या चक्रवर्ती सम्राटांनाही हे ज्ञान नव्हते की जी व्यवस्था ते आपल्या सैन्याच्या जोरावर टिकवून आहेत, तो खरा धर्म आहे अथवा नाही? धर्मशास्त्र कोणते हेही त्यांना माहीत नव्हते. केवळ त्यांनाच नव्हे तर अधिकांश ब्राह्मणांनाही ते ज्ञात नव्हते. स्मृतिंमध्ये उल्लेख आहे की जो गर्भाधानापासून अंत्यसंस्कारापर्यंतचे मंत्र जाणतो त्यानेच स्मृति वाचाव्यात, अन्यथा नाही. अशाप्रकारे शिक्षणावर बंदी घालून स्मृतिकारांनी स्मृतिंना बंदिस्त करून ठेवले व आपल्या उपजीविकेचे साधन असलेल्या व्यवस्थेला 'धर्म' म्हणून घोषित करून तत्कालीन सम्राटांच्या माध्यमातून तो धर्म समाजावर लादला. आज शिक्षणाचा अधिकार सर्वांना प्राप्त होताच स्मृति जनसामान्यांपर्यंत सहज पोहोचलेल्या आहेत. निःशुल्क वाटल्याही जात आहेत. जोपर्यंत समाजात ह्या स्मृति प्रचलित आहेत तोपर्यंत आपण समाजाला एक शाश्वत संस्कृति देण्यात सफल होऊ ह्याबद्दल शंका आहे. म्हणूनच स्मृतींच्या संदर्भात सर्व जणांना हे सांगितले पाहिजे की त्या कोणी रचल्या व त्यांचे औचित्य काय? संस्कृतीमध्ये येणाऱ्या विकृति ही स्मृतींचीच देणगी आहे. त्या विकृतींच्या कारणांना शोधून त्या जागी सर्वमान्य शास्त्र असलेल्या गीतेस पुन्हा स्थापित केल्यानेच सांस्कृतिक विकृतींचे निराकरण संभव होईल. गीता आदि मनुस्मृति आहे.

● **धर्म आणि राष्ट्र :**– आपले असे मत आहे की सनातन धर्म जो भारताचा राष्ट्रीय धर्म आहे त्यावर आघात होत आलेले आहेत. ह्या आक्रमणांना विरोध करून राष्ट्रातील भिन्न संप्रदायांचा समन्वय साधण्याचे उपाय सुचवावेत.

हे बघा! वेगवेगळया पद्धति मनुष्यांना एकमेकांपासून तोडतात, केवळ धर्मच त्यांना जोडतो; परंतु धर्म एकापेक्षा अधिक नसतात. सृष्टीमध्ये परमेश्वर एक आहे व त्यास प्राप्त करण्याचा विधिसुद्धा एकच आहे. आरंभी प्रत्येक माणूस प्रकृतीच्या दिशेने उन्मुख असतो. परमेश्वराला विसरलेला असतो. त्यावेळी तो आसुरी संपत्तीच्या प्रभावाखाली असतो. प्रकृतीकडून तो जेव्हा परमेश्वराकडे उन्मुख होतो तेव्हा दैवी संपत्ती कार्यशील होते. ह्या अवस्थेत परमेश्वराला धारण

करण्याचा एकच विधि असतो. इंद्रियांचा संयम कोणाचा आरंभिक स्तरावरचा असतो, कोणाचा मध्यम स्तरावरचा तर कोणाचा उन्नत स्तरावरील असतो. कोणी परमेश्वर प्राप्तीच्या अगदी समीप असतो, तर कोणाला परमेश्वर प्राप्त झालेला असतो. स्तर उच्च अथवा नीच असू शकतो, परंतु साधनेची पद्धत एकापेक्षा जास्त प्रकारची नसते. तेव्हा अनेक धर्म वा संप्रदाय असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितलेले आहे की केवळ एक ब्रह्मच शाश्वत आहे. वैदिक ऋषींनी त्यासच आत्मा, परमात्मा इत्यादी नावांनी संबोधिले आहे. आत्माच सत्य आहे व 'यज्ञ' हा त्यास प्राप्त करण्याचा निर्धारित विधि, योगविधि आहे. यज्ञ शरीराच्या बाहेर नसून अंतर्गत आहे. त्या यज्ञास आचरणात आणणे, कार्यरूप देणे म्हणजे 'कर्म' होय. ज्या उपायाने यज्ञ पूर्ण होतो त्या उपायाचे नाव 'कर्म'. कर्म म्हणजे आराधना, चिंतन. ''अर्जुना! हे कर्म केल्याशिवाय सृष्टीमध्ये ना कोणी परमेश्वरास प्राप्त करू शकले आहे ना भविष्यात कोणी करू शकेल. दुसरा कोणताही मार्ग नाही. पूर्वीच्या अनेक ऋषींनी हे निर्धारित कर्म करून मला प्राप्त केले.''

सोळाव्या अध्यायात भगवंत म्हणतात – "**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः।**'' हा शास्त्रोक्त विधि सोडून, कामनांनी प्रेरित होऊन जे अन्य यजन करतात त्यांच्या जीवनात ना सुख असते, ना सिद्धी ना परमगति. ते ह्या सर्व गाष्टींपासून वंचित रहातात. ''**तस्माच्छास्त्रंप्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ। ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि।।**'' (गीता १६/२४) म्हणून अर्जुना! तुझ्या कर्तव्य व अकर्तव्याच्या बाबतीत शास्त्र हेच प्रमाण आहे.

कोणते शास्त्र? कोणत्या अन्य शास्त्रांचा विचार करू नका. भगवंतांनी स्वतःच कोणते शास्त्र ते सांगितलेले आहे. ''**इति गुह्यतमं शास्त्रं इदमुक्तं मयानघ।**'' अर्जुना! हे अतिशय गूढ असे शास्त्र मी सांगितलेले आहे. ते जाणून तू संपूर्ण अनुभूति, सतत टिकणारी समृद्धी व परमश्रेय प्राप्त करशील. भगवान वेदव्यासांनी सांगितले की गीता आपले शास्त्र आहे. ''**गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः।**'' व भगवान श्रीकृष्णांनी म्हटले ''माझ्या द्वारे प्रसारित झाले.'' चौथ्या अध्यायात त्यांनी म्हटले आहे की हेच अनादि शास्त्र आहे व स्पष्टपणे सांगितले आहे की ह्याशिवाय दुसरा कोणताही विधि नाही, तेव्हा असंख्य नश्वर देवी-देवतांची पूजा कोठून प्रचल

नात आली? त्यामुळे राष्ट्र असंख्य गटांमध्ये विभागले गेले. प्रत्येक गट स्वतःच्या देवतांमध्ये संकुचित राहून एक-दुसऱ्याची निंदा करीत आहेत. सनातनावर हा प्रहार स्मृतिजन्य आहे. गीता असताना कोणतेही मतभेद निर्माण होऊच शकत नाहीत. गीतेला बाजूला सारूनच आपण संप्रदाय बनवू शकतो, तेव्हा तुम्ही गीतेचा शास्त्र म्हणून स्विकार करा. मग तुम्ही शिवा-शिव केल्याने नष्ट होणार नाहीत. आजही संपूर्ण भारत शिवाशिवीच्या भयामधून बाहेर पडू शकलेला नाही, त्याचे लाखो उपदेशक प्रत्येक गावात विद्यमान आहेत, ते अस्तित्वात असेपर्यंत तुम्ही सफल होऊ शकणार नाहीत. तेव्हा विकृतींचे मूळ कारण असलेल्या स्मृतींना तिलांजली देऊन गीतेवर भाष्य करणारे 'यथार्थ गीता' घरा-घरात पोहोचवावे, तरच राष्ट्रीय एकता संभव आहे.

● **धर्म आणि विज्ञान :-** आपण धर्म आणि विज्ञान ह्यांच्यातील संबंध जाणण्याची जिज्ञासा व्यक्त केलीत तसेच भौतिक विज्ञान हे धर्म विज्ञानास कशाप्रकारे सहाय्यक व पूरक आहे ते सांगण्याचा आग्रह केलात.

वस्तुतः 'विज्ञान' हा योगिक शब्द आहे. भगवान श्रीकृष्ण गीतेमध्ये म्हणतात - "**इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे। ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्।।**" (गीता ९/१) अर्जुना, तू असूयारहित असा असल्याने अत्यंत गुह्य असे हे ज्ञान विज्ञानासहित मी तुला सांगतो, ते जाणल्यावर तू संसार-सागरातून मुक्त होशील." ह्याचा अर्थ विज्ञान ही अशी वस्तू आहे जी संसार सागरातून मुक्त करते. आज आपण ज्यास भौतिक विज्ञान म्हणतो, त्या विज्ञानाने अशी उपकरणे निर्माण केलेली आहेत की ज्यामुळे संपूर्ण सृष्टी नष्ट होऊ शकते. हे विज्ञान विध्वंस करते तर ते विज्ञान मोक्ष देते. भौतिक अविष्कारांना भारतीय साहित्यात 'आसुरी माया' असे म्हंटले आहे.

अशा अविष्कारांमध्ये आपले पूर्वज मागे नव्हते. महाभारतातील एक प्रसंग आहे - सिंधुराज जयद्रथ द्रौपदीचे अपहरण करून पळून जात होता. तिला शोधण्यासाठी निघालेल्या अर्जुनाला एका वृद्ध सज्जन माणसाने सांगितले की कोणीतरी राजा एका स्त्रीचे अपहरण करून ह्याच मार्गाने गेला. त्याची सेनाही त्याच्याबरोबर होती. अर्जुनाने त्याला विचारले की तो किती दूर गेला असेल. वृद्ध सज्जन म्हणाला, "ह्या डोंगराच्या पलीकडे जवळ जवळ एक कोस दूर गेला असेल."

तत्काळ अर्जुनाने दिव्यास्त्र काढले व जयद्रथाच्या दिशेने सोडले. जयद्रथाचा रथ चक्काचूर झाला, घोडे जखमी झाले, सैन्य मारले गेले. परंतु द्रौपदी व जयद्रथाला खरचटलेही नाही. भीमाने जयद्रथाची मानगूट पकडत त्यास युधिष्ठिरासमोर आणले. आज असा एखादा अविष्कार आहे का?

भारतीय विद्वानांच्या भाषेत दैवी वा आसुरी संपत्ती मानवमात्रास नियंत्रित करते. जी प्रकृतिकडे उन्मुख करवते तिला आसुरी संपत्ती म्हणतात. प्रकृतिमध्ये जी आपल्याला गुरफटवून टाकते ती आसुरी माया. दैवी संपत्तीने नियंत्रित असलेली योगमाया, विद्यामाया म्हणजेच विज्ञान होय. साधना इतकी उन्नत असावी की परमेश्वर आदेश देऊ लागतील. आत्म्यापासून अभिन्न होऊन परमात्मा जागृत होईल, मार्गदर्शन करू लागेल. बोट धरून चालवू लागेल. – हेच बिनतारी प्रसारित झालेले विज्ञान आहे. अशा जागृति नंतर साधक नक्कीच संसार सागरातून मुक्त होईल. प्रकृतिमध्ये असे कोणतेही यंत्र नाही जे त्यास नष्ट करेल अथवा विचलित करेल. अशाप्रकारे वास्तविक विज्ञानाचे धर्माशी सदैव तादात्म्य आहे, विज्ञानाचा धर्माशी समन्वय असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

आपण गीतेनुसार धर्माचरण करू लागा. श्रद्धापूर्वक गीता भाष्य असलेले 'यथार्थ गीता' हे पुस्तक चार वेळा वाचा व त्यानुसार अभ्यास आरंभ करा. जेव्हा श्रद्धेने कराल तेव्हा परमेश्वर तुमच्या हृदयात जागृत होऊन मार्गदर्शन करू लागतील, विज्ञानाची किंचित् प्रचिती आपणास मिळेल व जेव्हा सद्गुरु मिळतील तेव्हा विज्ञानाची संपूर्ण धारा आपल्या हृदयात प्रवाहित होईल जी आपल्याला मोक्ष प्रदान करूनच थांबेल.

विज्ञानाच्या अनुभूतिसाठी धर्माची योग्य किल्ली आवश्यक आहे. आत्तापर्यंत ह्या समस्त समस्या न सुटण्याचे कारण होते की आपण निराधार चालत होतो. भगवान श्रीकृष्णांची गीता हा आपला आधार आहे. धर्मशास्त्र म्हणून तिला मान्यता द्या व तिचा प्रचार करा. ह्या लोकी समृद्धी व परमश्रेय प्राप्त करण्याचे विज्ञान असलेल्या ह्या भगवान श्रीकृष्णाच्या वाणीस 'राष्ट्रीय धर्मशास्त्र' म्हणून घोषित करा.

●

**प्रश्न २७ : – आर्य म्हणजे काय?**

उत्तर – भारताचा इतिहास म्हणजेच आर्यांचा इतिहास ही गोष्ट तर इंग्रजी इतिहासकार मान्य करतात, परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की आर्य भारतात रहात

नव्हते तर ते भारताबाहेरून, युरोप खंडाकडून येथे आलेले होते. आर्य गोरे होते. इंग्रजही गोरे आहेत, तेव्हा इंग्रज लोक म्लेंच्छ नसून शुद्ध आर्य आहेत.

हा देश सदैव परदेशियांकडून जिंकला गेला आहे, तेव्हा इंग्रज येथे राज्य करावयास आले त्यात वाईट काय? इंग्रज असेही म्हणतात की आर्यांच्या आगमनाआधी भारतात असभ्य (असंस्कृत) काळे लोक रहात होते, आर्यांनी त्यांना दक्षिण भारतात पळवून लावले. उत्खननामध्ये सिंधु नदीच्या काठी सुसंस्कृत लोकांच्या प्राचीन वसाहती सापडल्या तेव्हा इंग्रज म्हणाले की अपवादात्मक काही काळे लोक सुसंस्कृत झालेले होते म्हणून ह्या संस्कृतींना आर्य संस्कृतीपेक्षा भिन्न मानले जाते व त्यांना केवळ 'सिंधु घाटची संस्कृती' म्हंटले जाते. सिंधुच्या घाटावर कोणतेही मंदिर सापडले नाही व लाखो शिवलिंगे मिळाली आहेत असे अर्नेस्ट मैके ह्याने लिहिलेले आहे. आर्य आणि अनार्य ह्या वादावरून दक्षिण भारतात रामाचा पुतळा जाळला गेला. इंग्रजांनी असेही म्हंटले आहे की प्राचीन भारतीयांना इतिहास लिहिणे माहीत नव्हते. पुराणांमध्ये वर्णिलेल्या इतिहासात सन–तारीख नमूद नसल्यामुळे गप्प बसावे लागते, वास्तविक भारतीय ग्रंथांमध्ये लाखो वर्षांपूर्वीचा इतिहास लिहिलेला आहे. बरेचसे इंग्रजी लोक संस्कृत भाषेला देवभाषा नव्हे तर खेडवळ भाषा (डेडलैंग्वेज) म्हणतात. वेदांना धनगरांची गाणी समजतात. म्हणजे वेद व गोपालांच्या गाण्यात काहीच फरक नाही. शंकराची पिंडी नसून तो वरवंटा आहे. आपल्या संस्कृतीची किंमत आपल्या नजरेतून ते कमी करण्याचा प्रयत्न करतात.

भारतीय इतिहासाबाबत अनेक भ्रम आहेत ह्यात संशय नाही. इतिहास लेखनाचीच गोष्ट घ्या. आपला इतिहास जो वेदांमध्ये आहे, पुराणांमध्ये आहे, इंग्रज त्यास इतिहास मानायलाच तयार नाहीत.

प्रश्न उत्पन्न होतो की आपला पूर्वीचा एवढा मोठा लिखित इतिहास आहे कुठे? आपण जाणताच की शांतता–प्रिय भारतीयांचे साहित्य अनेक आक्रमणांमध्ये जाळले गेले. विश्वविख्यात नालंदा विश्वविद्यालयाचे ग्रंथालय सतत तीन वर्षे जाळले गेले. प्राचीन काळी पुस्तके खूप मेहनतीने लिहिली जायची. आजच्या सारखे प्रिंटींग प्रेस नव्हते. म्हणून पुस्तकांना ग्रंथालयांमध्ये सुरक्षित ठेवले जायचे. प्राचीन आक्रमकांनी, मुसलमानांनी सर्व साहित्य नष्ट करण्याचा प्रयत्न केला. वेद,

पुराण, रामायण, महाभारत इत्यादी जे मोजके ग्रंथ शिल्लक राहिले आहेत, ते लोकांच्या पाठांतरामुळे व घरांमध्ये हस्तलिखिते ठेवल्यामुळे वाचले.

आपल्या साहित्यास इंग्रज लोक इतिहास हे नाव देत नाहीत ही गोष्ट वेगळी, कारण त्यांच्यामते एखाद्या घटनेची सन-तारीख दिलेली नसेल तर तो इतिहास कसा? तारीख लिहिणे तर इंग्रजांनी दोन हजार वर्षांपूर्वीपासूनच चालू केले, आपला इतिहास तर करोडो वर्षांपूर्वीचा आहे. आपले पूर्वज इतक्या तुच्छ स्तरावर जाऊन विचार करीत नसत.

ज्याप्रमाणे सूर्य अनंत काळापासून आहे, पृथ्वी अनंत आहे, त्याचप्रमाणे काळही अनंत आहे. असा अनंत काळ 'महीने,' 'वर्षां,' मध्ये मोजणे हे तितकेच हास्यास्पद आहे जितके हास्यास्पद समुद्राचे पाणी मोजण्यासाठी 'लीटर' हे मोजमाप वापरणे आहे, म्हणून आपल्या पूर्वजांनी लाखो वर्षांचे मिळून कलियुग, द्वापार, त्रेता व सत्‌युग अशा चार युगांचे प्रमाण वापरून काल-गणना निश्चित केली. युग हे प्रमाण वापरले. जो म्हणजे ब्रह्माचा एक दिवस सुद्धा होत नाही. म्हणून त्यांनी सन, संवत, तारीख अशा लहान प्रमाणांचा उपयोग इतिहास लेखनात केला नाही. चाणक्यांनी अर्थशास्त्रामध्ये लिहिले आहे की पुराण, इतिवृत्त, आख्यायिका, उदाहरण, धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्र हे सर्व इतिहासाच्या अंतर्गत येते. 'पुराण' शब्दाचा अर्थच मुळी जुन्या घटना. तेव्हा भारतीय प्राचीन ग्रंथांमध्ये असलेला आपला इतिहास सर्वथा प्रामाणिक आहे.

इतिहासकारांचे हे म्हणणे बरोबर नाही की आर्य बाहेरून आले व काळे लोक भारताचे मूळ निवासी आहेत. त्यांचे असे म्हणणे धूर्तपणाचे आहे. कारण आज भारतीय ना आर्यांसारखे गोरे आहेत ना द्रविडांसारखे काळे, उलट देशी व परदेशी लोकांच्या संयोगातून जन्मल्यामुळे आपले रक्त शुद्ध असल्याचा दावा भारतीय करू शकत नाहीत. वस्तूत: त्वचेचा रंग हवामानावर अवलंबून असतो. अक्षांशानुसार व देशाच्या विस्तारानुसार भारतात तीन प्रकारचे हवामान आढळते-शीत, उष्ण व समशीतोष्ण. काश्मीरसारख्या थंड प्रदेशातील लोक गोरे असतात. दक्षिण भारतात अधिक उष्णता असल्याने तेथील निवासी काळे असतात. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश जेथे समशीतोष्ण हवामान असते तेथे रहाणारे गव्हाळ रंगाचे असतात. वस्तूत: सर्व प्रकारचे 'कलर' भारतात आढळतात व ते सर्व 'आर्य' आहेत.

आर्य परदेशातून भारतात आले असे जे म्हटले गेले त्यावर अडीच हजार वर्षांपूर्वी मेगस्थनीज नावाच्या परदेशी प्रवाश्याने लिहिले आहे. "सिकंदराच्या आधी ना कोणत्याही देशाने भारतावर आक्रमण केले होते, ना भारताने कोणत्याही देशाला गुलाम बनविले होते. कोणत्याही देशाने भारतात आपली वसाहत केलेली नव्हती. भारतात रहाणारे सर्व लोक मूळ इकडचेच वंशज आहेत." मेगस्थनीजच्या काळी कोणालाही हे माहीत नव्हते की भारतीय बाहेरून आलेले आहेत व अडीच हजार वर्षानंतर इंग्रजांनी शोधून काढले की आर्य बाहेरून आलेले आहेत, वास्तविक स्वतः इंग्रज अडीच हजार वर्षांचे सुद्धा नाहीत.

बाहेरून आलेल्या आर्यांनी उत्तर भारतावर आपले अधिपत्य प्रस्थापित करून काळया द्रविडांना दक्षिणेला पळवून लावले व आपले एजन्ट राम–लक्ष्मण ह्यांना पाठवून दक्षिण भारताचा राजा रावण ह्याला मारले, असे जे लोक म्हणतात त्यांचे म्हणणे राजनैतिक षड्यंत्र आहे. रामाच्याही आधी सुग्रीव, वाली इत्यादींचे पूर्वज, तसेच केरळ–मद्रासपर्यंत पसरलेल्या त्यांच्या राज्यातील रहिवासी आर्य होते. राम–रावण युद्ध चालले होते. कुंभकर्णाला पाहून वानर सेना जेव्हा पळायला लागली तेव्हा अंगद वानर सेनेला अडवून म्हणाला, "बंधुनो! आपल्या पूर्वजांनी मोठमोठ्या लढाया जिंकलेल्या आहेत. आपण आर्य आहोत, असे पाठ दाखवून पळून गेलात तर आपल्याला अनार्य म्हटले जाईल." बघा, वाली व सुग्रीवांचे पूर्ण खानदान शुद्ध आर्य होते. समुद्राच्या काठी रहाणारी वानरी सेना आर्य होती. राम तर नंतर आले. आर्य म्हणजे जो सत्याकडे पाठ फिरवत नाही, जो कर्तव्यापासून च्युत होत नाही. वनवासात असताना मी श्रीराम सोन्याचे हरिण पकडण्यासाठी त्याच्या मागे गेले व त्याला मारले, मरताना मृगाचे रूप धारण केलेल्या कपटी मारीचाने रामाच्या आवाजात लक्ष्मणाला हाक मारली. सीता ते ऐकून व्याकुळ झाली व लक्ष्मणास म्हणाली, "लक्ष्मणा, तू भावावर श्रद्धा आहे असे सांगून आमच्याबरोबर वनवासात आलास, परंतु मी तुझ्या मनात काय आहे ते ओळखले होते. तुला वाटले वनवासात रामाला काही झाले तर सीतेला मी प्राप्त करेन. तुझा धिक्कार असो, अनार्य लक्ष्मणा, तुझा धिक्कार असो." ह्यावरून स्पष्ट होते की तो पुरुष अनार्य आहे जो सत्–पथावरून विचलित होतो. जो सत्यावर आरूढ असतो त्यासच आर्य म्हणतात. जेथे जेथे सत्यापासून विचलित होण्याचा प्रश्न आला, तेथे 'अनार्य' शब्दाचा प्रयोग झालेला आहे.

वाल्मीकि रामायणातील एक प्रसंग आहे. एकदा रावणाने त्याच्या वेधशाळेत रामाचे कृत्रिम शीर तयार केले व सीतेसमोर ते फेकून तो म्हणाला, ''हा घे तुझा राम! अजेय राम! मर्यादाशील राम! माझा सेनापति प्रहस्त गेला व त्याचे डोके कापून घेऊन आला. आता तर माझा स्वीकार करशील.'' रक्ताने माखलेले श्रीरामाचे शीर पाहून सीता विलाप करू लागली, ''माझ्यासारख्या अनार्याचा धिक्कार असो जी आपणास प्राप्त करू शकली नाही. सिद्ध आहे की माझ्या सत्य आचरणात काहीतरी त्रुटी होती.'' म्हणजेच आर्य तो आहे जो सत्यावर आरूढ असतो. आर्य एक निष्ठा आहे, एक गुणवाचक कसोटी आहे. प्रत्येक मानव त्या कसोटीपर्यंत पोहोचू शकतो.

महाभारतातील एक प्रसंग आहे. जेव्हा दुर्योधनाची मांडी तुटली तेव्हा अतिशय विव्हळत तो म्हणाला, ''अरे कंसाच्या दासाच्या पुत्रा, कपटी कृष्णा! तुझा धिक्कार असो. तू कपट करून द्रोण, भीष्म, जयद्रथ, कर्ण व आता मला मारले आहेस, अन्यथा पांडवच काय परंतु विश्वातील कोणतीही शक्ती आमच्या सेनेला जिंकू शकली नसती. शिखंडीला पुढे करून तू भीष्माची हत्या केलीस ते काय मला माहीत नाही? भीमाला माझ्या मांडीवर प्रहार करण्याचा संकेत तूच दिल ास, हे सुद्धा माझ्यापासून लपलेले नाही? अनार्य कृष्णा! तुझा धिक्कार असो.''

येथे दुर्योधनाने कृष्णासाठी 'अनार्य' शब्दाचा प्रयोग केला. ह्यावरून स्पष्ट होते की सत्यापासून बाजूला सरून असत्याचा आश्रय घेणारा अनार्य असतो. अर्थात हा गुण आहे, कोणती जात नव्हे. आर्य शब्दाचा अर्थ 'श्रेष्ठ'. हा शब्द संस्कृत 'ऋ' धातुपासून उत्पन्न झालेला आहे, ज्यापासून 'ऋत्' शब्द तयार झाला आहे. 'ऋ'चा अर्थ तीक्ष्ण म्हणजेच नष्ट करणारा व 'अर्' म्हणजे हट्टाने नष्ट करणे. जो चिंतन-पथावरील बाधांना दृढपणे नष्ट करतो त्यास 'आर्य' म्हणतात. 'अरः यम' - यमास 'अर' असेही म्हटले आहे. पातंजल योगदर्शनात अहिंसा, सत्य, आस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह असे पाच यम सांगितलेले आहेत. त्यांचे पालन करीत असता येणाऱ्या अडथळ्यांना नष्ट करण्यामध्ये जो सक्षम आहे तोच 'आर्य' होय.

अशाप्रकारे 'आर्य' हा शब्द गुणवाचक आहे, जातिवाचक नाही. तो रंग-भेदावर आधारलेला नाही. जे लोक असे म्हणतात की, ''उत्तर भारतात निवास करणारे आर्य बाहेरून आले आहेत व दक्षिणेकडील काळे द्रविड भारताचे मूळ निवासी आहेत'' ते लोक समाजात फूट पाडण्यासाठी असे म्हणतात.

वास्तविक दक्षिण भारतातील लोक रावणाच्या वंश-परंपरेतील नसून अंगद व सुग्रीवाच्या वंशातील आहेत, जे आर्य होते. स्वतः रावणाचे पिता व आजोबा आर्य होते, परंतु आर्यगुणांपासून च्युत झाल्यामुळे रावण असुर झाला. तसे तर दक्षिण वासीयांनीच रावणाला मारले. उत्तर भारतातील एक उंदीर सुद्धा मेला नाही, एकही उत्तर भारतातील सैनिक युद्धात उतरला नव्हता. रामाला तर सीतेच्या शोधात जावेच लागले.

दक्षिणेकडील लोक रावणाच्या त्रासाला कंटाळले होते. रामाने केवळ त्यांना संघटित केले. वस्तुतः उत्तर व दक्षिण भारतात निवास करणारे लोक आर्यपरंपरेतील च आहेत. इतकेच नव्हे, तर जपान, चीन, मध्य आशियां, अमेरिका इत्यादी ज्या देशांमध्ये गौतम बुद्धाची परंपरा पोहोचलेली आहे, गुरु नानकांचा उपदेश पसरलेला आहे, आर्य-संस्कृतीचा प्रसार झालेला आहे, ते सर्व आर्य आहेत. कारण ते सत्याकडे अग्रेसर आहेत. सर्वत्र सगळेच आर्य आहेत असे मात्र नक्की नाही, आसुरी विचार असणाऱ्या लोकांचे अस्तित्वही सदैव आहे.

वस्तुतः आपली प्रकृति 'दैवी' होती. दुसऱ्या संस्कृतींना, दुसऱ्या देशांना हा गौरव कधीही कोणी दिला नाही. तेव्हा आपण बाहेरून आलेलो आहोत हे मान्य करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आर्य संस्कृतीचे मुख्य ठिकाण तर भारत आहे. विश्वाने जे काही शिकले ती भारताची देणगी आहे. साधनेच्या प्रारंभी येशू सुद्धा योग शिकण्यासाठी भारतात आला होता, असे तिबेटच्या ग्रंथालयातील प्राचीन पुस्तकांवरून प्रमाणित होते. बायबलमध्ये 'कडक उन्हात खेळणारी नागडी मुले', 'पाणी भरणाऱ्या स्त्रिया', आमराई इत्यादींचे वर्णन आहे, ज्याचा इंग्लंड अथवा जेरुसलेममध्ये जन्मलेले लोक स्वप्नातही विचार करू शकत नाहीत. 'ईसा' हा शब्द सुद्धा भारतीय 'ईश', 'ईश्वर' ह्या शब्दांची नक्कल आहे. ईसाला मसीहा म्हटले जाते. मसीहा म्हणजे वैद्य. गुरुच सर्वात मोठा वैद्य असतो जो भवरोगापासून वाचवितो. म्हणून मिशनरीज् 'ईसा मसीह मेरे प्राण बचैया' असे गाणे म्हणतात. वस्तुतः हे सर्व भारतीय दर्शनशास्त्राने प्रभावित झालेले आहेत व असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही की विश्वामध्ये जे काही श्रेष्ठ आहे ते सर्व आर्यभूमी भारताची देणगी आहे. योग्य आत्मिक प्राप्तिसाठी भारत जगत्‌गुरू

होता व पुढेही राहील. ही गोष्ट वेगळी की भारतातील लोक शांतताप्रिय होते व दैवी गुणांच्या प्रभावाखाली जीवन व्यतीत करणारे होते, त्या उलट विदेशी आक्रमक, क्रूर व हिंसक होते. म्हणून वेळोवेळी भारताला गुलामी पत्करावी ल ागली, विदेशी आक्रमक शक्तिशाली होते म्हणून नव्हे. म्हणूनच भारतातील परंपरा पूर्णपणे नष्ट कधीच झाली नाही. जेव्हा जेव्हा आपल्या शौर्याचे आपल्याला स्मरण झाले तेव्हा तेव्हा भारत पुन्हा जागा झाला व त्याच स्थानाला पोहोचला. म्हणून आज भारत स्वतंत्र आहे. विदेशी लोकांच्या अनेक आक्रमणांनंतरही भारतीय संस्कृति, आर्य संस्कृति टिकलेली आहे. आर्य लोक तसे तर सर्वत्र विद्यमान आहेत परंतु आर्यगुणधारी लोकांचे बाहुल्य येथे असल्यामुळे भारताला मूळ आर्यभूमि मानले जाते. आर्यत्व प्राप्त करण्यासाठी महापुरुषांचा सत्संग आवश्यक आहे. अशाप्रकारे सन्मार्गावर जो दृढतेने आरूढ आहे तो 'आर्य'. म्हणून आपल्या पूर्वज महापुरुषांनी म्हटले आहे की 'कृण्वन्तु विश्वमार्यम्' पूर्ण विश्वाला आर्य बनवा.

●

**प्रश्न २८ : - 'योग' म्हणजे काय?**

**उत्तर :** - वर्तमानकाळात अनेक विशेषणांमुळे 'योग' हा शब्द आपला मूळ आशय हरवून बसलेला आहे. ऐन्द्रजालिक (मायावी) कौशल्याला लोक 'योग' म्हणतात. तंत्र-मंत्र, वशीकरण, मारण इत्यादी द्वारा कर्मफळाचे खंडण करण्याचा दावा बरेचसे योगी करू लागले आहेत. खरोखर जे योगी होते ते ईश्वर-चिंतनात इतके तल्लीन असायचे की शरीराकडे लक्ष द्यावयास त्यांना वेळ नसायचा. केसांच्या जटा व्हायच्या, ईश्वर-पथ हा प्रेम, चिंतन व विरहाचा मार्ग आहे, परंतु आपल्या देशात व परदेशात योगाच्या नावावर केवळ आसनांचा प्रचार, कुंडलि नी जागृत करणे, ध्यानशिबीर, प्राणायामाचे प्रशिक्षण इत्यादींचा प्रचार होत आहे हे पाहून असे वाटते की वर्तमानातील समाज 'योगदर्शन'चे प्रणेता महर्षि पतंजलिं च्या योगाच्या मूळ आशयापासून वंचित होत आहे.

योग शब्द 'युज्' धातूला 'धञ्' प्रत्यय लागल्यावर तयार होतो. पाणिनी व्याकरणानुसार युज् तीन गणांमध्ये आढळतो - १) युज् समाधौ-द्विवादिः आत्मने पदी, २) युजिर योगे रुधादिः उभयपदी आणि ३) युज् संयमने चुरादिः परस्मैपदी. अशाप्रकारे 'योग' शब्दाचा अर्थ क्रमशः समाधि, जोड व संयमन असा होतो.

'अमरकोश' ह्या प्रसिद्ध संस्कृत कोशात म्हंटले आहे - "योगः सन्नहनोपायः ध्यान संगति युक्तिषु' - योग हा ध्यानाशी निगडित आहे, ध्यानाशी जोडलेला आहे. 'सन्नहन' - त्या ध्यानामध्ये संघर्षशील होणे म्हणजे 'योग' होय. वैद्यशास्त्रात इलाज करण्यालाही योग म्हणतात. ध्यानाद्वारे चित्ताला एकाग्र करणे म्हणजे योग. दोन वस्तूंचे एकमेकांत मिसळणे अर्थात एकत्र होणे ह्यास योग म्हणतात.

सर्वसाधारण लोक समजतात की 'योग' म्हणजे असा अभ्यास की ज्यामुळे अलौकिक सिद्धी प्राप्त होते व अशी कार्ये करणे शक्य होते की जी सर्वसाधारण मनुष्यास करणे शक्य नसते.

ऋग्वेदातील पंचम मंडलातील एक्याऐंशीव्या सुक्तातील पहिल्या ऋचेमध्ये म्हटले आहे.

**युञ्जते मन उत युञ्जते धियो विप्रा विप्रस्य वृहतो विपश्चितः।**
**वि होत्रा दधे वयुनाविदेक इन्मही देवस्य सवितुः परिष्टुतिः।।**

विप्र अर्थात ज्ञानी जन, बुद्धी व ज्ञानाचा स्त्रोत असलेल्या परमात्म्यामध्ये 'मनः युञ्ज्ते' - आपले मन केंद्रित करतात व 'धियःयुञज्ते'. त्यातच आपली बुद्धी देखील एकत्रित करतात. तोच 'एकः इत देव' - एकमात्र देव आहे, सर्व जाणणारा आहे, यशाला धारण करणारा आहे, त्याची स्तुति महान आहे.

अशाप्रकारे वैदिक संहितांमध्ये 'योग' शब्दाचा आशय आहे मनाला परमात्म्यामध्ये केंद्रित करणे.

योग अनादि आहे. भगवान श्रीकृष्णांनी गीतेच्या चौथ्या अध्यायाच्या आरंभीच म्हटले आहे - "**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।**" हा अविनाशी योग मी विवस्वानाला (सूर्याला) सांगितला "**स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः।**" (४/३) तोच पुरातन योग आता मी तुला वर्णन करून सांगणार आहे. अशाप्रकारे गीता हे योगशास्त्र आहे ज्यामध्ये भगवंतांनी 'योग' शब्दासाठी राजयोग, हठयोग, लययोग, ध्यानयोग अशी विशेषणे न वापरता, 'योग' शब्द समग्रपणे वापरलेला आहे.

'**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थोधनुर्धरः।**' गीतेत कृष्णाला महायोगेश्वर म्हंटले आहे.

भगवान श्रीकृष्णाने गीतेत म्हटले आहे – अर्जुना! '**योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना।**' (६/४७) योग्यांमध्येही असा योगी मला अत्यंत प्रिय आहे जो अंतःकरणापासून मला भजतो व निरंतर माझे चिंतन करतो. म्हणजेच मन, कर्म व वचनानी एका परमात्म्याचे चिंतन करण्यास योग म्हणतात.

गीतेमध्ये भगवंत म्हणतात,

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।। गीता, ९/२२**

अनन्य अर्थात अन्य न, माझ्या व्यतिरिक्त अन्य कोणालाही न भजता जो केवळ मला भजतो, निरंतर माझ्याशी संलग्न असलेल्या अशा भक्ताच्या निर्वाहाचा भार मी स्वतः वहातो. म्हणजेच अनन्य भावाने परमेश्वराचे चिंतन करण्याचे नाव 'योग' होय.

गीतेनुसार योगाचा विधि काय आहे? –

**सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च।**
**मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम्।। गीता, ८/१२**

संपूर्ण इंद्रियांच्या दरवाजांना विषयांपासून बाजूला सारून, मनाला हृदय देशामध्ये स्थिर करून, ध्यानाला दोन भुवयांच्या मध्यभागी स्थिर करून, "**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्। यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।**" (८/१३) 'ओम्' जो परमतत्त्व परमात्म्यास संबोधित करतो, त्याचा जप करीत "**मामनुस्मरन्**" – माझ्या स्वरूपाचे ध्यान करीत जो देहाध्यासाचा त्याग करतो तो परमगति प्राप्त करतो. अर्थात् एका परमात्म्याशी मिलन होण्याचे नाव 'योग' आहे. तुम्ही त्यास कधी भेटाल?

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।। गीता, ८/१४**

अनन्य भावाने म्हणजेच अन्य कोणत्याही देवी-देवतांचे चिंतन न करता जो निरंतर मला भजतो, सतत माझ्याशी संलग्न असलेल्या अशा योग्यासाठी मी सुलभ असतो. अर्थात योगाच्या परिणामी परमेश्वराचे दर्शन होते, सिद्धींचे प्रदर्शन करावयाचे नसते. योग म्हणजे काय?

**तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम्।**
**स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा।। गीता, ६/२३**

संसाराच्या संयोग-वियोगापासून वर्जित असण्यास योग म्हणतात. जे सर्वोत्तम सुख आहे, ज्यास परमतत्त्व परमात्मा म्हणतात त्याच्याशी मिलन होण्याचे नाव 'योग' आहे.

मौर्य वंशातील शेवटचा सम्राट बृहद्रथ, ज्याच्या निधनानंतर त्याचा ब्राह्मण सेनापति पुष्यमित्र शुंगाचा शासनकाळ आला. त्याने भगवान बुद्धाच्या सिद्धांताचे खंडन करून जन्माने निर्धारित असलेल्या ब्राह्मणांच्या पूज्यतेवर आधारित चार वर्णांच्या व्यवस्थेची स्थापना केली. ह्या नवीन व्यवस्थेला पोषक अशा स्मृति धर्मशास्त्राच्या नावाने त्याच काळात प्रस्थापित झाल्या.

महर्षि पतंजलि पुष्यमित्राचे समकालीन मानले जातात. त्याकाळी धर्माच्या नावावर आलेल्या नवीन-नवीन व्यवस्थांनी आशंकित होऊन त्यांनी योगाच्या कल्याणकारी ज्ञानाला संक्षिप्त सूत्रांमध्ये प्रस्तुत केले जेणेकरून भारतातील प्राचीन विद्येचा लोप होऊ नये. योगाच्या सिद्धांतांना त्यांनी सूत्र रूपात परंतु स्पष्ट शब्दांमध्ये प्रस्तुत केले, ज्यावरून प्रतीत होते की भाषा व्याकरणावर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. असे म्हणतात की भगवान पतंजलिंनी मनोवाक्काय दोष निवारणार्थ योगसूत्र महाभाष्य व चरक संहितेची रचना केली.

**योगेन चित्तस्य पदेन वाचां मलं शरीरस्य च वैद्यकेन।**
**योऽपाकरोत्तं प्रवरं मुनीनां पतंजलिं प्राञ्जलरानतोऽस्मि।।**

महर्षि पतंजलींनी योगाबद्दल नवीन काहीही लिहिलेले नाही, गीतेमध्ये सांगितलेले आहे तेच सूत्रबद्ध केले. चित्तवृत्तींचा निरोध करणे हे गीतेमध्ये सांगितलेले आहे, "**यत्रो परमते चित्तं निरुद्धं योग सेवया।**" (६/१०) पाच यमांमध्ये येणारा अपरिग्रह गीतेमधील "**एकाकी यत चित्तात्मा निराशीरपरिग्रहः।।**" (६/१०) ह्या श्लोकापासूनच घेतलेला आहे '**स्थिर सुखमासनम्**' (पातं. २/४६) हे गीतेतील 'स्थिरमासनमात्मनः' (६/११) ह्याचीच पुनरावृत्ति आहे. अभ्यास व वैराग्याने मनाचा निरोध करावा (गीता ६/३५) असे महर्षि पतंजलिंचेही मत आहे. ओम्चा जप, सद्गुरुंचे ध्यान, त्यांच्याद्वारे साधनेची जागृती व स्वरूपाची प्राप्ति हे सर्व महर्षिंनी सांगितलेले आहे ते गीतेचेच रूपांतर आहे.

वर्तमान काळात योगाच्या दोन प्रमुख पद्धति प्रचलित आहेत. एक महर्षि पतंजलिंच्या योगसूत्रांवर आधारित असलेली व दुसरी हठयोग ह्या नावाने प्रसिद्ध आहे. पातंजल योग '**चित्तानुशासनम्**' - चित्तवृत्तींना अनुशासित करण्यावर आधारित आहे, तर हठयोगाचा संबंध शरीर-नियंत्रण, स्वास्थ्य तसेच रोग-निवारणाशी आहे. पतंजलिंनी मन स्थिर म्हणजेच शांत ठेवून बसण्याला 'आसन' म्हटले आहे, तर हठयोगावरील ग्रंथांमध्ये चौऱ्याऐंशी ते चौऱ्याऐंशी लाख इतक्या आसनांची लांब यादी दिलेली आहे. हठयोगामध्ये नेति, धौति, बस्ति, नौली, त्राटक, कपालभाति, महामुद्रा, खेचरी, जालंधर, उड्डीयान, मूलबंध, बज्रोली, अमरोली व सहजोली अशा क्रिया प्रचलनात आहेत, तर ह्या विषयाबद्दल योग-दर्शन मौन बाळगून आहे. हठयोगामध्ये षट्‌चक्रांचे भेदन करून, कुंडलिनी जागृत करून तिला ब्रह्मरंध्रापर्यंत न्यावयाचे असते. त्यामध्ये योगाच्या आठ अंगांऐवजी सहाच अंगांची चर्चा केलेली आहे, यम-नियमांना वगळले आहे. हठयोगामधील प्राणायामात श्वासाच्या पूरक, कुंभक आणि रेचक ह्या क्रियांवर दृष्टी ठेवली जाते, ज्याचे उज्जायी, भस्त्रिका, सूर्यभेदी, भ्रामरी, शीतली इत्यादी अनेक प्रकार आहेत. महर्षि पतंजलि सिद्धींना ध्येय प्राप्तीमधील अडथळा मानतात, तर हठयोगी त्यांस योगाचे विशेष फळ समजून त्यांचे प्रदर्शन करतात. हे सांगायची गरज नाही की योगाच्या नावावर जे अनेक भ्रम व धारणांचे सृजन झालेले आहे ते ह्या दोन्ही पद्धति एकमेकात मिसळल्यामुळे झालेले आहे, किंवा असे म्हणणे जास्त उचित होईल की शारीरिक क्रियांना 'योग' ही संज्ञा दिल्यामुळे विकृतींना प्रोत्साहन मिळालेले आहे. कल्याण करणारा योगविधि तोच आहे ज्याची परंपरा वेदांपासून गीतेपर्यंत अखंडित आहे, शुंगकाळात महर्षि पतंजलिंनी ज्यास पुन्हा सूत्रबद्ध केले.

विश्वातील समस्त मानवाला उद्देश्य बनवून महर्षि पतंजलिंनी 'योगदर्शन' प्रस्तुत केले आहे, ज्यामध्ये मानवाच्या अंत:करणातील दु:खाच्या कारणांचे निवारण करून शाश्वत कैवल्याच्या प्राप्तीचे मार्गदर्शन आहे.

योगसूत्र कठीण आहे व योगाभ्यासातील काही अवस्थांचे पूर्णपणे वर्णन त्यामध्ये केलेले नाही. ते संक्षिप्त रूपात केलेले आहे. त्यावरून जणू काही असा निर्देश दिलेला आहे की कोणा तत्त्वदर्शी सद्‌गुरुंना शरण जावे.

●

## प्रश्न २९ : – साधकाचे आचरण कसे असले पाहिजे?

**उत्तर :** – साधकाने सुतीक्ष्णाचा आदर्श ठेवला पाहिजे. सुतीक्ष्ण हा महर्षि अगस्तींचा प्रिय शिष्य होता. जेव्हा त्याने ऐकले की वनवासामध्ये भगवंत पर्यटन करीत त्याच जंगलात आलेले आहेत तेव्हा तो प्रार्थना करू लागला.

**हे बिधि दीन बन्धु रघुराया। मो से सठ पर करिहहिं दाया।।**
**(मानस, ३/९/४)**

हे विधाता! दीन–दुबळयांवर दया करणाऱ्या प्रभो! माझ्यासारख्या मूर्खावर दया कराल का? सुतीक्ष्ण काय खरोखरच मूर्ख होते? काही घटकांतच त्यांना भगवंतांनी दर्शन दिले. ते विचार करायचे की –

**मोरे जियँ भरोस दृढ़ नाहीं। भगति बिरति न ग्यान मन माहीं।**
**नहिं सतसंग जोग जप जागा। नहिं दृढ़ चरन कमल अनुरागा।।**
**(मानस, ९/९/६-७)**

माझ्या हृदयामध्ये दृढ विश्वास नाही, ना माझ्यामध्ये भक्ती आहे, ना वैराग्य व ना मनामध्ये ज्ञान आहे. माझ्यामध्ये ना सत्संग आहे, ना योग आहे, ना जप आहे, ना यज्ञ आहे व ना चरण कमलांवर माझे दृढ प्रेम आहे. खरोखरीच त्यांच्यामध्ये ह्या गुणांचा अभाव होता का? कदापि नाही, ते ह्या सर्व गुणांनी संपन्न होते, 'मन क्रम वचन राम पद सेवक' होते. स्वप्नातसुद्धा श्रीरामांव्यतिरिक्त अन्य देवाचे चिंतन करीत नव्हते. त्यांची अनन्य श्रद्धा होती. परंतु त्यांच्या उद्‌गारांमध्ये किती दीनता आहे, विनम्रता आहे.

आजकाल बहुतेक साधुंना घर सोडल्यानंतर चार–सहा वर्षांतच वेश मिळतो, परंतु ज्ञानाच्या अभावामुळे ते वंशाच्या मर्यादेचे पालन करताना दिसत नाहीत व नुसतेच शेखी मिरवीत असतात. पाच–सात वर्षांतच स्वतःला संत समजू लागतात. जरा काही त्यांच्या सन्मानाविरुद्ध झाले की क्रोधित होतात. वास्तविक जे संत असतात ते असे नसतात, ते विरही असतात. त्यांना कोणी संत म्हणो, राजपूत्र म्हणो, अवधूत म्हणो अथवा विणकर म्हणो, त्यांच्या चित्तावर कोणताही प्रभाव पडत नसतो. त्यांचे चित्त इष्ट–संबंधी तथ्यांव्यतिरिक्त काही ग्रहणच करीत नाही. वास्तविक अनुरागी भक्तासाठीच हा मार्ग सांगितलेला आहे.

साधकाचे आचरण भरतासारखे असले पाहिजे. राम वनवासात गेले तेव्हा व्याकुळ होऊन भरत त्यांचा मागोवा काढत चित्रकुटला पोहोचले. राम परत आले नाहीत, तेव्हा त्यांच्या पादुका घेतल्या. त्या मस्तकावर ठेवून भरत अयोध्येला परत आले. राज्यकारभार सांभाळणे तर दूरची गोष्ट, नंदीग्राममध्ये एक झोपडी बनवून तेथे राहिले. रामाच्या पादुकांचे ध्यान करीत अश्रुपूर्ण नेत्रांनी दिवस-रात्र काढू लागले.

हनुमान संजीवनी औषधी घेऊन जेव्हा त्याच मार्गाने परत जात होते तेव्हाही भरत तितक्याच व्याकुळ अवस्थेत असलेले दिसले. हनुमान रस्त्यात पूर्णवेळ भरताच्या भक्तीची प्रशंसा करीत होते. इतकेच नव्हे तर चौदा वर्षांनंतर प्रभुंच्या आगमनाची सूचना देण्यासाठी हनुमान आले तेव्हाही भरत त्याच अवस्थेमध्ये होते. श्रीरामांनी हनुमानाला सांगितले, "जा अयोध्येला जाऊन मी येत असल्याची सूचना भरताला दे, नाहीतर तो प्राणत्याग करेल." पूज्य परमहंस महाराजजींना जेव्हा लोक विचारत की परमेश्वर खरंच भेटतो का? तेव्हा महाराजजी म्हणत, "हाँ! का नाही भेटणार? जर अनुरागी भक्ताला परमेश्वर भेटत नसता तर मी मरून गेलो नसतो का? मी प्राण दिले असते. मला परमेश्वराने भेटूनच ही स्थिति प्रदान केली आहे." साधकाचा विरह इतका तीव्र असला पाहिजे. हनुमानाने भक्ताची दशा बघितली -

**बैठे देखि कुसासन, जटा मुकुट कृस गात।**
**राम राम रघुपति जपत, स्त्रवत नयन जल जात।।**

**(मानस, ७/१ख)**

चौदा वर्षांपूर्वी जी भरताची दशा होती, त्या पेक्षाही अधिक प्रेमपूर्ण व्याकुळ अवस्थेत हनुमानाने त्यास पाहिले. गवताच्या आसनावर बसलेले, जटांचा मुकुट झालेला, देह कृश झालेला. 'राम राम' हा जप चालू होता, हृदयामध्ये स्वरूप होते व डोळ्यांनी अश्रुधारा वहात होत्या. ते पाहून हनुमानाला खूप आनंद झाला. त्यांना रोमांच आले, अश्रूपात होऊ लागला, मन अतिशय सुखावले. अनुरागी भक्त आपल्यापेक्षा अधिक अनुरागी भक्ताला पाहून असाच प्रसन्न होतो, त्याला ईर्ष्या होत नाही. हनुमानाने अमृतासमान निरोप सांगितला, "ज्यांच्या विरहामध्ये दिवस-रात्र विचार करता, ज्यांचे गुण निरंतर गाता, तेच श्रीराम येत आहेत."

हे ऐकताच भरताचे सारे दु:ख दूर झाले, जणू काही तहानलेल्याला अमृत मिळाले. भरत म्हणाले, "हा निरोप असा आहे की त्याच्यासारखे ह्या जगामध्ये दुसरे काही नाही." इष्टाची प्राप्तीच साधकाचे सर्वस्व असते. तो कधी विसरत नाही की ह्यासाठीच तो साधक झालेला असतो. तेव्हा पूर्तिकाळापर्यंत साधकाच्या विरह, वैराग्य व विकलतेमध्ये न्यूनता तसेच शिथिलपणा येता कामा नये. भरत व सुतीक्ष्णाचे चरित्र आपल्या चरित्राशी न जोडता, त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपण तसे आचरण केले पाहिजे. थोडेतरी आपण इष्टापासून दूर असलो तरी स्वत:ला साधकच समजले पाहिजे. प्रार्थना–विनम्रता तसेच विकलता ह्यांमध्ये उत्तरोत्तर वाढ झाली पाहिजे. इष्टापासून सूतभर लांब असाल व ते अंतर कापण्याच्या प्रयत्नांमध्ये साधक जर शिथिल झाला तर माया आक्रमण करू शकते. अशा ह्या थोड्याशा अंतरासाठी जड भरताला तीन जन्म घ्यावे लागले. सूत भर जरी असले तरी अंतर ते शेवटी अंतर असते. खूप लांबून धावत येणारा गंगेच्या दोन हात अलिकडेच दमून बसला, तर गंगाजळाचा त्याला काय उपयोग? थोड्याशा अंतरावरच तो तहानेने व्याकूळ होऊन मरून जाईल. हे थोडेसे अंतरही त्याच्यासाठी कोसांप्रमाणे असते, कणमात्र अडथळाही पहाडाप्रमाणे असतो. परंतु साधकांनी असे समजून हताश होता कामा नये की भगवत्पथामध्ये विघ्नेच विघ्ने आहेत, कोण इतके झंझट करेल? वस्तुत: भक्तिमार्गामध्ये कठीण काहीही नाही, मुक्ति तर निश्चित आहे. हां, उत्तम साधकाला केवळ विरह–वैराग्यामध्ये शिथिलता आणता कामा नये.

"सच्चा साधुसाठी सर्वत्र मंगल असते. दिखावटी साधु बनता कामा नये. परमेश्वरानेच तुम्हाला काही बनविले तर गोष्ट वेगळी. साधकाचे ध्यान तुटता कामा नये व दंभ होता कामा नये तर सर्व व्यवस्थित होते." आपल्या शिष्याला असा उपदेश देत एक भ्रमण करणारे महात्मा म्हणाले, "बेटा! तू स्वत: काही बनू नकोस." शिष्याने आज्ञा शिरसावंद्य मानली. काही अंतर चालल्यानंतर रस्त्याच्या बाजूला एक रम्य उद्यान त्यांना दिसले. शिष्याने आग्रह केल्यामुळे महात्मा त्या उद्यानात गेले, तेथील निर्जन भवनात एका गादीवर आपले आसन तयार केले. शिष्यानेही बाजूच्या कक्षात बस्तान मांडले.

ते उद्यान कोणा राजाचे होते. तो कधी–कधी तेथे विश्राम करण्यासाठी यायचा. कर्मधर्म संयोगाने जेव्हा गुरु–शिष्य विश्रांती घेत होते तेव्हा राजाही तेथे आला. शिपायांनी शिष्याला पकडून विचारले, "कोण आहात? हे महाराजाधिराजांचे

विश्रामघर आहे माहीत नाही का?" शिष्य म्हणाला, 'मी साधु आहे.' शिपायाने थप्पड मारून त्यास बाहेर ढकलले. दुसऱ्या कक्षामध्ये गुरुजी विश्राम करीत होते. शिपाई धावत येऊन त्यांना ओरडला, "कोण आहेस? महाराजांच्या गादीवर झोपण्याचे साहस कसे केलेस?" महात्मा गप्प राहिले व उठून बसले. शिपायाने परत तोच प्रश्न विचारला. तोपर्यंत राजा त्या कक्षात पोहोचला व म्हणाला, "असे वाटते कोणी महात्मा आहेत. म्हणून इतके शांत आहेत. त्यांना आदराने दुसऱ्या कक्षात घेऊन जा." परंतु महात्मा तिथे थांबले नाहीत व उद्यानातून बाहेर पडले. रस्त्यावर त्यांना त्यांचा शिष्य भेटला. शिष्य म्हणाला, "महाराज! मला तर खूप मार बसला." महात्मा म्हणाले, "काहीतरी बनला असशील." शिष्य म्हणाला की त्यांनीच कोण आहेस म्हणून विचारले म्हणून मी म्हणालो की मी साधु आहे. महात्मा म्हणाले, "साधु बनलास ना म्हणून मार पडला." साधु कोणीही स्वतः बनू शकत नाही. साधनात्मक क्रिया जेव्हा पकड घेते तेव्हा क्रमशः उत्थान करीत-करीत योगारूढतेची स्थिति येते व मनाच्या निरोधकाळामध्ये साध्य वस्तू स्वतः प्रवेश करून साधकाची उन्नती करून त्याला साधु बनविते. जो परमात्म्याला साध्य करतो, तो साधु असतो. साधुचे ढोंग करता कामा नये.

साधनेच्या काळात भयंकर विघ्ने येऊ शकतात, परंतु साधकाने आपल्या निश्चयापासून डगमगता कामा नये. ज्याचा निश्चय खरोखरच पक्का आहे तोच ह्या पथावरून चालू शकतो. निश्चयावर दृढ राहून साधनेत मग्न राहिल्याने विपत्तीसुद्धा संपत्ती बनते. जसे अर्जुन व महर्षि काग ह्यांच्या जीवनात घडले. परंतु तो शापही अज्ञातवासामध्ये उपयोगी ठरला. अर्जुनासाठी तो जणू काही वरदानच ठरला. कागभुशुंडिंनाही जरी शाप मिळाला होता, तरी त्यांच्या दृढतेमुळे पुढे त्यांना अनेक वरदान मिळाले. ह्या प्रसंगापासून साधकाने प्रेरणा घेतली पाहिजे.

दुष्ट व्यक्तीमध्येही एखादा गुण अवश्य असतो. साधकाची दृष्टी केवळ त्या गुणावर असली पाहिजे. महात्मा दत्तात्रय भ्रमण करीत होते. त्यांना एक कुत्रा दिसला जो कोणीतरी काठी उगारल्यावर उठून उभा राहिला, चुचकारल्यावर त्याच्या जवळ गेला, तुकडा टाकल्यावर तो घेऊन खाल्ला. परत बसून राहिला. दत्तात्रय विचार करू लागले की हा कुत्रा तर गुरुंचाही गुरु आहे. त्यांना त्या कुत्र्यापासून हे शिकण्यास मिळाले की विरक्त पुरुषाला मान-सन्मान रहित व संतुष्ट

असले पाहिजे. तसे तर कुत्र्यांमध्ये कित्येक दुर्गुण असतात, परंतु दत्तात्रयांना त्यांचे काहीही प्रयोजन नव्हते. अनेक दुर्गुणांमध्येही त्यांना एक गुण दिसला व त्यांनी केवळ त्यावर विचार केंद्रित केला.

पुढे गेल्यावर दत्तात्रयांना एक अजगर दिसला. इतका मोठा होता की सहज सरकूही शकत नव्हता. दिवसभरात एक फूटही चालू शकत नव्हता. दत्तात्रयांना तो अजगर काय खात असेल याचे कुतुहल वाटले. म्हणून ते तेथेच आसन मांडून बसून राहिले. त्यांना दिसले की दिवसभरात कोणी-ना-कोणी प्राणी त्याच्या तोंडासमोर येत असे, ज्यास पकडून अजगर आपले पोट भरत असे. अजगराच्या हिंसक वृत्तीशी दत्तात्रयांचा काही संबंध नव्हता पण त्याच्यातही एक गुण त्यांना दिसला की विरक्त पुरुषाला उदर-भरणासाठी दारोदारी भटकता कामा नये. अजगराची प्रशंसा करीत दत्तात्रय निघाले. अजगरामध्येही सद्गुरुंचा एक गुण पहावयास मिळाला. अजगर हा दत्तात्रयांचा गुरु नव्हता. गुरुंची विद्या तर काही वेगळीच असते, तरीही सद्गुरुंच्या रहाणीतला एक गुण अजगरामध्ये त्यांस दिसला. संपूर्ण भूत-मात्रांच्या भिन्न-भिन्न क्रियांमधून त्यांनी स्वतःच्या गुरुंना अथवा इष्टास पहाण्याचा प्रयास केला.

**सिमिटि सिमिटि जल भरहिं तलावा। जिमि सद्गुन सज्जन पहिं आवा।।**


एक-एक थेंब साचून तलाव भरतो. त्याचप्रमाणे अधिकारी साधक एक-एक गुणांचा संचय करतो. दुसऱ्यांचे अवगुण शोधले तर साधकामध्येही ते दुर्गुण प्रवेश करतात. तेव्हा साधकाला सदैव सावध राहिले पाहिजे. महात्मा अथवा संसारी जीवाची निंदा केली नाही पाहिजे. परनिंदा साधकाच्या पतनाचे कारण बनू शकते - ''**परनिंदा सम अघ न गरीसा।**''

साधकाला स्वतःचे आचरण चोख ठेवावयास हवे. जी व्यक्ती दुराचारी आहे, ज्यास एकांत आवडत नाही, भौतिक वस्तूंच्या त्यागाची भावना ज्याच्यासाठी असंभव आहे, त्या व्यक्तीला मोक्षपदाची प्राप्ति होऊ शकत नाही. ज्या वस्तूंच्या संचयामध्ये मूढ व्यक्तीला प्रेम वाटते, त्याच वस्तूंच्या प्राप्तिमध्ये विद्वान् पुरुषाला वैराग्य वाटते. विषयांचा त्याग दुर्लभ आहे, तत्त्वज्ञानाची प्राप्ति दुर्लभ आहे तसेच सद्गुरुंच्या कृपेशिवाय सहजावस्थेची प्राप्ति दुर्लभ आहे.

तेव्हा बंधुनो! अनुभवी सद्गुरुंचे सान्निध्य प्राप्त करा. मन-क्रम-वचनांनी त्यांना शरण जा. हाच नेम कायम सांगितलेला आहे. त्या महापुरुषांमुळे अंतःकरणात संकेत मिळू लागतील, साधकाच्या आत्म्यामध्ये जागृत होऊन ते महापुरुष हृदयामध्ये निर्देश देऊ लागतील. तेव्हा समजावे की, साधनेमध्ये खरा प्रवेश मिळालेला आहे. असा प्रवेश निवृत्तीचा निश्चित स्रोत असतो. हे जाणण्यासाठी गुरुंच्या पाशी जावयासच हवे - "**तद्विज्ञानार्थं स गुरुमेवातिगच्छेत्।**" असे उपनिषदांत सांगितले आहे. त्या महापुरुषांना प्राप्त करण्यामध्ये आपले पुण्य कारणीभूत असते. संत अथवा सद्गुरुंना ओळखणारी दृष्टी हीच पुण्यमयी दृष्टी होय.

●


# आमची प्रकाशने




## यथार्थ गीता–

'यथार्थ गीते' मध्ये श्रीकृष्णांच्या वाणीचा आशय चांगल्या प्रकारे, जसाच्या तसा समजाविला आहे. ही एक कालजयी कृति आहे


२८ भाषांमध्ये




## अंग क्यों फडकते हैं और क्या कहते हैं?–

मानवी शरीराच्या विभिन्न भागांमध्ये होणाऱ्या स्पंदनांचे कारण आणि त्याद्वारे मिळणाऱ्या संकेतांचे विश्लेषण केले गेले आहे की जे साधना करताना सहाय्यक ठरते.


४ भाषांमध्ये



## जीवनादर्श एवं आत्मनुभूति–

पूज्य गुरु परमहंस स्वामी श्री परमानंदजी महारांजांचे जीवन चरित्र, त्यांचे अनुभव तसेच त्यांच्या उपदेशांचे संकलन केले आहे. साधकांसाठी हा अतिशय उपयुक्त ग्रंथ आहे.


४ भाषांमध्ये.



## अनाकलनीय प्रश्न

वर्ण, मूर्तिपूजा, ध्यान, हठ, चक्र-भेदन आणि योग अशा विषयांचे स्पष्टीकरण करुन, भ्रमात असले-ल्या समाजाला मार्गदर्शन केले आहे.


३ भाषांमध्ये




## शंका समाधान–

समाजामध्ये प्रचलित असलेल्या सर्व वाईट रिती, रुढि, आवडंबर आणि अंधविश्वास ह्याबद्दल असलेल्या शंकांचे निरसन केले आहे

५ भाषांमध्ये.



## एकलव्याचा अंगठा–

शिक्षण देणारा गुरु आणि सद्‌गुरु मधील फरक सांगितला आहे. शिक्षक हा लोकजीवनाची कला शिकवितो तर सद्‌गुरु जीवनामध्ये समृद्धि बरोबरच परम श्रेयाची जागृति आणि त्या परमपदाची प्राप्ति करवितो ज्यामुळे मनुष्याचा जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्ति मिळते.


३ भाषांमध्ये.



## भजन कोणाचे करावे?

धर्माच्या नावावर गाय, पिंपळ, देवी-देवता, भूत-भवानी ह्यांची पूजा लोक करीत आहेत. प्रस्तुत पुस्तकात ह्या सर्व भ्रातिंचे निवारण करुन स्पष्ट केले आहे की सनातन धर्म कोणता? इष्ट म्हणजे कोण? साधना कोणाची करावी व कशी करावी?

६भाषांमध्ये.




## षोडशोपचार पूजा पद्धति–

ह्या पुस्तकामध्ये हे सांगितले गेले आहे की एका परमात्म्यावर श्रद्धा स्थिर ठेऊन, त्या एका परमात्म्याचे चिंतन करायला शिकविणे म्हणजेच कर्मकांड होय.

३ भाषांमध्ये.


# आमची प्रकाशने



**योगशास्त्रीय प्राणायाम–**

योगशास्त्रीय प्राणायाम मध्ये आपण सांगितले आहेत की यम, नियम आणि आसन साध्य होताच श्वास–प्रश्वासाचे शांत प्रवाहित होणे म्हणजेच प्राणायाम होय. प्राणायाम नावाची वेगळी अशी कोणती क्रिया नाही. ही योग–चिंतनाची एक अवस्था आहे. त्याचेच निरसन ह्या पुस्तकात केले गेले आहे.


३ भाषांमध्ये.




**बारहमासी –**

आपले पूज्य गुरु श्रीपरमानंदजी महाराजांना आकाशवाणीने प्राप्त झालेले भजन (ईश्वरीय गायन) बारहमासीचे संकलन तसेच त्याचे विवेचन केले आहे. ह्यामध्ये लक्ष्यापर्यंत पोहोचण्याचा प्रवेशापासून ते पराकाष्ठेपर्यंतचा मार्ग दाखविला आहे.


हिंदी भाषेमध्ये.




**योगदर्शन– प्रत्यक्षानुभूत**

व्याख्या– महर्षि पतंजलि कृत ह्या पुस्तकात सांगितले गेले आहे की 'योग' प्रत्यक्ष दर्शन आहे, तो लिहिता किंवा सांगता येत नाही. क्रियात्मक होऊनच साधकाच्या लक्षात येते की जे काही महर्षिंनी लिहीले आहे त्याचा वास्तविक अर्थ काय आहे? साधनेस उपयोगी असे पुस्तक आहे.


३ भाषांमध्ये.




**ग्लोरिज ऑफ योग–**

हठ, चक्र, भेदन आणि योग, प्राणायाम, ध्यान ह्या बद्दल पूर्ण माहिती.


इंग्रजी भाषेमध्ये.



**प्रश्न समाज के उत्तर गीता से–**

ह्या पुस्तकामध्ये सामाजिक, आध्यात्मिक तसेच धार्मिक असे कोणतेही प्रश्न असतील, त्यांचे गीतेच्या दृष्टि कोनातून निरसन केले आहे.

हिंदी भाषेमध्ये.



**अहिंसे चे स्वरुप–**

अहिंसा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. मूळतः हा यौगिक, आंतरिक साधनेचा शब्द आहे. ह्या पुस्तकात आपल्याला दिसेल की आपल्या पूर्वीच्या महापुरुषांनी अहिंसेला कोणत्या संदर्भात घेतले.

४ भाषांमध्ये.

MP3 ऑडियो सिडिज



६ भाषांमध्ये

श्री स्वामीजींच्या मुखातून निःसृत अमृतवाणीचे संकलन व्हात्युम १ ते ६० पर्यंत




हिंदी भाषेमध्ये.

## शास्त्र

परमात्म्याची प्राप्ती करुन देणाऱ्या क्रियाशील अशा ज्ञानाबाबतच्या नियमांचे संकलन म्हणजेच शास्त्र होय. या दृष्टिने पाहता भगवान श्रीकृष्णाची गीता सनातन व शाश्वत धर्मांचे शुद्ध शास्त्र आहे. ही गीता वेद, उपनिषद, समस्त योगशास्त्र, रामचरित मानस तसेच विश्वातील सर्व दर्शनशास्त्रांचे ती एकटीच प्रतिनिधित्व करीत आहे. मनुष्यमात्रासाठी गीता हे धर्मांचे अतर्क्य-गूढशास्त्र आहे.

## परमात्म्याचा निवास

तो सर्वसमर्थ, शाश्वत असा परमात्मा मनुष्याच्या हृदयातच स्थित आहे. त्याला सर्वभावे शरण गेल्याने शाश्वत धाम, शाश्वत शांति व अनंत जीवनाची प्राप्ती होत असते.

## संदेश

सत्य वस्तूचा तिन्ही काळात अभाव नसतो. असत्य वस्तूला अस्तित्वच नसते. तिन्ही काळात परमात्मा सत्य आहे, शाश्वत आहे, सनातन आहे.

– स्वामी अड़गड़ानन्द

५२००

वर्षांच्या दीर्घ कालानंतर श्रीमद्भगवद् गीतेची शाश्वत व्याख्या





**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. 5, मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ),
अंधेरी पूर्व, मुम्बई - 400069 भारत. फोन : (091-22) 2825 5300
ईमेल : contact@yatharthgeeta.com वेबसाइट : www.yatharthgeeta.com